ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक

योजना

वर्ष ४४ अंक १२ पाने ७६ जुलै २०१७ मूल्य ३० रु.

विशेषांक

दिव्यांग व्यक्तींसाठी सामाजिक सुरक्षा
संध्या लिमये

ज्येष्ठ नागरिकांसाठी सामाजिक सुरक्षा-आव्हाने आणि चिंता
सुमती कुलकर्णी

उपेक्षित वंचित घटकांपर्यंत योजना लाभ पोचविण्यासाठी विशेष प्रयत्न
राजकुमार बडोले

सर्वांसाठी आरोग्य आणि भारत
प्रा. के सीता प्रभू

सामाजिक सुरक्षा

विशेष लेख

सामाजिक सुरक्षेतील आंतरराष्ट्रीय रिती व भारत
चंद्रकांत लहारिया

फोकस

वृद्धापकाळातील आर्थिक सुरक्षितता
डॉ बद्री सिंग भंडारी

मराठी मासिक

योजना

योजना घरी आणा.
आजच वर्गणी भरा.



विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

वर्गणीचे दर

नियमित अंक मूल्य	२२.०० रुपये
विशेषांक	३०.०० रुपये
वार्षिक वर्गणी	२३०.०० रुपये
द्विवार्षिक वर्गणी	४३०.०० रुपये
त्रिवार्षिक वर्गणी	६१०.०० रुपये

वर्गणी, मनीऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने
७०१, ''बी'' विंग (७ वा मजला) केन्द्रीय सदन,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी. किंवा www.bharatkosh.gov.in/product
येथे ऑनलाईन भरावी.

वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव, पत्ता व संपर्क क्रमांक कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.

विक्रीचे ठिकाण : ७०१ सी, ७०१बी, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिध्द केले जाते.

योजना

विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४४ ❖ ❖ अंक १२ ❖ ❖ जुलै २०१७ ❖ ❖ मूल्य ३० रु. ❖

मुख्य संपादक
दिपीका कच्छल

संपादक
उमेश उजगरे

उप संपादक
अभिषेक कुमार

मुखपृष्ठ
जी.पी. धोपे

'योजना' हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. 'योजना'त प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मते त्या त्या लेखकांची असतात.

जाहिरात दर पत्रक

ब्लॅक अॅड व्हाईट पूर्ण पान:	रु. १०,०००
ब्लॅक अॅड व्हाईट अर्धे पान:	रु. ६,०००
बॅक कव्हर पूर्ण पान:	रु. २०,०००
सेकंड कव्हर पूर्ण पान:	रु. १७,०००
थर्ड कव्हर पूर्ण पान:	रु. १५,०००

अनुक्रमणिका

- भारतातील अन्नविषयक धोरण — डॉ. मौसुमी दास — ५
- दिव्यांग व्यक्तींसाठी सामाजिक सुरक्षा — संध्या लिमये — १०
- ज्येष्ठ नागरिकांसाठी सामाजिक सुरक्षा-आव्हाने आणि चिंता — सुमती कुलकर्णी — १५
- मध्यान्ह भोजन आणि बायोमेट्रिक्स — किरण भट्टी — २०
- उपेक्षित वंचित घटकांपर्यंत योजना लाभ पोचविण्यासाठी विशेष प्रयत्न — राजकुमार बडोले — २४
- सर्वांसाठी आरोग्य आणि भारत — प्रा. के सीता प्रभू — २७
- कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व आणि उपेक्षितांचे सक्षमीकरण — जतिंदर सिंग — ३२
- सामाजिक सुरक्षेतील आंतरराष्ट्रीय रिती व भारत- (विशेष लेख) — चंद्रकांत लहारिया — ३७
- शेतकऱ्यांचा सर्वांगिण विकास-वास्तव आणि उद्दिष्ट — निलब्जा घोष — ४२
- वृद्धापकाळातील आर्थिक सुरक्षितता- (फोकस) — डॉ. बद्री सिंग भंडारी — ४९
- असंघटित मजूर क्षेत्रासाठी सामाजिक सुरक्षा — डॉ. रुमा घोष — ५६
- सामाजिक सुरक्षेची वास्तव स्थिती व उपाय — उर्मी गोस्वामी — ६१
- भारतातील सामाजिक सुरक्षा कायदे — प्रा. डॉ. आर. के. नाळे — ६५

योजना मासिकासाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
योजना मासिक कार्यालय
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना -०२२-२७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

ISSN-0971-8397
विकास समर्पित मासिक
योजना

संपादकीय

सुरक्षेचे कवच

भारताच्या लोकसंख्याविषयक लाभाबाबत सध्या सर्वत्र चर्चा आहे. तरुणांची वाढती लोकसंख्या भारताला लवकरच आर्थिक महासत्ता बनवेल, असे काहींना वाटते तर, पुरेशा रोजगाराच्या संधी ना मिळाल्यास तरुणांची हीच वाढती संख्या भारतीय अर्थव्यवस्थेवरील ओझे ठरेल, अशी भीतीही काही जण व्यक्त करीत आहेत.

अर्थात, तरुणांच्या वाढत्या लोकसंख्येचे कौतुक करीत असतानाच, आपले धोरणकर्ते,अर्थतज्ज्ञ आणि सामाजिक विचारवंतांना ही बाबही लक्षात घेणे गरजेचे आहे की, भारतात वृद्धांची संख्याही मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. एक अंदाजानुसार भारतातील वृद्धांची लोकसंख्या सन २०२६ पर्यंत १७३ दशलक्ष इतकी होईल. यामध्ये प्रामुख्याने गरीब,वंचित आणि महिला यांचा समावेश असेल, ज्यांना गरज असेल आर्थिक आणि मानसिक आधाराची. याशिवाय, जगण्यासाठी सरकारी मदतीची गरज असलेले दिव्यांग,भूमिहीन मजूर आणि असंघटित क्षेत्रातील कामगार अशा घटकांसाठीही तरतूद करणे सरकारला क्रमप्राप्त ठरणार आहे. अशा गरजू घटकांना आधार देण्यासाठी सामाजिक सुरक्षा हे एक प्रकारचे कवच आहे. असे कवच ज्याला सर्वच लोकनियुक्त सरकारांनी जपले पाहिजे. सुदैवाने आपल्या घटनाकारांनी याचा विचार आधीच केला होता. त्यामुळेच राज्यघटनेच्या कलम ४३ मध्ये समाजातील विविध गरजू घटकांसाठी सामाजिक सुरक्षेची तरतूद करून ठेवण्यात आली आहे. आतापर्यंतच्या सर्व सरकारांनी घटनेतील या कलमाचा आदरच केला असून त्याचे पालन करणे कर्तव्य मानले आहे.

इंदिरा गांधी ज्येष्ठ नागरिक निवृत्ती वेतन योजना आणि इंदिरा गांधी विधवा निवृत्ती वेतन योजना वृद्धांसाठी सामाजिक सुरक्षा सुनिश्चित करतात. पूर्वी फक्त सरकारी कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन मिळे. लोक सरकारी सेवेत येण्यामागील काही कारणांपैकी हे एक मुख्य कारण असे. खाजगी क्षेत्रातील लोकांना मात्र अशाप्रकारची कोणतीही सुविधा नव्हती. त्यामुळे खाजगी क्षेत्रात काम करून निवृत्त झालेल्या व्यक्तींना नोकरीच्या काळात साठवलेल्या पैशावरच उर्ववरीत आयुष्यातील सर्व गरजा भागवण्याचे आव्हान असे. अशा वेळी एखादे आजारपण आले किंवा मुलांच्या शिक्षणासाठी अथवा लग्नासाठी पैसे लागले तर आयुष्यभर बचत केलेला पैसा खर्च करण्यावाचून पर्याय नसे. त्यानंतर दैनंदिन गरजा भागवायचा कशा, असा प्रश्न उभा टाके. हे सर्व टाळण्यासाठी सरकारने नॅशनल पेन्शन स्कीम आणि अटल पेन्शन योजना,स्वाभिमान यासारख्या योजना सुरु केल्या. त्यामुळे खाजगी आणि असंघटित क्षेत्रातील लोकांना देखील निवृत्तीवेतनाचा लाभ घेणे शक्य झाले आहे.

सामाजिक सुरक्षेच्या बाबतीत शेती हे आणखी एक बेभरवशाचे क्षेत्र मानले जाते, जिथे हवामान, पाण्याची उपलब्धता/अनुपलभतता, किडीचा प्रादुर्भाव अशा अनेक बाबींवर पीक उत्पादन अवलंबून असते. ही बाब लक्षात घेऊन सरकारने शेतकऱ्यांच्या भल्यासाठी प्रधानमंत्री फसल बिमा योजना, कृषी सिंचाई योजना,किसान क्रेडिट कार्ड आदी सुविधा उपलब्ध करून दिल्या. यासंबंधीचा आणखी एक भाग म्हणजे अन्न सुरक्षा. या अंतर्गत ज्या लोकांना बाजारभावाने कडधान्ये आणि डाळी विकत घेता येणे शक्य नसते त्यांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून अत्यल्प दरात ते उपलब्ध करून दिले जाते. या योजनेचा गरजूनांच लाभ मिळावा यासाठी डीबीटी अर्थात थेट लाभ हस्तांतरण योजनेद्वारे संबंधितांच्या बँक खात्यात रक्कम जमा केली जाते.

याशिवाय नयी मंजिल , उस्ताद आणि नई रोशनी सारख्या योजनांद्वारे महिला,अल्पसंख्याक,दिव्यांग, भूमिहीन आणि वंचित घटकांना सामाजिक सुरक्षा देण्याचा सरकार प्रयत्न करीत आहे. देशातील मुली शिक्षणापासून वंचित राहू नयेत यासाठी 'बेटी बचाओ, बेटी पढाओ,'आणि सुकन्या यासारख्या योजना आणण्यात आल्या आहेत. गर्भवती महिला आणि नवजात बालकांच्या मातांसाठीच्या योजनेला नुकतीच केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. याशिवाय सरकारने विविध वंचित आणि गरजू घटकांसाठी आरोग्य विमा योजनाही सुरु केल्या आहेत.

आपल्या नागरिकांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करता येत नाही, हे लोकशाही राज्याचे सर्वमान्य तत्व आहे. त्यामुळेच सामाजिक सुरक्षा हा सुप्रशासनाचा अत्यंत आवश्यक घटक आहे आणि सरकार त्याची पूर्तता करण्यासाठीच काम करीत आहे.

■■■

भारतातील अन्नविषयक धोरण

डॉ. मौसुमी दास

साहित्यामध्ये अन्न सुरक्षा विषयावर व्यापक चर्चा झाली आहे. ही एक बहुआयामी प्रक्रिया असून त्यामध्ये उत्पादन, वितरण, ग्राहकांची निवड, वापर, मोठया आणि लहान प्रमाणावर पोषक पदार्थांचे पुरेसे सेवन आणि त्यांचे परिणामकारक पचन यांचा समावेश होतो. अन्न-व्यवस्था आणि पोषण विषयक स्थिती यांचा परस्परांशी सहजगत्या संबंध आलेला दिसून येतो. धोरण ठरवताना सहजपणा यावा म्हणून संयुक्त राष्ट्राच्या अन्न आणि कृषी संघटनेची अन्न सुरक्षेची व्याख्या याच मुद्द्यांच्या आधारावर ठरवली जाते.

बदलणाऱ्या गरजा आणि आवश्यकता लक्षात घेऊन अन्न धोरणाची रचना विकसित होत गेली. जगभरात, बहुतेक सर्व देशांत धोरणाची अंमलबजावणी करताना हेच तत्व स्वीकारण्यात आले. यामध्ये दक्षिण आशियाई आणि आफ्रिकेतील उपखंडातील विकसनशील देशांचाही समावेश आहे. पिनस्ट्रप- अँडरसन आणि वॅटसन यांनी २०११ मध्ये जी संकल्पना विकसित केली तीच सध्याची सर्वात अलीकडची संकल्पना मानली जाते. यामध्ये विविध मितींचा आणि मार्गांचा,उपाययोजनांचा समावेश करण्यात आला आहे.

आपल्या देशात धोरणांची आखणी करताना एकतर विचारसरणींचा आधार घेतला जातो किंवा पूर्वी कशाचा उपयोग झाला होता त्याला महत्त्व दिले जाते. त्यामुळे देशात

बदलणाऱ्या गरजा आणि आवश्यकता लक्षात घेऊन अन्न धोरणाची रचना विकसित होत गेली. जगभरात, बहुतेक सर्व देशांत धोरणाची अंमलबजावणी करताना हेच तत्व स्वीकारण्यात आले. यामध्ये दक्षिण आशियाई आणि आफ्रिकेतील उपखंडातील विकसनशील देशांचाही समावेश आहे. पिनस्ट्रप- अँडरसन आणि वॅटसन यांनी २०११ मध्ये जी संकल्पना विकसित केली तीच सध्याची सर्वात अलीकडची संकल्पना मानली जाते. यामध्ये विविध मितींचा आणि मार्गांचा,उपाययोजनांचा समावेश करण्यात आला आहे.

गतिशील जागतिक अन्न व्यवस्था : आंतरसंबंध आणि परस्पर संबंध



स्रोत: पिनस्ट्रप - अँडरसन अँड वॅटसन (२०११)

बऱ्याच काळापासून अन्नविषयक धोरण हे अनावश्यक ठरत आहे. देशात अन्न सुरक्षेबाबत राबवला गेलेला सर्वात मोठा कार्यक्रम म्हणजे- सार्वजनिक वितरण व्यवस्था. एकतर असा कार्यक्रम राबवणे ही काळाची गरज होती. त्याची संकल्पनाही चांगली होती आणि अनेक महत्त्वाच्या राज्यांमध्ये त्याची अंमलबजावणीही चांगल्या प्रकारे करण्यात आली. असे असले तरी त्यामध्ये अनेक त्रुटीही निर्माण झाल्या. भ्रष्टाचार आणि गळतीने या कार्यक्रमाला वेढले. वितरण आणि गुणवत्ता या दोन्ही बाबत या योजनेला दर्जा राखता आला नाही. परिणामी गेल्या काही वर्षात ती अनावश्यक वाटू लागली. याचे आणखीही एक महत्त्वाचे कारण म्हणजे बहुतेक राज्यांनी या योजनेतील अन्न सुरक्षेच्या इतर बाजूंकडे, म्हणजे स्वच्छता, आरोग्य रक्षण याविषयी घ्यायची काळजी,वैविध्यपूर्ण आहार,महिला सक्षमीकरण इत्यादी मुद्द्यांकडे पाहिजे तेवढे लक्षच दिले नाही. आश्चर्य म्हणजे २०१३ मध्ये आलेल्या राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यात परत एकदा देशामध्ये अन्नधान्यांचे वितरण व्हावे यावर मुख्य भर देण्यात आला. आहारामधील विविधतेवर मर्यादित भर देण्यात आला. मात्र, तातडीची गरज नसतानाही देशात सुधारित सार्वजनिक वितरण व्यवस्था सुरु करण्यासाठी सर्व शक्ती एकवटण्यात आली. विशिष्ट लक्ष्य ठेवून सुरु करण्यात आलेल्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ ज्या घरांपर्यंत पोहोचतो किंवा पोहोचत नाही यांची तुलना करताना या घरांमधील मुलांचा आहारविषयक दर्जा ठरवताना फरक केला पाहिजे, हा मुद्दा विचारात घेण्यात आला नाही. कृषी क्षेत्र ते पोषण या संपूर्ण प्रक्रियेचा विचार करताना त्याच्या विविध बाजू लक्षात घेऊन एकसंध रचना करण्याची सध्या गरज आहे. सहस्रक विकास उद्दिष्ट पूर्ती न होण्याचे हे ही एक मुख्य कारण आहे. या सहस्रक उद्दिष्ट १ नुसार भारतात १९९० मध्ये कुपोषित मुलांचे प्रमाण जे ५३.५ टक्के होते ते २०१५ मध्ये निम्म्यावर आणायचे होते. पण २०१५ मध्ये हे प्रमाण ४० टक्क्यांवर आले. म्हणजेच ते २६ टक्के या उद्दिष्टापेक्षा खूपच दूर आहे.

स्रोत:यू एन डी पी [२]

अलीकडेच शाश्वत विकास उद्दिष्टांची जागा सहस्रक विकास उद्दिष्टांनी घेतली आहे. मात्र उद्दिष्ट पूर्तीबाबत एकंदरच निरुत्साही वातावरण दिसून येत आहे. कृषी ते पोषण सुरक्षा या प्रवासाचे जे विविध मार्ग आहेत, त्यावर दिला जाणारा भर हा एकमेकांशी तितकासा सुसंगत नाही, हे याचे मुख्य कारण आहे. केंद्र आणि राज्य या दोन्ही पातळ्यांवर हे दिसून येते. यासाठी जे विविध मार्ग किंवा उपाययोजना आहेत त्यांची रूपरेषा पुढीलप्रमाणे :

(१)अन्नाचा स्रोत कृषी हा आहे, (२) अन्न आणि बिगर अन्न पदार्थांवरील खर्चासाठी उत्पन्नाचा स्रोत कृषी हाच आहे, (३) कृषिविषयक धोरण आणि अन्नधान्यांच्या किंमती यांचा अन्न वापरावर परिणाम होतो, (४) कृषी क्षेत्रातील घराघरांमध्ये निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग आणि साधनसंपत्तीचे वाटप, (५) आई असणाऱ्या महिलांना कृषीक्षेत्रात रोजगार आणि त्याचा त्यांच्या मुलांच्या देखभालीवर आणि आहारावर होणारा परिणाम, (६) कृषीक्षेत्रात काम करणाऱ्या महिलांच्या आणि त्यांच्या मुलांच्या आहार आणि आरोग्य स्थितीवर त्यांच्या कामाचा होणारा परिणाम. शाश्वत विकास उद्दिष्ट पूर्तीसाठी उप उद्दिष्टपूर्ती करणे आणि त्यासाठी त्याच्या विविध पैलूंवर भर देणे गरजेचे आहे. उद्दिष्ट क्र.१ (गरिबीला नकार), उद्दिष्ट

क्र.२ (कोणीही भुकेला राहणार नाही अशी स्थिती), उद्दिष्ट क्र.३ (चांगले आरोग्य आणि लोक कल्याण), उद्दिष्ट क्र. ६ (शुद्ध पाणी आणि स्वच्छता),उद्दिष्ट क्र.१२ (शाश्वत वापर आणि उत्पादन) आणि उद्दिष्ट क्र.१३ (हवामानविषयक कृती).

अन्न सुरक्षा मिळवायची तर कोणती विविध उद्दिष्टे आणि उप उद्दिष्टे आपल्याला पूर्ण करायची आहेत, हे आपण पाहिले. या उद्दिष्टपूर्तीसाठी सर्व मंत्रालये आणि विभाग यांनी स्वतंत्रपणे काम न करता एका छत्राखाली काम करणे आवश्यक आहे!

शाश्वत विकास उद्दिष्टांची पूर्ती २०३० पर्यंत करायची तर सरकारने कशा प्रकारची अल्प आणि मध्यम धोरणे स्वीकारणे आवश्यक आहे, हे मी प्रस्तुत लेखामध्ये मांडू इच्छिते! जगभरात शाश्वत विकास उद्दिष्टांची पूर्ती करण्यासाठी शाश्वत जागतिक अन्न व्यवस्था आणण्यासाठी प्रामुख्याने प्रयत्न केले जात आहेत. भारतात मात्र या प्रक्रियेपासून आपण दूर जात चाललो आहोत. म्हणूनच पुढील काही उपाययोजना तातडीने हाती घेण्याची गरज आहे. प्रथम आपण अल्पकालीन उपाययोजनांबाबत माहिती घेऊया!

अ. आहाराबाबतची विविधता : दुर्लक्षित झालेली महत्त्वाची गरज

देशातील नागरिकांनी वैविध्यपूर्ण आहार घ्यावा यासाठी सरकारने त्याचा तातडीने प्रचार आणि प्रसार करणे आवश्यक आहे.राष्ट्रीय आहार संस्थेने विकसित केलेला अन्न पिरॅमिड हा सर्वसामान्यांच्या आकलनापलीकडचा आहे.लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी, त्यांचे शिक्षण होण्यासाठी आपल्याला साध्या पण लोकांचे लक्ष वेधून घेणाऱ्या पद्धती शोधून काढायला हव्यात. अमेरिकेतील कृषी विभागाने रंगीबेरंगी,आकर्षक अशी जेवणाच्या



थाळीची पद्धत जनमानसात रुजविली. अगदी लहान मुलापासून ते प्रौढांनाही समजेल आणि आवडेल अशी ती कल्पना आहे. हे रंग थाळीतील अन्नपदार्थ रोज कसे आणि कोणकोणते असावेत, त्यांचे आरोग्य दृष्टया महत्त्व काय हे स्पष्ट करते. हे रंग विविध धान्ये, डाळी,फळे ,भाज्या,मांस इत्यादी अन्नपदार्थांच्या गटांशी संबंधित असतात. आपणही आपल्या देशातील लोकांना शाकाहारी अथवा मांसाहारी, दोन्ही प्रकारच्या आहाराचे महत्त्व पटावे यासाठी अशा प्रकारच्या पद्धती शोधून काढू शकतो.

आपण खरोखरच निरोगी बातम्या(?) आणि सवयींचा प्रसार करतो का? आपल्या पोषक आहारविषयक दर्जामध्ये सुधारणा घडून येण्यासाठी आपण आपल्या संस्कृती आणि स्थानिक अन्नविषयक सवयींचा गांभीर्यपूर्वक विचार केला पाहिजे. त्याला महत्त्व दिले पाहिजे. देशामध्ये वैविध्यपूर्ण अन्न उत्पादन, वापर आणि तयारी याबाबत वरून खाली हा दृष्टिकोन यशस्वी ठरू शकत नाही. वरून खाली म्हणजे केंद्र निर्णय घेणार आणि तो राज्य,जिल्हा, तालुका, गाव असा खाली झिरपत येणार. खरे तर, शासन आणि जबाबदारी यावर भर देऊन अन्न धोरणाचे विकेंद्रीकरण झाले तर ते जास्त उपयुक्त ठरेल. सर्वात खालच्या पातळीची वस्तुस्थिती पाहून निधीचा वाटप करणे गरजेचे आहे.परत इथे देखील सर्व विभागांनी एका छत्राखाली काम केले तरच ते यशस्वी होईल. कोणत्याही धोरणाच्या यशस्वीतेसाठी देशामध्ये चांगल्या पायाभूत सुविधा असणे ही अत्यंत महत्त्वाची गरज आहे. दास यांच्या मते वैविध्यपूर्ण आहाराचा वापर वाढण्यासाठी, त्यामध्ये सुधारणा घडून येण्यासाठी पायाभूत सुविधा, वैद्यकीय केंद्रांची उपलब्धता आणि वृत्तपत्रे महत्त्वाची भूमिका बजावू शकतात.

ब. लक्ष्याधारित यंत्रणेमध्ये सुधारणा करणे : असुरक्षित कोण आहे?

आहारात कॅलरीजचा वापर वाढावा यासाठी देशातील अतिशय गरीब लोकांना अजूनही मोफत अन्न वितरीत होणे गरजेचे आहे. कारण उर्वरित लोकसंख्येच्या आहारात हे प्रमाण वाढलेले आहे. देशातील ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागात कॅलरीजच्या प्रमाणात घट झाल्याचे एका पाहणीद्वारे(डेटन आणि ड्रेझ,२००९) आढळून आले आहे.सरकारला धान्य आणि डाळी या व्यतिरिक्त इतर अन्न पदार्थांना अनुदान देणे(काही निवडक राज्यांमध्ये दिले जाते) कदाचित अवघड जाऊ शकते. अशा वेळी भाज्या, फळे, दूध, अंडी, मासे आणि मांस इत्यादींचे उत्पादन करणाऱ्या उत्पादकांना स्थानिक वापर आणि उत्पादन पद्धती लक्षात घेऊन प्रोत्साहनपर अनुदान दिले जाऊ शकते. उदाहरणार्थ, आहारात डाळींचा वापर केल्यास आहाराची गुणवत्ता सुधारणा होते, असे नुकत्याच झालेल्या एका अभ्यासात आढळून आले आहे. शीतगृहांची कमतरता हा भारताला भेडसावणारा नेहमीचा प्रश्न असल्याने, वितरण आणि उपलब्धतेत वाढ करून पोषक आहाराच्या

वापरामध्ये वाढ करणे, हे जास्त सोयीस्कर आहे.काही राज्यातील शाळांमध्ये सुरु असलेल्या माध्यान्ह भोजन योजनेमुळे मुलांना धान्ये, डाळी, आणि अंडी यांचा समावेश असलेला एकत्रित जास्त पोषण द्रव्य असलेला आहार मिळत आहे.

दारिद्र्य रेषेचा अन्न हा घटक अद्यावत करताना : जेवणामध्ये कॅलरीज इतकेच महत्त्व इतर पोषक द्रव्यांना द्यायला हवे,हे तेंडूलकर आणि रंगराजन समितीने ओळखले आणि त्यांनी दारिद्र्य रेषेचे मोजमाप करताना त्यांचा यात समावेश केला. आहारातील वैविध्याचे मोजमाप करण्यासाठी आम्ही आता भारतासाठी आरोग्यदायी खाण्याचा निर्देशांक या नवीन साधनाचा प्रस्ताव ठेवत आहोत. या पद्धतीमुळे ज्या गरीब घरांमध्ये आहारामध्ये विविधतेचा वापर होत नाही, अशी घरे शोधून काढता येतात. या निर्देशांकामुळे, आहारात वैविध्य नसणारी केवळ शाकाहारीच नव्हे तर मांसाहारी घरेही शोधून काढणे सोपे जाणार आहे. या निर्देशांकामुळे या घरांची नेमकी परिस्थिती काय आहे, हे ही जाणून घेता येणार आहे. दारिद्र्य रेषा गतिशील असायला हवी आणि नेमके असुरक्षित लोक किती आहेत, हे जाणून घेण्यासाठी तिची मदत व्हायला हवी. याशिवाय लोकांना उत्पन्न, आरोग्य,किंवा हवामानविषयक अचानक काही धक्के बसतात - म्हणजे कधी कधी उत्पन्नात खोट येते, आरोग्य बिघडते,किंवा भूकंप, पूर यांसारख्या नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागते. या सगळ्या परिस्थितीशी सामना करताना सर्वात प्रथम लोक काय करतात तर ते खाणे कमी करतात.

क. डिजिटल उपाययोजना : हस्तांतरण आणि मागोवा रोख आणि इतर असे मिश्र हस्तांतरण.

केवळ सेवांचे वितरण केले की झाले असे न करता आरोग्यविषयक काय परिणाम होतात याचाही मागोवा घेणे. त्या त्या ठिकाणची परीस्थिती लक्षात घेऊन रोख किंवा इतर स्वरूपाच्या व्यवहाराला चालना द्यायला हवी. ज्या ठिकाणी सार्वजनिक वितरण व्यवस्था यशस्वीपणे राबवली जात आहे,तिथे ती तशीच सुरु ठेवावी. मात्र रोख व्यवहार करताना काळजी घेणे आवश्यक आहे.कारण त्याचा वापर घराघरातील अन्न सुरक्षेचा दर्जा सुधारण्यासाठी केला जातो. रोख हस्तांतरणामुळे घरांमधील मुख्य अन्नाच्या वापराकडून लोक जास्त सकस आणि वैविध्यपूर्ण आहाराकडे

आधार पूल वेतन (आधार ब्रीज पेमेंट) पद्धतीच्या माध्यमातून २०१७-१८ या आर्थिक वर्षात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कायद्यांतर्गत(नरेगा) काम करणाऱ्या ५१ टक्के लोकांना या योजनेचा लाभ मिळाला. अन्नधान्यासाठी थेट रोख हस्तांतरण योजनेचा ९४ टक्के लोकांना लाभ मिळाला. सरकारच्या अंदाजानुसार, डिसेंबर, २०१६ पर्यंत सुमारे ५०,००० कोटी रुपयांची बचत झाली. ही रक्कम एक वर्षाच्या अनुदानाएवढी आहे

वळतील. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरीत करण्यात येणाऱ्या धान्याच्या गुणवत्तेवर आपण लक्ष केंद्रित करायला हवे होते, कारण आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणाऱ्या लोकसंख्येला त्याची आवश्यकता असते. या संदर्भात महिला सक्षमीकरण महत्त्वाचे ठरते. सामान्यतः घरांमध्ये वयस्कर महिला या घरासाठी निर्णय घेणाऱ्या असतात. म्हणूनच वैविध्यपूर्ण आहाराबाबत त्यांना शिक्षित करणे ,त्यांचे प्रबोधन करणे जास्त आवश्यक आहे.

आधार कार्ड आणि बँकेत खाते असणाऱ्यांना थेट हस्तांतरण योजनेचा लाभ तर मिळणार आहेच पण त्याचबरोबर त्यांचा आरोग्यविषयक दर्जाही यामुळे कळू शकेल असा आमचा प्रस्ताव आहे. देशात डिजिटल क्रांती झाल्याने गरीब व्यक्तींची ठराविक काळानंतर नियमितपणे माहिती घेणे शक्य होणार आहे. आधार पूल वेतन (आधार ब्रीज पेमेंट) पद्धतीच्या माध्यमातून २०१७-१८ या आर्थिक वर्षात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कायद्यांतर्गत(नरेगा) काम करणाऱ्या ५१ टक्के लोकांना या योजनेचा लाभ मिळाला.अन्नधान्यासाठी थेट रोख हस्तांतरण योजनेचा ९४ टक्के लोकांना लाभ मिळाला. सरकारच्या अंदाजानुसार, डिसेंबर, २०१६ पर्यंत सुमारे ५०,००० कोटी रुपयांची बचत झाली. ही रक्कम एक वर्षाच्या अनुदानाएवढी आहे. गरीबीचे निकष ठरवण्यासाठी याचा अतिरिक्त कारण म्हणूनही फायदा होऊ शकतो. या नव्या योजनेच्या देखरेखीसाठी आम्ही नवा विभाग सुरु करण्याचा प्रस्ताव ठेवत नाही किंवा त्यासाठी नवा कर्मचारी वर्ग नेमावा असेही म्हणत नाही. पण ज्या भागात आत्यंतिक गरिबी आहे, अशा ठिकाणी सध्या जो कर्मचारीवर्ग काम करीत आहे त्यांचीच कार्यक्षम मदत घेऊन ही योजना राबवता येईल. अशाच प्रकारचे धोरण मंगोलियाच्या अंतर्गत भागात राबवण्यात आले आहे. तेथील लोकांना कायमस्वरूपी गरिबीतून बाहेर काढण्यासाठी त्यांच्या घरांवर सातत्याने देखरेख ठेवण्यात येत आहे (गरिबीतून बाहेर काढणे याचा अर्थ केवळ उत्पन्नात सुधारणा घडवून आणणे नव्हे तर त्यांना अन्न आणि आरोग्याच्या बाबतीतील गरिबीतूनही बाहेर काढणे असा आहे).

ड. सुबत्ता आणि लठ्ठपणा : देशात कुपोषणाबरोबरच लठ्ठपणा आणि सूक्ष्म पोषण कमतरता आजारही मोठया प्रमाणावर आढळून

येत आहेत.मध्यमवर्गीय आणि श्रीमंत लोक या आजाराला बळी पडण्याची शक्यता वाढू लागली आहे. वेगाने वाढणारे शहरीकरण, किंमती, जीवनशैली, चरबी वाढवणारे, तसेच तेलकट पदार्थ सहज उपलब्ध होणे आणि या सर्वांचे मोठया प्रमाणावर झालेले बाजारीकरण ही या आजारांना बळी पडण्याची कारणे आहेत. अशा प्रकारच्या वागण्याने आपण मधुमेह, हृदयविकार यांसारख्या असंसर्गजन्य आजारांना आमंत्रण देत आहोत हे लोकांनी समजून घेतले पाहिजे. अशा प्रकारची चरबी वाढवणाऱ्या अन्न उत्पादनांवर, तसेच अशा प्रकारच्या आरोग्याला हानी पोचविणाऱ्या अन्न पदार्थांचा वापर करण्याला प्रोत्साहन देणाऱ्या सुपर मार्केट्सवर जादा कर आकारून सरकारने यामध्ये हस्तक्षेप करणे गरजेचे आहे. एकूण काय तर कुपोषणाच्या या तिहेरी ओझ्याने समाजाला आणि सकल देशांतर्गत उत्पादनाला(जी डी पी) याची जबर आर्थिक किंमत मोजावी लागत आहे.

इ. अन्न सुरक्षा, हानी आणि अपव्यय अन्न सुरक्षा, हानी आणि अपव्यय हा मुद्दा चिंताजनक ठरत आहे. एकीकडे सार्वजनिक वितरण पद्धतीला गळती आणि भ्रष्टाचाराला तोंड दयावे लागत आहे,तर दुसरीकडे शीतगृहांची सुविधा उपलब्ध नसल्याने मोठया प्रमाणावर अन्न वाया जात आहे. या क्षेत्रात संशोधन होणे गरजेचे आहेच पण त्याचबरोबर अन्न वाया जाणे, त्याचे होणारे नुकसान थांबविणे, यासाठी वाजवी किंमतीचे आणि किफायतशीर मार्ग शोधणे गरजेचे आहे. अन्न सुरक्षेबाबत विचार करताना अन्न उत्पादन आणि जतन करताना त्यामध्ये रासायनिक द्रव्यांचा कमीतकमी वापर कसा होईल, हे पाहणे आवश्यक आहे. भारताला लवकरच ही धोक्याची घंटा ठरू शकते. महत्त्वाचे म्हणजे अन्न सुरक्षेबाबतचा कोणताही अहवाल सार्वजनिकरित्या लोकांना माहितीसाठी उपलब्ध नाही (ग्रेस,डेलिया;मॅकडेरमॉट,जॉन. २०१५). उदाहरणच द्यायचे झाले तर एफ्लोटॉक्सिन हे मानवी आरोग्याला घातक आहे आणि त्याच्यामुळे बालकांच्यातच नव्हे तर प्रौढांच्यात देखील कुपोषण आणि दीर्घकालीन आजार होण्याची शक्यता असते (अननेव्हेर आणि डेलिया, २०१३). देशात दुग्धव्यवसाय करणाऱ्यांनी अन्न सुरक्षेच्या उपाययोजनांचा स्वीकार करायचा म्हटले तर त्यावर अनेक घटक प्रभाव टाकत असतात. त्यामुळे त्यांनी जास्त भावाने दूध विकले तरच त्यांचे नुकसान भरून येते, ही परिस्थिती कुमार आणि इतर यांना २०११ मध्ये केलेल्या एका अभ्यासाद्वारे आढळून आली. हवामानातील बदल हा, ही अन्न सुरक्षेबाबतच्या प्रश्नांशी निगडीत असलेला आणखी एक महत्त्वाचा मुद्दा! उदाहरणार्थ, हवामान बदलामुळे भारत - गंगा पठारावर अन्न व्यवस्था तेथील वातावरणाशी जुळवून घेत आहे(आगरवाल आणि इतर, २००४).

भारतात काटेकोरपणे पालन करावे असे सर्वसमावेशक असलेले अन्नविषयक धोरण कधीही नव्हते. त्याऐवजी त्या त्या वेळच्या तातडीच्या गरजेनुसार आणि वेगवेगळ्या हितसंबंधीयांच्या प्रभावाने कार्यक्रमांची आखणी केली गेली.नेमकी उद्दिष्टे ठेवून आखलेली व्यवस्था अंमलात आणणे हे काही इतके सोपे नाही. त्यामुळेच शाश्वत विकास उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी अल्पकालीन आणि मध्यम कालीन उद्दिष्टे पूर्ण करणे, हाच त्यावरचा तातडीचा उपाय आहे.

वर उल्लेख केलेल्या उपाययोजना त्वरित अंमलात आणणे आवश्यक आहे. असे असले तरी जागतिक अन्न व्यवस्थेचा भाग बनण्याच्या दृष्टीने अजून आपण खूप दूर आहोत. कुपोषणाचे तिहेरी ओझे हाताळण्याच्या दृष्टीने देशात सर्वसमावेशक असे अन्नविषयक धोरण आखणे आवश्यक आहे. या लेखात आधी चर्चा केल्याप्रमाणे भारतात काटेकोरपणे पालन करावे असे सर्वसमावेशक असलेले अन्नविषयक धोरण कधीही नव्हते. त्याऐवजी त्या त्या वेळच्या तातडीच्या गरजेनुसार आणि वेगवेगळ्या हितसंबंधीयांच्या प्रभावाने कार्यक्रमांची आखणी केली गेली.नेमकी उद्दिष्टे ठेवून आखलेली व्यवस्था अंमलात आणणे हे काही इतके सोपे नाही. त्यामुळेच शाश्वत विकास उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी अल्पकालीन आणि मध्यम कालीन उद्दिष्टे पूर्ण करणे, हाच त्यावरचा तातडीचा उपाय आहे. कृषी ते पोषण एक प्रवास : तातडीने आणि त्वरित कोणत्या गरजा पूर्ण करायच्या आहेत हे लक्षात घेऊन त्यानुसार निधीचे वाटप करणारा, दूरदृष्टी असणारा एकत्रित काम करणारा विभाग असावा. शाश्वत विकास उद्दिष्टपूर्तीसाठी जी उप उद्दिष्टे ठरवून देण्यात आली आहेत, आणि निदर्शकांची एक यादी बनवण्यात आली आहे त्यानुसार त्यावर आधारित धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. याचबरोबर त्याला पूरक ठरतील अशा इतर अत्याधुनिक तंत्रज्ञानाची साथ देणेही गरजेचे आहे.

■■■

लेखिका इन्स्टिट्यूट ऑफ फायनांन्शियल मॅनेजमेंट अॅन्ड रिसर्चमध्ये सहाय्यक प्राध्यापक आहेत.

email: mdas@ncaer.org

दिव्यांग व्यक्तींसाठी सामाजिक सुरक्षा

संध्या लिमये

जनतेचं कल्याण करण्यासाठी सरकार ज्या विविध सामाजिक योजना राबवते त्यांना सामाजिक सुरक्षा योजना म्हणतात. म्हणजेच लहान मुलं, वृद्ध व्यक्ती आणि दिव्यांग व्यक्तींसारख्या दुर्बल घटकांना विविध सेवा आणि सुविधा देऊन त्यांचं आयुष्य सुखकर करण्याचा सामाजिक सुरक्षा योजनांचा उद्देश असतो. भारतात सामाजिक सुरक्षा योजना ह्या सामाजिक विमा, राष्ट्रीय भविष्य निर्वाह निधी, सामाजिक सहाय्य, कर्मचारी जबाबदारी योजना, सामाजिक सुरक्षेसाठी वैश्विक योजना अशा विविध योजना आहेत.

पारंपारिक दृष्ट्या भारतात कुटुंबसंस्था ही सामाजिक सुरक्षा देणारी एक अनौपचारिक व्यवस्था होती. भारतात संयुक्त कुटुंबपध्दती होती ज्यात घरातले सगळे लोक एकत्र राहत अडचणीच्या वेळी एकमेकांच्या मदतीसाठी तत्पर असत. मात्र औद्योगिक क्रांती आधुनिकीकरण आणि नागरीकरण या गोष्टींचा परिणाम होऊन संयुक्त कुटुंब व्यवस्था मोडीत निघाली. शहरांमधल्या रोजगाराच्या संधींमुळे छोटी विभक्त कुटुंब निर्माण झाली. म्हणूनच आता नागरिकांना सामाजिक सुरक्षा पुरविण्याची जबाबदारी सरकारची आहे.

जनतेचं कल्याण करण्यासाठी सरकार ज्या विविध सामाजिक योजना राबवते त्यांना सामाजिक सुरक्षा योजना म्हणतात. म्हणजेच लहान मुलं, वृद्ध व्यक्ती आणि दिव्यांग व्यक्तींसारख्या दुर्बल घटकांना विविध सेवा आणि सुविधा देऊन त्यांचं आयुष्य सुखकर करण्याचा सामाजिक सुरक्षा योजनांचा उद्देश असतो. भारतात सामाजिक सुरक्षा योजना ह्या सामाजिक विमा, राष्ट्रीय भविष्य निर्वाह निधी, सामाजिक सहाय्य, कर्मचारी जबाबदारी योजना, सामाजिक सुरक्षेसाठी वैश्विक योजना अशा विविध योजना आहेत.

भारतीय राज्यघटनेच्या ४३ व्या कलमानुसार देशातील नागरिकांना सामाजिक सुरक्षा पुरविणे ही सरकारची जबाबदारी आहे. संविधानाच्या १४ व्या कलमानुसार, देशातल्या प्रत्येक व्यक्तीला कायद्यासमोर समान वागवण्याची हमी दिली गेली आहे. दिव्यांग आणि काम करण्यास सक्षम अशा बेरोजगार व्यक्तींना मदत देण्याचे निर्देश राज्यघटनेने सरकारला दिले आहेत. घटनेच्या ४१ व्या कलमानुसार, सरकार, त्याच्या आर्थिक क्षमता आणि विकासाच्या कक्षेत राहून बेरोजगार, वृद्ध, आजारी आणि दिव्यांग व्यक्तीचा शिक्षणाचा, काम करण्याचा अधिकार सुरक्षित राहील, यासाठी आवश्यक त्या सोयीसुविधा निर्माण करेल (शंकर ,२००६) दिव्यांग व्यक्ती कायदा १९९५ आणि दिव्यांग व्यक्ती अधिकार कायदा २०१६ नुसार, प्रतिबंधात्मक सामाजिक सुरक्षा योजनांची माहिती, जसे की माता आणि बालकाची प्रसूतीपूर्व आणि प्रसूतीनंतर काळजी व सुरक्षा, बेरोजगार भत्ता आणि विम्याची तरतूद याचा उल्लेख आहे. तसेच, दिव्यांग महिला, मुले आणि इतर दिव्यांगाना स्वतंत्र आयुष्य जगण्याचा अधिकार, आणि सर्व प्रकारच्या हिंसेपासून त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी सरकारवर असल्याचेही या कलमात म्हटले आहे.

सामाजिक सुरक्षा योजना :

जे दिव्यांग आणि गरीब व्यक्ती आहेत, जे स्वतःची काळजी घेऊ शकत नाही, त्यांच्यासाठी प्रत्येक सरकार सामाजिक सुरक्षा योजना राबवत असते. त्या त्या राज्यांची मार्गदर्शक तत्वे आणि अर्जदाराच्या वार्षिक उत्पन्नानुसार, प्रत्येक सरकार अशा दुर्बल घटकांना मासिक भत्ता

देत असते. सामाजिक सुरक्षा योजनांच्या अंतर्गत केंद्र सरकार अनेक योजना राबवत असते. जसे की, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजना, दिव्यांग व्यक्तींना सक्षम करण्यासाठी कार्यरत संस्थांना राष्ट्रीय पुरस्कार योजना, उपकरणे घेण्यासाठी सहाय्य आणि नोकऱ्यांमधे आरक्षण अशा अनेक योजना राबवल्या जातात.

प्रतिबंधात्मक सामाजिक सुरक्षा योजना या अशा काही योजना असतात, ज्या दुर्बल घटकांचे विविध संभाव्य धोक्यांपासून संरक्षण करतात. यात आरोग्याची काळजी, लसीकरण, प्रसूतीपूर्व आणि प्रसूतीनंतर माता आणि बालकाची काळजी इत्यादी सेवा अशा योजनांच्या माध्यमातून पुरवल्या जातात.

केंद्र आणि राज्य सरकार आरोग्य, शिक्षण, पुनर्वसन सेवा आणि आरक्षण अशा विविध प्रोत्साहनपर योजना दिव्यांग व्यक्तीसाठी राबवत असते. यातून

दिव्यांग व्यक्ती सामाजिक आणि आर्थिक कामांमध्ये सहभाग घेऊ शकतात.

कर : संविधानाच्या कलम ८० यु अंतर्गत दिव्यांग व्यक्तींना व्यावसायिक आणि प्राप्तिकरात सवलत दिली जाते. तसेच दिव्यांग

दिव्यांग विद्यार्थ्यांना सुलभ, अडथळे विरहित पायाभूत सुविधा आणि वाहतूक व्यवस्था पुरवली जाते. त्यासोबतच, पुस्तकांचा पुरवठा, गणवेश, शालेय साहित्य, विशेष अध्ययन उपकरणे आणि दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अशा सराव सुविधा दिल्या जातात. याच योजनेअंतर्गत, दृष्टीहीन विद्यार्थ्यांना गणित आणि चित्रमय प्रश्नांपासून सवलत, दृष्टीहीन, अपंग आणि गतिमंद विद्यार्थ्यांना परीक्षेच्या वेळी लेखनिक/ वाचकाची सुविधा, पेपर सोडवण्यासाठी अधिक वेळ, तृतीय भाषा शिकण्यापासून सवलत आणि सर्वसमावेशक शिक्षणाला पूरक ठरतील असे बदल अभ्यासक्रमात करण्याची मुभा दिली जाते.

व्यक्तींची जबाबदारी असलेले त्यांचे पालक यांनाही कलम ८० डी डी अंतर्गत प्राप्तिकरातून सवलत दिली जाते. ही सवलत दिव्यांग व्यक्तीच्या अपंगत्वाच्या प्रमाणावर अवलंबून असते.

शिक्षण : दहावीनंतरचे /व्यावसायिक /तंत्रशिक्षण असे एक वर्षापेक्षा जास्त कालावधीचे अभ्यासक्रम शिकणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शिष्यवृत्ती दिली जाते. ऑटिझम म्हणजेच स्वमग्नता, सेरेब्रल पाल्सी, मतिमंदत्व, बहु अपंगत्व अशा आजारांच्या विद्यार्थ्यांना नवव्या वर्गापासून शिष्यवृत्ती दिली जाते. या शिष्यवृत्तीसाठी अपंगत्व ४० टक्क्यांपेक्षा जास्त आणि कुटुंबाचे मासिक उत्पन्न १५ हजार रुपयांपेक्षा अधिक नसावे असे निकष ठरवण्यात आले आहेत.

पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकणारे दृष्टीहीन / कर्णबधीर विद्यार्थी तसेच, सेरेब्रल पाल्सी आजाराने ग्रस्त विद्यार्थ्यांना त्यांच्यासाठी उपयुक्त असे software असलेले संगणक घेण्यासाठी आर्थिक सहाय्य दिले जाते.

दिव्यांग विद्यार्थ्यांना सरकारी तसेच सरकारद्वारे अनुदानित शिक्षणसंस्थांमध्ये तीन टक्के आरक्षण दिले जाते.

दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सर्वसमावेशक शिक्षण योजना : या योजनेअंतर्गत, दिव्यांग विद्यार्थ्यांना सुलभ, अडथळे विरहित पायाभूत सुविधा आणि वाहतूक व्यवस्था पुरवली जाते. त्यासोबतच, पुस्तकांचा पुरवठा, गणवेश, शालेय साहित्य, विशेष अध्ययन उपकरणे आणि दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अशा सराव सुविधा दिल्या जातात. याच योजनेअंतर्गत, दृष्टीहीन विद्यार्थ्यांना गणित आणि चित्रमय प्रश्नांपासून सवलत, दृष्टीहीन, अपंग आणि गतिमंद विद्यार्थ्यांना परीक्षेच्या वेळी लेखनिक/ वाचकाची सुविधा, पेपर सोडवण्यासाठी अधिक वेळ, तृतीय भाषा शिकण्यापासून सवलत आणि सर्वसमावेशक शिक्षणाला पूरक

ठरतील असे बदल अभ्यासक्रमात करण्याची मुभा दिली जाते.

माध्यमिक स्तरावरील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सर्वसमावेशक शिक्षण : या योजनेअंतर्गत, १४ वर्षावरील दिव्यांग विद्यार्थ्यांना, म्हणजेच इयत्ता नववी ते बारावीच्या , सरकारी तसेच अनुदानित शिक्षणसंस्थामध्ये शिकणाऱ्या विविध सुविधा पुरवल्या जातात. यात, प्राथमिक शाळेतून माध्यमिक शाळेत गेलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांना निवडून त्यांना विविध उपकरणे आणि इतर मदत केली जाते. याअंतर्गत, अध्ययन साहित्य, वाहतूक व्यवस्था, वसतिगृह सुविधा, शिष्यवृत्ती, पुस्तके, सहायक तंत्रज्ञान आणि लेखनिक आणि वाचकाची सुविधा अशा विविध व्यवस्था पुरवल्या जातात.

राजीव गांधी अभ्यासवृत्ती योजना:

एम फील, पी एच डी असे उच्च शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना या योजनेअंतर्गत पाच वर्षांसाठी अभ्यासवृत्ती दिली जाते. दर वर्षी देशभरातल्या २०० दिव्यांग विद्यार्थ्यांना ही अभ्यासवृत्ती दिली जात असून ती विद्यापीठ अनुदान आयोगाअंतर्गत सर्व विद्यापीठे आणि शिक्षण संस्थांमध्ये लागू आहे.

रोजगार:

अ. सरकारी सेवा सार्वजनिक बँका तसचं सरकारी कंपन्यांमध्ये अ, ब, क, आणि ड अशा चारही श्रेणींमध्ये पाच टक्के नोकऱ्या दिव्यांग व्यक्तींसाठी राखीव असतात.

ब. सरकारी नोकऱ्या देताना दिव्यांग व्यक्तींसाठी वयोमर्यादा दहा वर्षांनी शिथिल करण्यात आली आहे. तसेच सरकारी नोकरीचे आवेदन भरताना त्यांना आवेदन आणि परीक्षा शुल्कातूनही सवलत देण्यात आली आहे.

क. दिव्यांग व्यक्ती करू शकतील अशी कामे असणाऱ्या विभागांमध्ये सरकारी नोकऱ्या निवडून त्या आरक्षित ठेवण्यात येतात.

ड. श्रेणी क आणि ड या पदावर असलेल्या दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या निवासी क्षेत्रात नोकरी दिली जाते. तसेच दिव्यांग व्यक्तींनी आपल्या मूळ गावाजवळ बदलीसाठी अर्ज केल्यास त्याचा प्राधान्याने विचार करण्यात येतो.

इ. सरकारने दिव्यांग व्यक्तींसाठी सर्व राज्यांच्या राजधानीच्या शहरात विशेष रोजगार केंद्र स्थापन केली आहेत. तसेच आरक्षित सरकारी नोकऱ्यांमधे नियुक्ती करण्यासाठी सर्व जिल्हा मुख्यालयांमध्ये विशेष रोजगार विभाग सुरु करण्यात आले आहेत. ज्या ठिकाणी अशी विशेष रोजगार केंद्रे स्थापन झालेली नाहीत अशा ठिकाणी नियमित रोजगार केंद्रांमध्येच एक स्वतंत्र विभाग उघडण्यात आला असून तिथे दिव्यांगांसाठी असलेल्या नोकऱ्यांची माहिती दिली जाते. यासाठी दिव्यांग व्यक्तींना या केंद्रामध्ये नोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच देशात दिव्यांगांसाठी असलेल्या १७ व्यावसायिक पुनर्वसन केंद्रांमध्येही ही नोंदणी करता येते.

सरकारने दिव्यांग व्यक्तींसाठी सर्व राज्यांच्या राजधानीच्या शहरात विशेष रोजगार केंद्र स्थापन केली आहेत. तसेच आरक्षित सरकारी नोकऱ्यांमधे नियुक्ती करण्यासाठी सर्व जिल्हा मुख्यालयांमध्ये विशेष रोजगार विभाग सुरु करण्यात आले आहेत. ज्या ठिकाणी अशी विशेष रोजगार केंद्रे स्थापन झालेली नाहीत अशा ठिकाणी नियमित रोजगार केंद्रांमध्येच एक स्वतंत्र विभाग उघडण्यात आला असून तिथे दिव्यांगांसाठी असलेल्या नोकऱ्यांची माहिती दिली जाते.

फ. खाजगी क्षेत्रांमध्ये दिव्यांग व्यक्तींना नोकरी देणाऱ्या कंपन्यांना प्रोत्साहनपर सवलती दिल्या जातात. या अंतर्गत दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीचा कंपन्यांचा हिस्सा सरकारतर्फे भरला जातो. तसेच तीन वर्षांपर्यंत विम्याची रक्कमही सरकार भरते. मात्र त्यासाठी दिव्यांग कर्मचाऱ्याचे मासिक वेतन किमान २५००० रुपये असणे आवश्यक आहे.

ग. पेट्रोलीयम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाअंतर्गत असलेल्या सर्व सार्वजनिक तेल कंपन्यांच्या विक्रेत्यांमध्ये साडे सात टक्के जागा दिव्यांगांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

ह. राष्ट्रीय अपंग वित्त आणि विकास महामंडळ दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी कर्ज पुरवठा करते. या अंतर्गत लघु उद्योग सुरु करण्यासाठी कर्ज दिले जाते. ज्यात सेवा व्यापार छोटे उद्योग उघडता येतात. त्याशिवाय दिव्यांग व्यक्तींसाठी उपयुक्त अशी उपकरणे बनविणे उच्च शिक्षण व्यावसायिक शिक्षण कृषी उत्पन्न यासाठीही कर्ज दिले जाते. तसेच मतीमंद, सेरेब्रल पाल्सी आणि स्वमग्न आजाराने ग्रस्त दिव्यांगांसाठी रोजगार निर्मिती करणाऱ्या स्वयंउद्योजकांना अर्थ सहाय्य केले जाते.

ई. सार्वजनिक बँका - अपंग, अनाथ आणि महिलांसाठी सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांच्या विशेष योजने अंतर्गत दिव्यांग व्यक्तींना कर्ज पुरवठा करताना व्याज दारात सवलत दिली जाते. दिव्यांग व्यक्तींसाठी कार्यरत संस्थांनाही ही सवलत मिळू शकते. असे कर्ज देताना केवळ चार टक्के व्याज दर आकारला जातो. लघु उद्योगांना वित्त पुरवठा करण्याच्या योजनेअंतर्गत दिव्यांग व्यक्तींना दोन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज देताना

व्याज दारात ०.५% सवलत दिली जाते.

४. ADIP योजना - अपंग व्यक्तींना सहाय्यक साहित्य आणि उपकरणे घेण्यासाठी मदत योजना - या योजने अंतर्गत दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या शारीरिक व्यंगांवर मात करता येईल अशी शास्त्रीय आणि चांगल्या दर्जाची टिकाऊ उपकरणे घेण्यासाठी मदत केली जाते. यातून दिव्यांग व्यक्ती त्यांच्या शारीरिक अडचणींवर मात करून स्वतःचे सामाजिक आणि मानसिक पुनर्वसन करून आपली आर्थिक क्षमता वाढवू शकतात.

५. इंदिरा आवास योजना : ह्या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातल्या दारिद्र्यरेषेखालील गरीब कुटुंबांना निवासाची व्यवस्था करण्यासाठी केंद्र सरकारकडून आर्थिक मदत दिली जाते. ग्रामीण भागात राहणाऱ्या कुटुंबांना २०००० रुपये तर दुर्गम डोंगराळ भागात राहणाऱ्या कुटुंबांना २२००० निधी दिला जातो. या योजनेत दिव्यांग गरीब ग्रामीण कुटुंबांसाठी तीन टक्के निधी राखीव ठेवला जातो.

६. दिव्यांग सक्षम करण्यासाठी राष्ट्रीय पुरस्कार योजना - दिव्यांग कर्मचाऱ्यांनी विविध क्षेत्रात केलेले उल्लेखनीय कार्य आणि यश ओळखून त्याचा गौरव करण्यासाठी त्यांना राष्ट्रीय स्तरावर पुरस्कार दिले जातात. या अंतर्गत उल्लेखनीय कार्य करणारे दिव्यांग कर्मचारी दिव्यांगांना नोकरी देणारे नियोक्ते, नोकरी देणाऱ्या संस्था/अधिकारी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था, व्यक्ती दिव्यांगांसाठी कार्य करणारे आदर्श नेतृत्व विविध क्षेत्रात सृजनशीलता दाखवणारे दिव्यांग तंत्रकुशल संशोधन करणारे आणि अशा संशोधनांचा दिव्यांगांसाठी स्वस्त उपकरणे बनविण्यासाठी वापर करणाऱ्या कंपन्या अशा विविध विभागात हे पुरस्कार दिले जातात. त्याशिवाय दिव्यांगांना नोकरीच्या ठिकाणी उत्तम आणि सुलभ वातावरण निर्माण करून देणाऱ्या सरकारी कंपन्या तसेच खाजगी संस्थांना, अपंगांच्या पुनर्वसनात उत्तम कार्य करणाऱ्या जिल्ह्यांना तसेच स्थानिक स्तरावर अपंगांसाठी काम करणाऱ्या संस्थांना पुरस्कार दिले जातात. यात ग्रामीण भागात अपंग महिलांना नोकरी देणे किंवा स्वयंरोजगारासाठी मदत करणाऱ्या संस्थांना प्राधान्य दिले जाते.

७. दिव्यांग व्यक्तींना सक्षम करण्यासाठी विश्वस्त निधी - सर्वोच्च न्यायालयाने १६ एप्रिल २००४ साली एका दिवाणी खटल्यात दिलेल्या निकालानुसार ज्या सार्वजनिक बँका व्याज दरातून ७२३.७९ कोटी रुपये अतिरिक्त नफा मिळवतात त्यांनी हा नफा दिव्यांगांसाठी काम करणाऱ्या विश्वस्त मंडळाकडून वळता करावा जेणे करून त्याचा कल्याणकारी योजनांसाठी वापर होऊ शकेल. हा निधी स्वमग्नता, सेरेब्रल पाल्सी, मतिमंदत्व आणि बहुअपंगत्व असलेल्या व्यक्तींसाठी कार्यरत राष्ट्रीय विश्वस्त संस्थेकडे दिला जाण्याचे निर्देश द्यावेत अशी विनंती केंद्र सरकारनं सर्वोच्च न्यायालयाकडे केली आहे. या विनंतीवर सर्वोच्च न्यायालयाने अद्याप कुठलाही निर्णय घेतलेला नाही. मात्र दरम्यानच्या काळात अशी संस्था स्थापन करण्यात आली असून या संस्थेला हा निधी देण्याचा सल्ला वित्त मंत्रालयाच्या बँकिंग विभागानं दिला आहे.

कर्मचारी नुकसानभरपाई कायदा १९२३ जो आधी मजूर नुकसानभरपाई कायदा (१९२३) म्हणून ओळखला जात असे,त्यानुसार एखाद्या कर्मचाऱ्याला कामावर असतांना अपघात किंवा त्याचा मृत्यू झाला तर त्याला किंवा त्याच्या कुटुंबाला नुकसानभरपाई देणे संबंधित कंपनीवर बंधनकारक असेल. एखाद्या कर्मचाऱ्याला कामाच्या स्वरूपामुळे मोठे आजारपण आल्यास, त्यालाही आर्थिक मदत देणे कंपनीला बंधनकारकच असेल.

---

८. तंत्रज्ञान विकास प्रकल्पांची अभियान स्तरावर अंमलबजावणी - दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या अपंगत्वावर मात करण्यासाठी उपयुक्त अशी साधने आणि उपकरणे माफक दारात मिळवून देऊन त्यांचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने १९९० - ९१ साली ही योजना सुरु करण्यात आली. ह्या योजने अंतर्गत दिव्यांगांसाठी साधने आणि उपकरणे बनविणाऱ्या संशोधन आणि विकास प्रकल्पांना निवडून त्यांना निधी पुरवठा केला जातो.

९ अकस्मात येणारी गरिबी तसेच आंतरराष्ट्रीय रोजगार संघटनेनं निश्चित केलेल्या आकस्मिक संकटांच्या वेळी नागरिकांना सामाजिक सुरक्षा देण्यासाठी काही योजना तयार करण्यात आल्या आहेत. या योजने अंतर्गत वृद्धांना निवृत्ती वेतन, वैद्यकीय विमा आणि नुकसानभरपाई दिली जाते.

१०. इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग योजना : केंद्रीय ग्रामविकास मंत्रालयाने १७ फेब्रुवारी २००९ रोजी राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रमाअंतर्गत इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग योजनेचा समावेश केला. या योजनेअंतर्गत, केंद्र सरकारकडून अपंग व्यक्तीला ३०० रुपये प्रति महिना आर्थिक मदत दिली जाते. मात्र त्यासाठी, व्यक्ती दारिद्र्यरेषेखालच्या कुटुंबातला असावा तसेच वयोमर्यादा १८ ते ७९ या दरम्यानची असावी , असे निकष ठरवण्यात आले आहेत.

दिव्यांग लाभ - कर्मचारी नुकसानभरपाई कायदा १९२३ जो

आधी मजूर नुकसानभरपाई कायदा (१९२३) म्हणून ओळखला जात असे,त्यानुसार एखाद्या कर्मचाऱ्याला कामावर असतांना अपघात किंवा त्याचा मृत्यू झाला तर त्याला किंवा त्याच्या कुटुंबाला नुकसानभरपाई देणे संबंधित कंपनीवर बंधनकारक असेल. एखाद्या कर्मचाऱ्याला कामाच्या स्वरूपामुळे मोठे आजारपण आल्यास, त्यालाही आर्थिक मदत देणे कंपनीला बंधनकारकच असेल. कर्मचारी नुकसानभरपाई कायद्याच्या परिशिष्ट १ आणि २ मध्ये कामावर असताना झालेल्या अपघातात जखमी ,त्यातून होणारी आंशिक अथवा कायमस्वरूपी इजा, अपंगत्व या सगळ्याची सविस्तर यादी देण्यात आली आहे. तसेच, व्यवसायाशी संबंधित आजारांची यादी तिसऱ्या परिशिष्टात अ, ब, आणि क अशा क्रमाने देण्यात आली आहे. मात्र हा कायदा केवळ संघटीत क्षेत्राला लागू आहे.

आव्हाने आणि पुढची वाटचाल

भारतातल्या सामाजिक सुरक्षा योजना पुरेशा प्रमाणात दिव्यांग व्यक्तींपर्यंत पोहोचत नाहीत. भारतातील अनेक विकास योजनाचे लाभही दिव्यांगांना मिळत नाहीत, याचे कारण त्यांच्या आजूबाजूला असलेली सामाजिक बंधने किंवा शारीरिक अक्षमता! सध्या देशात दिव्यांग व्यक्तींना मदत करणाऱ्या अनेक योजना अस्तित्वात आहेत, मात्र त्यांची व्याप्ती फार मोठी नाही आणि या दिव्यांग व्यक्तींच्या सगळ्या समस्या सोडवण्यासाठी उपयुक्त ठरत नाही. माहिती आणि तिच्या प्रसाराचा अभाव तसेच सगळी माहिती एका ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा दृष्टिकोन नसल्याने दिव्यांगांना त्यांच्यासाठी असलेल्या योजना आणि फायद्यांची माहिती मिळत नाही. सध्या दिव्यांगांना सहाय्य आणि इतर फायदे मिळवून देण्याच्या प्रशासनीक व्यवस्था विखुरलेली आहे. सध्या देशात दिव्यांगांना फायदा मिळवून देण्यासाठी न एकसमान सूत्र आहे आणि न एक प्रशासनीक व्यवस्था आणि मार्गदर्शक तत्वे अस्तित्वात आहेत. दिव्यांगांना त्यांच्यासाठी असलेल्या योजना आणि कार्यक्रमांची माहिती आणि लाभ मिळवून देण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या अनेक पदरी व्यवस्थे ऐवजी मुख्य कार्यकारी अधिकारी असलेली एक सर्वसमावेशक व्यवस्था तयार करण्याचा सल्ला देण्यात येत आहे.

सध्या दिव्यांगांना सहाय्य आणि इतर फायदे मिळवून देण्याची प्रशासनीक व्यवस्था विखुरलेली आहे. सध्या देशात दिव्यांगांना फायदा मिळवून देण्यासाठी न एकसमान सूत्र आहे आणि न एक प्रशासनीक व्यवस्था आणि मार्गदर्शक तत्वे अस्तित्वात आहेत. दिव्यांगांना त्यांच्यासाठी असलेल्या योजना आणि कार्यक्रमांची माहिती आणि लाभ मिळवून देण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या अनेक पदरी व्यवस्थे ऐवजी मुख्य कार्यकारी अधिकारी असलेली एक सर्वसमावेशक व्यवस्था तयार करण्याचा सल्ला देण्यात येत आहे.

दहाव्या पंचवार्षिक योजनेत दिव्यांगांना त्यांच्या साठी विविध विभागात असलेल्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी एक सर्वंकष योजना तयार करून त्यासाठीचा अर्थ पुरवठा सुरळीत होण्यासाठी सगळ्या संबंधित मंत्रालयांच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. पण मध्यावधी आढावा अहवालानुसार M S E J ने ह्याच्या अंमलबजावणी विषयी काहीही केले नाही. ही संबंधित मंत्रालयाच्या कामकाजावार केलेली कठोर टिप्पणी आहे. याशिवाय, दहाव्या पंच वार्षिक योजनेत ठरविलेल्या विविध योजनां पैकी केवळ ३१% योजनांची अंमलबजावणी म्हणजे सरकारवरचा बट्टा आहे आणि दिव्यांगांविषयी असलेल्या दयनीय मानसिकतेचे द्योतक आहे.

दिव्यांगांच्या विविध समस्या समजून घेण्यासाठी आणि त्यानुसार एक व्यापक जाहिरात आणि त्यांच्यासाठी सामाजिक सुरक्षा योजना तयार करण्यासाठी एक सर्वसमावेशक आरखडा तयार करण्याची गरज आहे. ह्यासाठी पहिले पाऊल म्हणून दिव्यांगांबद्दलची सगळी माहिती गोळा करणे. ह्यात त्यांची लोकसंख्या, दिव्यांग मुलांच्या पालकांची संख्या, गरीबी रेषेखालील दिव्यांग मुलांची संख्या, ज्यांना रोजगार मिळू शकतो अशा सुशिक्षित बेरोजगार दिव्यांग युवकांची संख्या, ज्यांना कायम आधार लागतो असे दिव्यांग व्यक्ति, ६० वर्षांवरील दिव्यांग व्यक्ति, दिव्यांग महिला, असंगठित क्षेत्रात काम करणारे दिव्यांग आणि इतर माहिती गोळा करावी लागेल. ह्यासाठी एक सर्वसमावेशक प्रशासकीय व्यवस्था निर्माण करणे, शक्य त्या सर्व स्रोतांमधून निधि उपलब्ध करणे आणि व्यावसायिक देखरेखी खाली नियंत्रण करून अंमलबजावणी करून घेणे हे ताबडतोब करणे गरजेचे आहे. दिव्यांगांना मदत करण्यासाठी ह्या व्यतिरिक्त राज्य सरकारे, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्था, सरकारी आणि बिगर सरकारी संस्था यांना प्रोत्साहीत करणे गरजेचे आहे.

■■■

लेखिका मुंबईतील टाटा सामाजिक विज्ञान संस्थेत सहाय्यक प्राध्यापक असून दिव्यांग शिक्षण क्षेत्रातील तज्ञ आहेत.

email: limaye.sandhya.gmail.com

ज्येष्ठ नागरिकांसाठी सामाजिक सुरक्षा - आव्हाने आणि चिंता

सुमती कुलकर्णी

विकसित देशांमध्ये पुरवण्यात येणारी सामाजिक सुरक्षा आणि कमी विकसित देशांमध्ये पुरवण्यात येणारी सामाजिक सुरक्षा यात बरीच तफावत आहे. सध्याच्या काळात विकसित देशही बऱ्याच समस्यांना सामोरे जात आहेत. उदाहरणार्थ, ज्येष्ठ नागरिकांसाठीची निवृत्तीवेतन योजना. लाभार्थींचे प्रमाण वाढत आहे आणि कार्यक्षम वयोगटातील व्यक्तींचे प्रमाण कमी होत आहे. २१ व्या शतकाच्या मध्यात अशा देशांमधील ६० वर्षांपुढील नागरिकांची संख्या एक तृतीयांश असेल.

काही तात्कालिक किंवा दीर्घकालीन कारणांमुळे ज्या व्यक्तींना आपली उपजिवीका भागवता येत नाही, त्यांच्यासाठी सामाजिक सुरक्षा पुरवली जाते. विकसित देशांमध्ये सामाजिक सुरक्षा पुरवणे हे एक अंगभूत वैशिष्ट्य आहे. तर, कमी विकसित देशांमध्ये, तात्पुरती बेरोजगारी आणि तीव्र नूकसान यामुळे होणारा त्रास टाळण्यासाठी काही प्रमाणात सामाजिक सुरक्षा पुरवली जाते. तथापी, विकसित देशांमध्ये पुरवण्यात येणारी सामाजिक सुरक्षा आणि कमी विकसित देशांमध्ये पुरवण्यात येणारी सामाजिक सुरक्षा यात बरीच तफावत आहे. सध्याच्या काळात विकसित देशही बऱ्याच समस्यांना सामोरे जात आहेत. उदाहरणार्थ, ज्येष्ठ नागरिकांसाठीची निवृत्तीवेतन योजना. लाभार्थींचे प्रमाण वाढत आहे आणि कार्यक्षम वयोगटातील व्यक्तींचे प्रमाण कमी होत आहे. २१ व्या शतकाच्या मध्यात अशा देशांमधील ६० वर्षांपुढील नागरिकांची संख्या एक तृतीयांश असेल.

भारतासारख्या विकसनशील देशामध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांचे स्वरुप वेगवेगळे आहे. दीर्घकालीन दारिद्र्य, बेरोजगारी आणि न्यून रोजगार (अंडरएम्पलॉयमेन्ट) तसेच नियमाला धरुन नसलेल्या क्षेत्राचे मोठे प्रमाण आहे. तथापी, काही युरोपिय देश (फ्रान्स, स्वीडन) यांमध्ये ज्येष्ठ नागरिकांचे प्रमाण ७% हून १४% होण्यास १०० ते १२० वर्षे लागली. तर, भारत, चीन आणि काही आशियाई देशांमध्ये हे प्रमाण केवळ ४० वर्षात झाले.

I. सामाजिक सुरक्षेचा प्रकार, भारतातील ज्येष्ठांची समस्या

जागतिक लोकसंख्येपैकी एक-पंचमांश लोकसंख्या भारतात आहे, यात जगातील गरीबांपैकी एक तृतीयांश आणि ज्येष्ठ नागरिकांपैकी एक-अष्टमांश लोकसंख्या आहे. आतापर्यंत, कुटुंब आणि कमावती मुले हे ज्येष्ठ नागरिकांसाठी सामाजिक सुरक्षेचा विश्वसनीय स्रोत होते. मात्र, या स्रोतावर ताण पडायला सुरुवात झाली आहे. कारण ज्येष्ठ नागरिकांचे दीर्घ आयु, इतर सामाजिक-आर्थिक-सांस्कृतिक बदल, विभक्त कुटुंबपद्धती, नोकरदार महिलांचे वाढते प्रमाण यामुळे

काळजी घेण्यास कोणी उरले नाही, वैधव्याचा व्याप आणि युवकांचे स्थलांतर, बालकांचा स्वकेंद्री दृष्टीकोन आदी कारणे आहेत. गरीब कुटुंबांतील ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या तीव्र आहेत. आजारपणामुळे काही कामधंदा करता येत नाही तसेच काही मिळकत शिल्लक राहिलेली नसते. जागतिकीकरणामुळे गरीबीच्या संकल्पना बदलल्या आहेत, त्यामुळे आता नव्याने सर्वंकष धोरण ठरवावे लागणार आहे. केंद्र सरकार तसेच राज्य सरकारांनी काही उपक्रम हाती घेतले आहेत.

२०११ च्या जनगणनेनूसार देशात साठ वर्षापुढील नागरिकांची संख्या १०.४ कोटी आहे. २०२६ पर्यंत ही संख्या १७.३ कोटीपेक्षा पुढे जाईल, असा अंदाज आहे. २००० ते २०५० या काळात भारतातील ज्येष्ठ नागरिकांच्या संख्येत ३६% नी वाढ होईल. तर, कार्यक्षम गटातील लोकसंख्येत २००१ मध्ये ८.४ असे प्रमाण होते, ते कमी होऊन २०२६ मध्ये ५.२ होईल.

२०५० पर्यंत ६० वर्षे आणि त्यापुढील वयोगटातील महिलांचे प्रमाण वाढणार आहे. ६०-६४ वयोगटातील विधवांचे प्रमाण वाढणार आहे.

II. बीकेपीएआय सर्वेक्षण

भारतातील ज्येष्ठांच्या लोकसंख्येविषयी माहितीचे संकलन', हा प्रकल्प युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फंड, नवी दिल्ली आणि इन्स्टिट्यूट ऑफ इकॉनॉमिक ग्रोथ, बेंगळुरु, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांनी मिळून हाती घेतला. त्यांनी मे-सप्टेंबर २०११ दरम्यान ज्येष्ठ नागरिकांच्या स्थितीविषयी एक सर्वेक्षण केले. हिमाचल प्रदेश, पंजाब, पश्चिम बंगाल, ओडिशा, महाराष्ट्र, केरळ, तामिळनाडू या सात राज्यांमधील ८३२९ घरांतील ९८५२ व्यक्तींविषयी त्यांनी या सर्वेक्षणातून माहिती मिळवली. या सात राज्यांमध्ये राष्ट्रीय सरासरीपेक्षा ज्येष्ठ नागरिकांचे प्रमाण कमी आहे. या माहितीच्या आधारे या लेखाच्या माध्यमातून तीन मुद्यांवर भर दिला जाणार आहे.

i) भारतातील ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांची तीव्रता

ii) सामाजिक सुरक्षा पुरवण्यासाठी शासनाकडून होणारे प्रयत्न

iii) केंद्रसरकारच्या निवृत्तीवेतनासंबंधी असलेल्या दोन योजनांविषयी लोकांमध्ये जागृती आणि तिची उपयुक्तता

iv) ज्येष्ठांकडून या योजनांचा मर्यादीत प्रमाणात झालेला वापर

v) ज्येष्ठांसाठीच्या सार्वत्रिक निवृत्ती योजनेची व्यवहार्यता.

III. भारतातील समस्यांची तीव्रता

i. २०११ च्या जनगणनेनूसार देशात साठ वर्षापुढील नागरिकांची संख्या १०.४ कोटी आहे. २०२६ पर्यंत ही संख्या १७.३ कोटीपेक्षा पुढे जाईल, असा अंदाज आहे. २००० ते २०५० या काळात भारतातील ज्येष्ठ नागरिकांच्या संख्येत ३६% नी वाढ होईल. तर, कार्यक्षम गटातील लोकसंख्येत २००१ मध्ये ८.४ असे प्रमाण होते, ते कमी होऊन २०२६ मध्ये ५.२ होईल.

२०५० पर्यंत ६० वर्षे आणि त्यापुढील वयोगटातील महिलांचे प्रमाण वाढणार आहे. ६०-६४ वयोगटातील विधवांचे प्रमाण वाढणार आहे.

ii. सर्वेक्षणानूसार समस्येची तीव्रता

४५% ज्येष्ठ नागरिक दारिद्र्यरेषेखालील गटात आहेत किंवा अंत्योदय कार्डचा वापर करणारे आहेत. एक तृतीयांश ज्येष्ठ नागरिकांचे मासिक उत्पन्न १००० रुपयांपेक्षा कमी आहे. एक चतुर्थांशपेक्षा अधिक ज्येष्ठ नागरिकांना आर्थिक आधाराची गरज आहे, त्यांच्याकडे उत्पन्नाचा कोणताही स्रोत नाही. म्हणजे एकंदरीत ४०-५०% ज्येष्ठ नागरिक आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहेत. तर, ज्येष्ठ महिला विशेषतः विधवांची अवस्था मोठी बिकट आहे.

i) आर्थिक उत्पन्न नाही (पुरुष २६%, महिला ५९%),

ii) मालमत्ता नाही (पुरुष ११%, महिला ३४%, विधवा २८%, विधूर १४%),

iii) पूर्णतः आर्थिकदृष्ट्या परावलंबी (पुरुष ३३%, महिला ६६%)

सुदैवाने पंचाहत्तर टक्के ज्येष्ठ नागरिक आपल्या मुलांसोबत राहतात, तर सहा टक्के ज्येष्ठ नागरिक एकटे राहतात. त्यांना सामाजिक सुरक्षेची तीव्र निकड आहे. प्रत्येक पाच व्यक्तींमागे एका व्यक्तीला वाटते की सरकारने आपल्याला मदत करावी.

IV. शासकीय प्रयत्न

केंद्र सरकार आणि राज्य सरकारे मुख्यतः रोख रक्कमेच्या स्वरुपात ज्येष्ठ नागरिकांना मदत करतात. (इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धावस्था निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना) तर, ज्येष्ठ नागरिकांसाठीचा राष्ट्रीय कार्यक्रम या अंतर्गत विविध मंत्रालय वेगवेगळ्या सवलती देतात. तसेच राज्य सरकारांकडून विविध योजना राबवल्या जातात. केरळ, तामिळनाडू या राज्यांमध्ये अनाथांसाठी योजना आहेत. पश्चिम बंगालमध्ये ब्रिदाश्री, सांजभाटी योजना, ओडिशात मधुबाबू योजना, महाराष्ट्रात श्रावणबाळ आणि संजय गांधी निराधार योजना, पंजाबमध्ये आटा दाल योजना राबवल्या जातात.

i. इंदिरा गांधी नॅशनल ओल्ड एज पेन्शन स्कीम (IG NOAPS)

केंद्र सरकारने १९९५ मध्ये ही योजना सुरु केली. २००७ मध्ये योजनेला इंदिरा गांधीचे नाव देण्यात आले. एप्रिल २०११ पासून ६०-७९ वयोगटातील ज्येष्ठ नागरिकांसाठी निवृत्तीवेतन २०० रुपये प्रतिमाह तर ८० वर्षापुढील ज्येष्ठ नागरिकांना ५०० रुपये प्रतिमाह देण्यात येत आहे. केंद्र आणि राज्य सरकार यासाठीचा अर्धा-अर्धा खर्च उचलतात. २००८ पर्यंत साडेसहा लाख लाभार्थ्यांना याचा लाभ मिळाला आहे. २०११ च्या ज्येष्ठ नागरिकांसाठीच्या नवीन धोरणानूसार निवृत्तीवेतनाची रक्कम १००० रुपये प्रतिमाह अशी वाढवण्यात येणार आहे.

इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा पेन्शन योजना (IGNWPS)

केंद्र सरकारने २००९ मध्ये ही योजना सुरू केली, दारिद्र्यरेषेखालील ४०-६४ वयोगट (नंतर सुधारणा करुन ४०-५९) विधवांना प्रतिमाह २०० रुपये पेन्शन दिली जाते. वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यानंतर या विधवा इंदिरा गांधी नॅशनल ओल्ड एज पेन्शन स्कीमसाठी पात्र होतात.

आयजीएनओएपीएस आणि आयजीएनडब्ल्यूपीएस यांचे प्रमाण ज्येष्ठ नागरिकांमध्ये अनुक्रमे ७९ आणि ७२ टक्के आहे. दारिद्र्यरेषेखालील ज्येष्ठ नागरिकांमध्ये पुरुषांमध्ये या योजनांची माहिती असणाऱ्यांचे प्रमाण ८१ टक्के आणि महिलांचे प्रमाण ७१ टक्के आहे. इंदिरा गांधी नॅशनल ओल्ड एज पेन्शन स्कीम ही पंजाब, ओडिशा, हिमाचल प्रदेश या राज्यांमध्ये तर इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा पेन्शन योजना ओडिशा, केरळ, पश्चिम बंगाल, हिमाचल प्रदेश या राज्यांमध्ये योग्यरित्या राबवली जाते.

V. दोन्ही पेन्शन योजनांविषयी जागृती आणि योजनांची उपयुक्तता

दोन्ही योजनांमध्ये महत्त्वाचा मुद्दा आहे तो म्हणजे, दोन्ही योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहचतात की नाही. बीकेपीएआय सर्वेक्षणाने स्पष्ट झाले आहे की, आयजीएनओएपीएस आणि आयजीएनडब्ल्यूपीएस यांचे प्रमाण ज्येष्ठ नागरिकांमध्ये अनुक्रमे ७९ आणि ७२ टक्के आहे. दारिद्र्यरेषेखालील ज्येष्ठ नागरिकांमध्ये पुरुषांमध्ये या योजनांची माहिती असणाऱ्यांचे प्रमाण ८१ टक्के आणि महिलांचे प्रमाण ७१ टक्के आहे. इंदिरा गांधी नॅशनल ओल्ड एज पेन्शन स्कीम ही पंजाब, ओडिशा, हिमाचल प्रदेश या राज्यांमध्ये तर इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा पेन्शन योजना ओडिशा, केरळ, पश्चिम बंगाल, हिमाचल प्रदेश या राज्यांमध्ये योग्यरित्या राबवली जाते.

VI. कमी उपयोगितेची कारणे

बीकेपीएआय आणि इतर सर्वेक्षणातून या योजनांसंबधी खालील कारणे दिली आहेत.

- निरक्षरतेचे प्रमाण असल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांकडून पात्रता निकष पूर्ण करण्यासाठीच्या कागदपत्रांची पूर्तता केल जाऊ शकत नाही. ओळखपत्र, वयाचा दाखला, दारिद्र्यरेषेखालील असल्याचा दाखला, पंचायत सदस्यांचे शिफारसपत्र यासंबंधी अडचणींचा सामना करावा लागतो. यामुळे दलालांना वाव मिळतो. म्हणून मग लाचखोरी, जातीयता अशा बाबी वाढीस लागतात.
- दीर्घ प्रतीक्षा
- निवृत्तीवेतनाची अपुरी रक्कम
- योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहचण्यात राज्य सरकारांना येत असलेले अपयश, यामुळे यासाठी केलेली आर्थिक तरतूद तशीच राहते.

काही संशोधकांनी या योजनांच्या अंमलबजावणीविषयी मात्र आशावाद व्यक्त केला आहे. ओडिशा, तामिळनाडू या राज्यांमध्ये योजनेच्या अंमलबजावणीवर चांगल्या प्रकारे देखरेख ठेवली जाते. तसेच लाभार्थ्यांपर्यंत पोहचण्यासाठी या राज्यांनी नवनवीन क्लृप्त्या काढला आहेत.

एका अंदाजानूसार सध्या देशभरात ओल्ड एज पेन्शनचे लाभार्थी ६० लाख आणि विधवा

पेन्शनचे लाभार्थी ३० लाख आहेत. एनसीएईआर दिल्ली आणि युनिवर्सिटी ऑफ मेरिलँड, युएसए यांनी केलेल्या सर्वेक्षणानूसार दोन्ही योजनांसाठी राष्ट्रीय कवच सात टक्के आहे.

VII. सर्वंकष पेन्शन योजनेची मागणी

सर्व समस्यांवर उपाय म्हणून पेन्शन परिषदेने ५५+ वयोगटातील पुरुष आणि ५०+ वयोगटातील महिलांसाठी प्रतिमाह २००० रुपये किंवा न्यूनतम वेतन यापैकी जे जास्त असेल ते देण्याची मागणी केली आहे. ज्या ज्येष्ठ नागरिकांचे उत्पन्न मर्यादेपेक्षा जास्त आहे त्यांच्यावर कर आकारुन इतरांना सवलत देण्याची मागणी यात करण्यात आली आहे.

सर्व ज्येष्ठ नागरिकांना २००० प्रतिमाह पेन्शन दिल्यास २४९२३८ कोटी रुपये सरकारवर बोजा होईल. म्हणून लोकप्रिय निर्णय घेण्याऐवजी सरकारला मध्यमार्ग काढावा लागेल. त्यासाठी योग्य कर निकष पाळणे महत्त्वाचे आहे. बहुतांश ज्येष्ठ नागरिक ग्रामीण भागात /कृषी क्षेत्रात कार्यरत आहेत, त्यामुळे करनिर्धारण प्रक्रिया किचकट होईल. आर्थिक सुरक्षा ही सर्वोपरी आहे मात्र त्यासाठी अन्न सुरक्षा आणि आरोग्य सुरक्षा हा पर्याय होऊ शकत नाही.

IX. सध्याच्या सरकारने हाती घेतलेले उपक्रम

सध्याच्या सरकारने अटल पेन्शन योजना (APY), प्रधानमंत्री जन धन योजना, जीवन ज्योती योजना, प्रधानमंत्र जन सुरक्षा बीमा योजना या योजना थेट ज्येष्ठ नागरिकांसाठी नसल्यातरी त्या उपयुक्त आहेत.

अटल पेन्शन योजना, ही असंघटीत क्षेत्रासाठीची योजना आहे. या योजनेच्या माध्यमातून असंघटीत कामगारांना प्रतिमाह १००० ते ५००० रुपये दिले जातात. यात सरकार ५०% वाटा उचलते. कोणत्याही योजनेचे कवच नसलेले कामगार यासाठी पात्र आहेत. १ जून ते ३१ डिसेंबर, २०१५ या कालावधीतील लाभार्थ्यांसाठी सरकार पाच वर्षे योगदान देणार आहे.

जन सुरक्षा विमा योजना- या योजनेची सुरवात २०१५ मध्ये करण्यात आली. अपघाती विम्यासाठी ही तरतूद आहे. १८-७० वयोगटातील व्यक्ती ज्यांच्याकडे बँक खाते आहे, ते या योजनेचा लाभ घेऊ शकतात. वार्षिक १२ रुपये प्रिमिअम भरल्यानंतर मृत्यूपश्चात कुटुंबाला दोन लाख रुपये अपघातविमा मिळतो. तर, अपंगत्व आल्यास एक लाख रुपये मिळतात. ही योजना २०१४ मध्ये प्रधानमंत्री जनधन योजनेशी जोडण्यात आली. या योजनेअंतर्गत खातेदारांना शून्य रक्कमेवर खाते उघडून देण्यात आले. या योजनेअंतर्गत खातेदाराच्या मृत्यूनंतर अपघाती विमा एक लाख रुपये आणि जीवन विम्याचे ३०,००० रुपये फेब्रुवारी २०१७ नंतर देण्यास सुरुवात झाली. या अंतर्गत एकूण २७ कोटी खाती उघडली आणि ६६५ कोटी रुपयांच्या ठेवी ठेवण्यात आल्या.

सर्व ज्येष्ठ नागरिकांना २००० प्रतिमाह पेन्शन दिल्यास २४९२३८ कोटी रुपये सरकारवर बोजा होईल. म्हणून लोकप्रिय निर्णय घेण्याऐवजी सरकारला मध्यमार्ग काढावा लागेल. त्यासाठी योग्य कर निकष पाळणे महत्त्वाचे आहे. बहुतांश ज्येष्ठ नागरिक ग्रामीण भागात /कृषी क्षेत्रात कार्यरत आहेत, त्यामुळे करनिर्धारण प्रक्रिया किचकट होईल. आर्थिक सुरक्षा ही सर्वोपरी आहे मात्र त्यासाठी अन्न सुरक्षा आणि आरोग्य सुरक्षा हा पर्याय होऊ शकत नाही.

प्रधानमंत्री जीवन ज्योती बिमा योजना २०१५ मध्ये सुरू करण्यात आली. खातेदाराचा मृत्यू झाल्यास या योजनेअंतर्गत दोन लाखांचा विमा मिळतो. १८- ५० वयोगटातील व्यक्ती या योजनेत सहभागी होऊ शकतात. दरवर्षी खातेदाराला ३१ मे पूर्वी वार्षिक ३३० रुपये प्रिमिअम भरावा लागतो.

या योजनांवर सध्या टिप्पणी करणे खूप घाईचे होईल. इतर योजनांप्रमाणे ज्येष्ठ नागरिकही या योजनांचा लाभ घेऊ शकतात. पण, सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे तो गरीबांना सुरक्षा कवच पुरवण्याचा. लाभार्थ्यांची निवड करुन, सर्व निकषांची पूर्तता करण्यासाठी अर्जाची प्रक्रिया सुलभ करणे आवश्यक आहे. ज्याठिकाणी पैसा आहे त्याठिकाणी भ्रष्टाचार रोखणे आवश्यक आहे. त्यासाठी चांगली निगरानी प्रणाली आवश्यक आहे.

■■■

लेखिका लोकसंख्या अभ्यास क्षेत्रातील तज्ज असून मुंबई येथील इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर पॉप्यूलेशन सायन्सेसमधील डेव्हलपमेंटल स्टडीज विभागाच्या माजी प्रमुख आहेत.

email: sumati2610@gmail.com

द्रष्टे सरकार भारताचे
भविष्य सुरक्षित करत आहे
साथ आहे, विश्वास आहे
...होत हा विकास आहे
डिजीटल भारत
विकसित भारत
खेड्यांशी ब्रॉडबँड जोडणी
भारत नेटच्या माध्यमातून गावांमध्ये जलद जोडणी
2004-2014 कालावधीत 358 किलोमीटरच्या ऑप्टिकल फायबर लाईन
3 वर्षांमध्ये 77,831 ग्रामपंचायतींमध्ये 1,70,000 किलोमीटर ऑप्टिकल फायबर लाईन
राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टल
सर्व शिष्यवृत्ती गरजांसाठी वन स्टॉप उपाय, 2 कोटी विद्यार्थी आधीच नोंदणीकृत.
JEEVAN PRAMAAN
जीवन प्रमाण पोर्टल
निवृत्ती वेतन धारकांसाठी बायोमॅट्रीक ऑनलाईन सेवा; 25 लाखांहून अधिक निवृत्ती वेतन धारक या पोर्टलचा वापर करतात.
71 रुग्णालयांमध्ये ई रुग्णालय सुरु
(ओ पी डी साठी ऑनलाईन नोंदणी)
6.74 लाखांहून अधिक ई रुग्णालयांची नियुक्ति आणि ऑनलाईन नोंदणी आधारित 52 लाख भेटी झाल्या.
आता यापुढे लांब रांगा नाहीत
नोंदणी आणि भेट ठरवण्यासाठी
करण्याची यापुढे गरज नाही
रुग्ण नोंदी, निदान अहवाल, रक्त आणि शुल्क भरणा ऑनलाईन उपलब्ध
E-HOSPITAL
HEALTH SERVICES MADE EASY
davp

मध्यान्ह भोजन आणि बायोमेट्रिक्स

किरण भट्टी

बहुधा सर्वाधिक माहित असलेले आणि स्वीकृत करण्यात आलेले सामाजिक सुरक्षेचे निश्चित प्रतिपादन मानवी हक्कांच्या सार्वत्रिक घोषणापत्रातील परिच्छेद २२ मध्ये (१९४८) करण्यात आले आहे. ते असे सांगते की, "समाजाचा सदस्य म्हणून प्रत्येकाला सामाजिक सुरक्षेचा हक्क आहे. राष्ट्रीय स्तरावरील प्रयत्न व आंतरराष्ट्रीय सहकार्य यांच्या माध्यमातून तसेच प्रत्येक सरकारचे संघटन व साधनसंपत्ती तसेच त्याची प्रतिष्ठा आणि व्यक्तीमत्वाच्या मुक्त विकासाकरता अपरिहार्य असलेल्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकारांनुसार असा अधिकार मिळवण्यास तो पात्र आहे."

सामाजिक सुरक्षेचा रोख लोककल्याणाच्या साधारण कल्पना आणि सर्व नागरिकांना त्याची हमी देणाऱ्या व्यवस्थांच्या दिशेने असतो. नागरिकांना प्रतिष्ठेचे जीवन जगता येणे शक्य करण्याच्या दृष्टीने लाभ अथवा सेवांचा प्राथमिक संच पुरवण्यासाठी ते सरकारांना ठामपणे आवाहन करत असते. या संकल्पनेचे मूळ अशा सामाजिक अनुबंधाच्या कल्पनेत आहे की ज्याचा संदर्भ मुक्त आणि समान नागरिकांमध्ये समाज संघटनासाठी केल्या जाणाऱ्या अशा पद्धतीच्या करारात आहे की सर्वांना सुरक्षा आणि कल्याण सुनिश्चित केले जाईल. सामाजिक कंत्राट सरकारांच्या लोकशाही स्वरुपांचा पाया म्हणून व्यापक अर्थाने ओळखले जाते. सामाजिक सुरक्षेच्या इतिहासाचा तपास लावणे तसेही अवघड आहे, मात्र अगदी मागे गेले असता गरीबांना धान्य वितरित केल्याची नोंद पाहता रोमन साम्राज्यापासून विविध राजवटींनी विविध स्वरूपांतील सुरक्षा पुरवल्याचे पुरावे उपलब्ध आहेत. नंतरच्या काळात याच कल्पनेतून निघालेले इंग्लीश गरीब कायदे (१६०१) आणि अमेरिकन सामाजिक सुरक्षा कायदा (१९३५) हे सामाजिक सुरक्षाविषयक तरतुदींचे अधिक चांगल्या प्रकारे ठाऊक असलेली उदाहरणे होत. परंतु बहुधा सर्वाधिक माहित असलेले आणि स्वीकृत करण्यात आलेले सामाजिक सुरक्षेचे निश्चित प्रतिपादन मानवी हक्कांच्या सार्वत्रिक घोषणापत्रातील परिच्छेद २२ मध्ये (१९४८) करण्यात आले आहे. ते असे सांगते की, "समाजाचा सदस्य म्हणून प्रत्येकाला सामाजिक सुरक्षेचा हक्क आहे. राष्ट्रीय स्तरावरील प्रयत्न व आंतरराष्ट्रीय सहकार्य यांच्या माध्यमातून तसेच प्रत्येक सरकारचे संघटन व साधनसंपत्ती तसेच त्याची प्रतिष्ठा आणि व्यक्तीमत्वाच्या मुक्त विकासाकरता अपरिहार्य असलेल्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकारांनुसार असा अधिकार मिळवण्यास तो पात्र आहे." सामाजिक सुरक्षेच्या तरतुदींनी जगभरात तेव्हापासून विविध रुपे धारण केली असून काही नागरिकांनी एखाद्या कार्यक्रमात दिलेल्या योगदानावर आधारित लाभ मिळण्याच्या स्वरूपात आहेत जसे की पेन्शन अथवा बेरोजगारी विमा (साधारणपणे सामाजिक विमा असा उल्लेख केला

जातो) अथवा आरोग्य, शिक्षण अशा मूलभूत सेवा पुरवण्याच्या माध्यमातून ज्या योगदानावर आधारित नाहीत आणि सामाजिक संरक्षणाच्या आविष्कार म्हणून समजल्या जातात. दोन्ही प्रकारांत ज्या व्यवस्थांमध्ये नागरिकांना दारिद्र्याच्या रचनात्मक दुर्बलता आणि सामाजिक असमानतेवर मात करणे शक्य व्हावे याची हमी देणे हे सरकारचे कर्तव्य आहे, अशा लोकशाही समाजाचा अपरिहार्य घटक म्हणून त्यांचा विचार केला जातो.

भारतात पेन्शन, रोजगार हमी (बेरोजगारी भत्त्यासह), प्रसुती लाभ, अन्नपदार्थांवरील सबसिडी किंवा शाळेतील भोजन अशा अनेक सामाजिक सुरक्षेच्या तरतुदी कागदावर आहेत परंतु त्यांची कामगिरी अगदीच विषम असून अनेक प्रकरणांत तर ती असमाधानकारक आहे. याबाबतीत शैक्षणिक साहित्य लाभार्थीपर्यंत लाभ पुरवण्यात आलेल्या अपयशाच्या हास्यास्पद कहाण्यांनी भरले आहे. अत्यंत सुमार दर्जाच्या कामगिरीसाठी विविध कारणे उद्धृत करण्यात आली असून नोकरशाहीच्या अनास्थेपासून ते भ्रष्टाचार ते साधनसंपत्तीचा अभाव इथपर्यंत ती विविधांगी आहेत. मात्र प्रशासनाच्या क्षेत्रात सातत्याने सुधारणा करण्याची अथवा असमर्थता अथवा दीर्घकाल सुरू असलेले अपयश रोखण्यातील असमर्थतेमुळे वितरण करण्याच्या क्षमतेबाबत नागरिकांचाच नव्हे तर नोकरशाहीचा भ्रमनिरास झाला. अंमलबजावणीतील तथाकथित अपयश हा सरकारच्या कल्याणकारी कार्याभोवती फिरणाऱ्या चर्चेची सातत्यपूर्ण कल्पना राहिली परंतु त्या अंतर्गत दडलेल्या कारणांचा शोध घेऊन निवारण करण्याबाबतीत फारच थोडे प्रयत्न झाले. त्याऐवजी व्यवस्थेच्या बाहेरील तोडगे शोधून त्यावर आधारित (खासगीकरण, सार्वजनिक-खासगी भागीदारी इत्यादी) व्यवस्था नीट करण्याचा अथवा तंत्रज्ञानाचा उपयोग करुन त्रुटींवर कल्हई करण्याचा प्रयत्न झाला. या प्रयत्नांतील प्रमुख म्हणजे भ्रष्टाचार कमी करून लाभ लक्ष्यित करण्यात सुधारणा करण्यासाठी बायोमेट्रिकचा उपयोग सक्तीचा करणे हा आहे. या दिशेने भारत सरकारकडून नुकत्याच आलेल्या एका आदेशाच्या स्वरुपात ताजा प्रयत्न असून त्यात म्हटले आहे की, कोणत्याही मुलाला शाळेत मध्यान्ह भोजन घेण्यासाठी आधार कार्ड (यूआयडी) आधारित बायोमेट्रिक्स अनिवार्य आहे.

दुर्बल पार्श्वभूमी असलेल्या मुलांना शिक्षण घेण्यासाठी सामाजिक सुरक्षेच्या काही स्वरुपाची गरज असते पण शिक्षण हे स्वतःच भविष्यातील दुर्बलतेविरोधातील एक सामाजिक सुरक्षेचा आविष्कार आहे. विशेषतः शिक्षणासाठी सामाजिक सुरक्षा तरतुदींमध्ये सामाजिक आणि आर्थिक दृष्टया नागवलेल्या कुटुंबातील मुलांना शाळेपर्यंत येणे शक्य व्हावे यासाठी व शैक्षणिक चक्रात ते कायम रहावेत यासाठी परिस्थिती निर्माण करण्याचा समावेश आहे.

या लेखात शाळांतील मध्यान्ह भोजनाच्या मुद्यांकडे शिक्षणातील सामाजिक सुरक्षेचा आविष्कार म्हणून पाहिले असून कार्यक्रमाची कार्यपद्धती सुधारण्यासाठी बायोमेट्रिक सुधारणेचा परिणाम तपासला आहे. त्यात असा युक्तिवाद केला आहे की, मुलांची पोषणविषयक आणि शैक्षणिक सुरक्षेबाबत उत्तरे देण्याऐवजी तीव्रपणे अडथळे आणणारे अनेक प्रश्न उपस्थित केले जाण्याची शक्यता आहे.

मध्यान्ह भोजन कार्यक्रम

सामाजिक सुरक्षा आणि शिक्षण यातील उत्तम रितीने प्रस्थापित झालेले दुवे गुंतागुंतीचे असून ते दोन्ही दिशांकडे जाणारे आहेत. दुर्बल पार्श्वभूमी असलेल्या मुलांना शिक्षण घेण्यासाठी सामाजिक सुरक्षेच्या काही स्वरुपाची गरज असते पण शिक्षण हे स्वतःच भविष्यातील दुर्बलतेविरोधातील एक सामाजिक सुरक्षेचा आविष्कार आहे. विशेषतः शिक्षणासाठी सामाजिक सुरक्षा तरतुदींमध्ये सामाजिक आणि आर्थिक दृष्टया नागवलेल्या कुटुंबातील मुलांना शाळेपर्यंत येणे शक्य व्हावे यासाठी व शैक्षणिक चक्रात ते कायम रहावेत यासाठी परिस्थिती निर्माण करण्याचा समावेश आहे. त्यामध्ये शाळा वस्तीपासून भौतिक दृष्टया जवळ उपलब्ध करणे, शिष्यवृत्ती आणि इतर प्रकारच्या आर्थिक लाभांशाचे स्वरुप, शालेय भोजन, शालेय आरोग्य योजना यापासून ते शिक्षण घेणाऱ्या पहिल्या पिढीतील मुलांना पाठिंबा देण्यासाठी इतर कार्यक्रम सुरू करण्यापर्यंतच्या उपायांचा समावेश आहे. भारतात वरील सर्व उपाययोजना त्यांचे प्रमाण, दर्जा आणि यशाचे प्रमाण भिन्न असले तरीही सरकारच्या शैक्षणिक धोरण आणि कार्यक्रमांचा भाग राहिला आहे. मध्यान्ह भोजन कार्यक्रम हा

भारत सरकारतर्फे चालवण्यात येणारा कदाचित सर्वोत्कृष्ट सामाजिक सुरक्षेचा कार्यक्रम म्हणून व्यापक प्रमाणात मान्यता पावला आहे.

रिकाम्या पोटांना शिकवणे हे शिक्षणापर्यंत कधीच पोहचू शकत

नाही हे सर्वत्र चांगलेच माहित आहे. विशेषतः मुलांमधील भूक आणि कुपोषण याबाबतीतील भारताचे रेकॉर्ड पाहता शाळांमध्ये मध्यान्ह भोजन योजना राबवण्याने पोषण सुधारणे आणि मुलांना शाळेपर्यंत आणणे व दिवसभर त्यांना शाळेत ठेवण्याच्या अशा दुहेरी उद्दीष्टांची पूर्तता झाली. वास्तवात मध्यान्ह भोजनामुळे अनेक महत्वाचे हेतू साध्य होण्यास मदत झाली. जगभरातील संशोधनातून असे प्रस्थापित झाले आहे की, शाळेतील भोजनामुळे भूक कमी होते, मुलांची शाळेतील नावनोंदणी आणि उपस्थिती वाढते तसेच शिकण्याच्या परिणामांत सुधारणा होते. प्रगत आणि विकसनशील अशा दोन्ही प्रकारच्या बहुतेक देशांमध्ये कोणत्या ना कोणत्या प्रकारचा शालेय भोजन कार्यक्रम राबवला जातो. भारतात शाळेतील मुलांना स्वयंपाक करून गरम अन्नपदार्थ देण्याचा इतिहास दीर्घ असून १९८२ मध्ये तामिळनाडूत त्याचे सार्वत्रिकीकरण करण्यापासून त्याची सुरूवात झाली तर २००१ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने देशभर सर्व सरकारी शाळांमध्ये शिजवलेले जेवण मुलांना देणे कायदेशीर बंधनकारक केले. आजही देशाच्या अनेक भागांत मध्यान्ह भोजन हेच कित्येक मुलांसाठी दिवसातील पहिलेच भोजन असते. सध्या भारतातील मध्यान्ह भोजन कार्यक्रमांतर्गत ११.५ लाख शाळांतील १० कोटी मुलांचा समावेश करण्यात आला आहे. प्रामुख्याने अनुसूचित जाती/जमाती/ इतर मागासवर्गीय जातीतील

प्रगत आणि विकसनशील अशा दोन्ही प्रकारच्या बहुतेक देशांमध्ये कोणत्या ना कोणत्या प्रकारचा शालेय भोजन कार्यक्रम राबवला जातो. भारतात शाळेतील मुलांना स्वयंपाक करुन गरम अन्नपदार्थ देण्याचा इतिहास दीर्घ असून १९८२ मध्ये तामिळनाडूत त्याचे सार्वत्रिकीकरण करण्यापासून त्याची सुरूवात झाली तर २००१ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने देशभर सर्व सरकारी शाळांमध्ये शिजवलेले जेवण मुलांना देणे कायदेशीर बंधनकारक केले.

२५ लाख महिलांची शाळांमध्ये मध्यान्ह भोजन स्वयंपाकी व मदतनीस म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्याहीपुढे या योजनेचे इतरही अनेक सामाजिक फायदे आहेत जसे की कोणत्याही सामाजिक पार्श्वभूमीचे असले तरीही सर्व मुलांना एकत्रित भोजनाला बसवण्याची शिस्त बाणवणे, भोजनावर देखरेख करणाऱ्या स्थानिक समुदायांचा सहभाग वाढवणे आणि याद्वारे पालकांचा शाळेतील सहभाग वाढवणे आणि काही बाबतीत तर स्थानिक माल जेवणासाठी उपयोग करण्यास परवानगी देण्यात येते.

या कार्यक्रमावर टीका झाली नाही हे नाकारता येत नाही. पुरवठ्यातील अनियमितता, सुमार दर्जाचे अन्न व पायाभूत सुविधा, पोषक घटकांची कमतरता आणि मध्यान्ह भोजन घेणाऱ्या मुलांची नेमकी संख्या निश्चित करण्यातील अडचणी यासारख्या तफावती आहेत. मध्यान्ह भोजन शिजवण्यात शिक्षकांचा खूपच वेळ वाया जातो आणि त्यामुळे त्यांचे मूळ शिकवण्याच्या कर्तव्यापासून ते भरकटतात. मुले शाळेत फक्त भोजनासाठी येतात व ते दिल्यावर लगेचच निघून जातात व शैक्षणिक अपेक्षा पूर्ण करत नाहीत, याकडेही टीकाकारांनी बोट दाखवले आहे. त्याव्यतिरिक्त जातीय आधारावर केल्या जाणाऱ्या भेदभावाचेही वृत्त असून दलित मुलांना वेगळे बसून खायला सांगितले जाते अथवा त्यांना पुरेशा प्रमाणात अन्न दिले जात नाही, अशा प्रकारांची नोंद केली गेली आहे. पण मुलांना यूआयडी अनिवार्य केल्याने या समस्या कशा सुटणार आहेत, हे स्पष्ट झालेले नाही.

कार्यपद्धती सुधारण्यासाठी बायोमेट्रिक्सचा उपयोग मध्यान्ह भोजन योजनेसाठी यूआयडी अनिवार्य करण्याबाबत अधिकृत आधार पुढीलप्रमाणे आहे. सेवा वितरण अथवा लाभ किंवा सबसिडी देण्यासाठी आधार कार्डचा ओळखपत्र

म्हणून वापर करण्यामुळे सरकारी वितरण प्रक्रिया सोपी होऊन पारदर्शकता व कार्यक्षमता वाढते. मात्र यूआयडी वाटप करण्यात अनेक तफावती असून अनेक मुलांना आधार कार्ड मिळालेली नाहीत त्यामुळे या निर्णयाचा अर्थ असा आहे की प्रक्रिया सुटसुटीत करताना मुलांना या योजनेचा लाभ मिळण्यासंदर्भात सुधारणा करण्याऐवजी योजनेचा लाभ घेऊ पाहणाऱ्या मुलांच्या संख्येवर मर्यादा आणण्याच्या हेतूने हे सुलभीकरण केले जात आहे. विशेषतः मुले ज्याची लक्ष्य आहेत अशा सामाजिक सुरक्षा कार्यक्रमाचा हा उद्येश्य असू शकत नाही. आणखी पुढे यूआयडी सक्तीचे करण्याच्या माध्यमातून नेमके काय पारदर्शक केले आहे अथवा या पद्धतीच्या द्वारे कुणाला जबाबदार ठरवण्यात आलेले आहे, हे ही स्पष्ट झालेले नाही कारण पुरवठयातील अनियमितता, स्वच्छता व पायाभूत सुविधांचा सुमार दर्जा अथवा जेवणातील अपुऱ्या पोषक घटकांचे प्रमाण यावर काहीही परिणाम त्यामुळे होत नाही. सरकारी शाळेत नावनोंदणी असूनही खासगी शाळांत हजेरी लावणाऱ्या अशा दुहेरी नावनोंदणी केलेल्या मुलांवर त्याचा परिणाम होऊ शकतो. तरीही यूआयडी अनिवार्य केल्याने या प्रकारावरही परिणाम होत नाही तर फक्त जे अजूनही कुपोषित आहेत अशा बालकांना जेवणापासून वंचित ठेवण्यापुरताच त्याचा वापर होत आहे.

त्याशिवाय सार्वजनिक वितरण व्यवस्था, पेन्शन आणि अगदी थेट लाभ हस्तांतरण यासारख्या योजनांसाठी आधारचा उपयोग करण्याचा अनुभव समाधानकारक नाही. ३० टक्के लाभार्थींना अधिकृत लाभार्थी असल्याचे सिद्ध करण्यात समस्या, मोबाईल नेटवर्क, वीजपुरवठा आणि अनेक प्रकारांशी संबंधित समस्यांना सामोरे जावे लागत असल्याच्या तक्रारी आहेत.

मध्यान्ह भोजन योजनेतील भ्रष्टाचार कमी करुन उत्तरदायित्व वाढवण्यासाठी सामुदायिक देखरेख, सामाजिक ऑडिट, विकेंद्रित तक्रार निवारण व्यवस्था, लाभार्थी आणि जेवणाच्या बेताच्या माहितीचे सार्वजनिक प्रदर्शन इत्यादी परिचित व परिणामकारक साधने आहेत जी उपलब्ध करुन देण्याची गरज आहे. या संदर्भात ही अधिसूचना म्हणजे समाजातील मुलांप्रती असलेल्या सातत्यपूर्ण बेपर्वाईवरच प्रकाश टाकणारी आहे.

या आदेशाचा असा अर्थ होतो की प्रत्येक मुलाला तो लाभार्थी आहे हे सिद्ध करण्याची प्रक्रिया जेवण देण्यापूर्वी रोज पार पाडली जाणार आहे? तंत्रज्ञान अपयशी ठरले तर काही मुलांना जेवण नाकारले जाणार का? या अकार्यक्षमतेबढ़द्दल मग कुणाला जबाबदार ठरवणार?

मध्यान्ह भोजन योजनेतील भ्रष्टाचार कमी करुन उत्तरदायित्व वाढवण्यासाठी सामुदायिक देखरेख, सामाजिक ऑडिट, विकेंद्रित तक्रार निवारण व्यवस्था, लाभार्थी आणि जेवणाच्या बेताच्या माहितीचे सार्वजनिक प्रदर्शन इत्यादी परिचित व परिणामकारक साधने आहेत जी उपलब्ध करुन देण्याची गरज आहे. या संदर्भात ही अधिसूचना म्हणजे समाजातील मुलांप्रती असलेल्या सातत्यपूर्ण बेपर्वाईवरच प्रकाश टाकणारी आहे. मुलांचे आरोग्य आणि शिक्षणाचा दर्जा याबाबतीतील दयनीय आकडेवारीपासून ते त्यांच्याविरोधातील हिंसाचाराची पातळी आणि इतर केला जाणार अन्याय पाहता मुले व त्यांच्या हक्कांकडे प्रचंड दुर्लक्ष करण्यात सातत्य राखण्यात येत आहे. चांगली कामगिरी दर्शवलेल्या एका कार्यक्रमातही आम्ही सकारात्मक ऐवजी नकारात्मक परिणाम होईल अशी राजवट थोपवत आहोत. मुलांना खलनायक ठरवून जे केले गेले आणि भ्रष्टाचार, पारदर्शकता व जबाबदारीचे ओझे त्यांनी बाळगावे अशी अपेक्षा करण्याऐवजी मुलांसाठी स्वागतार्ह, पोषक वातावरण तयार करण्याच्या प्रक्रियांद्वारे मुलांच्या कल्याणाची हमी, मुलांना शिजवलेल्या गरम अन्नाची अपेक्षा करता येईल, उत्कृष्ट शिक्षण मिळेल, शिक्षकांच्या आणि मुले ज्यावर अवलंबून आहेत अशांच्या मूलभूत मानवी प्रेरणांना आवाहन केले जाईल, यासाठी मार्ग शोधण्यावर आम्ही लक्ष केंद्रित करण्याची वेळ आली आहे. लोकशाही राज्य म्हणून आमचे नागरिक, विशेषतः मुले यांच्याशी असलेल्या सामाजिक कराराबरोबर आम्ही कुठे भरकटत जात आहोत याचा विचार बंद करण्याची वेळ आली आहे. डिजिटल पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांनी पछाडलेल्या मानसिकतेसाठी आम्ही त्यांच्या सामाजिक सुरक्षेचा बळी देणार आहोत काय?

■■■

लेखिका सेंटर फॉर पॉलिसी रिसर्च येथे कार्यरत असून शिक्षण आणि धोरणविषयक अनेक महत्वाच्या समित्यांवर त्यांनी काम केले आहे.
email: kiran.bhatty@cprindia.org

उपेक्षित वंचित घटकांपर्यंत योजना लाभ पोचविण्यासाठी विशेष प्रयत्न

राजकुमार बडोले

समाजाच्या तळागाळापर्यंत योजना पोहचाव्यात, त्यांचा लाभ सर्वच घटकांना मिळावा, यासाठी सामाजिक न्याय विभागाने विशेष प्रयत्न सुरू केले आहेत. सामाजिक न्याय विभागामार्फत समाजातील ज्येष्ठ, दिव्यांग, विद्यार्थी, बेघर कुटुंबे अशा विविध घटकांसाठी रमाई आवास योजना, कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजना, श्रावणबाळ योजना, संजय गांधी निराधार योजना, दिव्यांगांसाठी विशेष सहाय्य आदी विविध योजना राबविल्या जातात.

आरक्षणाचे जनक राजर्षी शाहू महाराज यांचा जयंती दिवस हा महाराष्ट्र शासनाने सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. यातूनच राज्य शासनाची सामाजिक सक्षमीकरणासंबंधीची भूमिका स्पष्ट दिसून येते. गेल्या दोन ते तीन वर्षात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या माध्यमातून राज्य शासनाने समाजातील वंचितांच्या न्यायासाठी, त्यांच्या सबलीकरणासाठी ठोस पावले उचलण्यास सुरुवात केली. त्याला आता योग्य दिशा मिळत असल्याचे दिसून येत आहे.

समाजाच्या तळागाळापर्यंत योजना पोहचाव्यात, त्यांचा लाभ सर्वच घटकांना मिळावा, यासाठी सामाजिक न्याय विभागाने विशेष प्रयत्न सुरू केले आहेत. सामाजिक न्याय विभागामार्फत समाजातील ज्येष्ठ, दिव्यांग, विद्यार्थी, बेघर कुटुंबे अशा विविध घटकांसाठी रमाई आवास योजना, कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजना, श्रावणबाळ योजना, संजय गांधी निराधार योजना, दिव्यांगांसाठी विशेष सहाय्य आदी विविध योजना राबविल्या जातात.

समाजातील दुर्लक्षित, उपेक्षित घटकांना मदत करण्यासाठी योजना राबविण्यात येत आहेत. विशेष सहाय्य योजनेअंतर्गत राज्यातील निराधार व्यक्तिंना संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत मिळणाऱ्या अनुदानात ६०० रुपयावरून ७०० रुपये अशी वाढ करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतल्याने निराधार व्यक्तिंना त्याचा दिलासा मिळणार आहे. ही वाढ अपुरी असल्याची जाणीव आहे. त्यामुळे यामध्ये आणखी भरघोस वाढ व्हावी, यासाठी पाठपुरावा सुरू असून लवकरच सकारात्मक निर्णय होईल, अशी आशा आहे. तसेच श्रावणबाळ राज्य निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी विधवा निवृत्ती योजना आदी विविध माध्यमातून समाजातील निराधार, वंचितांना आधार देण्याचे काम सुरू आहे. या विविध योजनांमध्ये बदल करून भरीव वाढ करण्याचा प्रयत्न सुरु आहे. तसेच हा निधी थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा व्हावा यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. आतापर्यंत १२ जिल्ह्यांत अशा प्रकारे थेट लाभ देण्यात येत आहे.

मागासवर्गीय समाजात अजूनही

अनेक नागरिक शेतमजूर म्हणून काम करतात. अशा अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील दारिद्र्य रेषेखालील भूमिहीन शेतमजूरांना दोन एकर ओलीताखालील किंवा चार एकर कोरडवाहू शेतजमीन कसण्यासाठी उपलब्ध करुन देवून त्यांची अर्थिक उन्नती व सामाजिक स्तर उंचविण्याचा प्रयत्न कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनेद्वारे केला जातो. या योजनेची व्याप्ती वाढविण्याचा विचार राज्य शासन करत आहे. जेणेकरून जास्तीत जास्त लोकांना याचा फायदा होईल.

दिव्यांगांना समाजात सक्षमपणे उभे राहता यावे, यासाठी विभागाने अनेक महत्त्वपूर्ण योजना सुरू केल्या आहेत. दिव्यांगासाठी राखीव असलेला चार टक्के निधी खर्च होण्यासाठी जिल्हा व तालुकास्तरीय समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. तसेच दिव्यांग खेळाडूंना राज्य शासनाच्या सेवेत थेट नोकरी देणे, शबरी व रमाई आवास योजनेमध्ये दिव्यांगासाठीच्या दारिद्र्य रेषेची अट शिथिल करणे, पॅराऑलंम्पिक स्पर्धेत यश मिळविलेल्या दिव्यांग खेळाडूंना दिव्यांग खेळरत्न पुरस्काराने सन्मानित करणे, विशेष शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी जिल्हास्तरीय दर्जा सुधार समितीची स्थापना, दिव्यांगांच्या कर्मशाळेत कार्यरत कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन योजना लागू करणे, आदी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत.

तसेच पुढील काळात दिव्यांगांना अपंगत्वाचे संगणकीय प्रमाणपत्र त्वरित मिळावे, यासाठी 'मिशन झिरो पेंडन्सी' सुरू करण्यात आले आहे. हे मिशन आता राज्यभर राबविण्याचा प्रयत्न आहे. तर अनाथ वयस्क मतिमंद मुलांसाठी आधारगृहाची स्थापना व मूकबधिर विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी विशेष महाविद्यालये सुरू करण्याचाही विचार आहे. दिव्यांगासाठी सामाजिक न्याय विभागाने केलेल्या कार्याची दखल घेऊन केंद्र सरकारने दिव्यांग राष्ट्रीय पुरस्कार देऊन सन्मानित केले.

गेल्या अडीच-तीन वर्षात विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्तीची रक्कम वेळेत मिळावी, यासाठी प्राधान्याने लक्ष दिले आहे. राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शुल्क प्रतिपूर्तीसाठी पालकांची उत्पन्न मर्यादा साडेचार लाखावरून ६ लाख करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. राज्यातील सुमारे दीड लाखाहून अधिक विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार आहे. गेल्या अनेक वर्षापासूनची मागणी पूर्ण करण्याचा आनंद वाटत आहे. मागासवर्गीय शासकीय विद्यार्थी वसतिगृहात अभियांत्रिकी व पॉलिटेक्निक विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासंदर्भात निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार आहे. तसेच अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशी शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत पीएच.डी. अभ्यासक्रमाचा कालावधी कमाल चार वर्ष किंवा यापेक्षा कमी असलेल्या प्रत्यक्ष कालावधीस मंजुरी देण्यात आली आहे. त्याच बरोबर ज्या विद्यार्थ्यांना वसतीगृहात प्रवेश मिळाला नाही, अशा विद्यार्थ्यांसाठीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना घोषित करण्यात आली आहे. या योजनेद्वारे देण्यात येणारे अनुदान अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट वितरीत करण्यात येणार आहे. तसेच मागासवर्गीय समाजातील जास्तीत जास्त तरूणांनी उद्योजक व्हावेत, यासाठी लक्ष केंद्रीत केले आहे. यासाठी योजना सुरू केली आहे.

दिव्यांगांना अपंगत्वाचे संगणकीय प्रमाणपत्र त्वरित मिळावे, यासाठी 'मिशन झिरो पेंडन्सी' सुरू करण्यात आले आहे. हे मिशन आता राज्यभर राबविण्याचा प्रयत्न आहे. तर अनाथ वयस्क मतिमंद मुलांसाठी आधारगृहाची स्थापना व मूकबधिर विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी विशेष महाविद्यालये सुरू करण्याचाही विचार आहे. दिव्यांगासाठी सामाजिक न्याय विभागाने केलेल्या कार्याची दखल घेऊन केंद्र सरकारने दिव्यांग राष्ट्रीय पुरस्कार देऊन सन्मानित केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारानुसार राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध जातीतील विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घ्यावे, त्यातही या समाजातील विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणाची संधी मिळावी, यासाठी राज्य शासन नेहमीच प्रयत्नशील आहे. त्यासाठी अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणासाठी राज्य शासनाच्या वतीने शिष्यवृत्ती देण्यात येते. गेल्यावर्षी ७५ विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणासाठी पाठविण्यात आले आहे. यंदाही जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी मदत करण्यात

येणार आहे.

विद्यार्थ्यांसाठी छत्रपती शाहू महाराज यांच्या नावाने शिष्यवृत्ती सुरू केली तसेच अनुसुचित जातीतील ५० महिलांना एम.फिल व पीएच.डीसाठी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नावाने कनिष्ठ संशोधकासाठी २५ हजार तर वरिष्ठ संशोधकांसाठी २८ हजार रुपयांची फेलोशिप सुरू केली आहे. यामुळे अनुसूचित जातीतील महिलांना उच्च शिक्षणासाठी मदत होत आहे. उच्च शिक्षण घेणाऱ्या ५० विद्यार्थ्यांसाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या नावानेही एम.फील व पीएच.डी.साठी फेलोशिप सुरू केली.

अनुसूचित जाती, जमातीतील घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणावे, यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. या समाजातील तरुणांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येत आहे. जिल्हास्तरापर्यंत असे प्रशिक्षण आयोजित करत आहोत. तसेच या युवकांना महामंडळाच्या माध्यमातून कर्ज उपलब्ध करून देण्याचाही प्रयत्न आहे. यासंबंधी विविध १५ संस्थांशी करार करण्यात आले आहेत. या माध्यमातून तरुणांना कौशल्य प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम करण्याचे ध्येय आहे.

अनुसूचित जाती, जमातीतील जास्तीत जास्त तरुणांनी सनदी सेवेत प्रवेश करावा, त्यासाठी त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे, म्हणून त्यांच्यासाठी औरंगाबाद, पुणे, नागपूर येथे केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या तयारीसाठी अनुसुचित जाती प्रवर्गातील ५० तरुणांना मोफत निवासी प्रशिक्षण केंद्र सुरू केले. तसेच दिल्लीतही नामांकित साईराम-वाजीराम सारख्या प्रशिक्षण केंद्रात दरवर्षी ५० विद्यार्थ्यांचे मोफत प्रशिक्षण सुरू केले. यातून यावर्षी १४ विद्यार्थी भारतीय सनदी सेवेत दाखल झाले आहेत.

राज्यातील ज्येष्ठ नागरिकांकरीता

अनुसूचित जाती, जमातीतील जास्तीत जास्त तरुणांनी सनदी सेवेत प्रवेश करावा, त्यासाठी त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे, म्हणून त्यांच्यासाठी औरंगाबाद, पुणे, नागपूर येथे केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या तयारीसाठी अनुसुचित जाती प्रवर्गातील ५० तरुणांना मोफत निवासी प्रशिक्षण केंद्र सुरू केले. तसेच दिल्लीतही नामांकित साईराम-वाजीराम सारख्या प्रशिक्षण केंद्रात दरवर्षी ५० विद्यार्थ्यांचे मोफत प्रशिक्षण सुरू केले. यातून यावर्षी १४ विद्यार्थी भारतीय सनदी सेवेत दाखल झाले आहेत.

कल्याणकारी धोरण तयार करण्यात आले असून या धोरणानुसार जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय समित्यांचे गठण करण्यात आले आहे. या धोरणामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी समुपदेशन केंद्र, विरंगुळा केंद्र, आरोग्य सुविधा केंद्र, तक्रार निवारण केंद्र, तसेच वृध्दाश्रमांना अद्यावत सुविधायुक्त करण्यात येत आहे. ज्येष्ठ नागरिकांना आत्मसन्मानाने जीवन जगता यावे यासाठी अनेक तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. ज्येष्ठ नागरिकांसाठी वयोमर्यादा ६५ वर्षांवरून ६० वर्षे करण्याबाबतची कारवाई जलद गतीने सुरू आहे. ज्येष्ठ नागरिक धोरणाच्या मसुद्यावर तज्ज्ञ, नागरिक, या क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते यांच्या सूचना आल्यानंतर त्याचे अंतिम प्रारुप तयार होईल. या धोरणाची काटेकोर अंमलबजावणी होईल, याकडे स्वतः लक्ष देणार आहे.

समाजातील जातीय तेढ कमी करण्यासाठी समाजातील जाती व्यवस्था नष्ट व्हावी, यासाठी विभागाच्यावतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. राजर्षी शाहू महाराजांनी करवीर संस्थानात आंतरजातीय विवाहासंदर्भात धाडसी पाऊल उचलले होते. याचा आदर्श घेऊनच राज्यात आंतरजातीय विवाहाचा कायदा करण्यासंदर्भात विचारमंथन सुरू होते. त्यातून आंतरजातीय विवाह कायद्याचा मसुदा तयार केला असून त्यावर आता प्रक्रिया सुरू आहे.

राज्यातील निराधार, वंचित, उपेक्षित घटकांना न्याय देऊन त्यांना समाजात जगण्याचे बळ देण्याचे काम सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनाद्वारे सुरू आहे. येत्या काळात या योजना अधिक लोकाभिमुख करण्यासाठी व थेट तळागाळापर्यंत लाभ पोहचावे, यासाठी विशेष लक्ष देण्याचे ठरविले आहे.

■■■

लेखक महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे मंत्री आहेत.

email: rajkumar.badole.nic.in

सर्वांसाठी आरोग्य आणि भारत

प्रा. के सीता प्रभू

आरोग्य सुरक्षितता ही वैश्विक आरोग्यसेवेशी जटिलतेने जुळली गेली आहे. शिवाय अल्मा अटा जाहिरनाम्याचे पालन करत असता सन २००० पर्यत सर्वांसाठी आरोग्य प्राप्त करण्याच्या उद्‌देशाने त्यास मुख्य महत्व मिळाले आहे. ध्येयाने प्रेरित आणि आयसीएसएसआर-आयसीएमआर अहवाल १९८१ ने सूचित केल्याने, भारत सरकारने १९८३ मध्ये आपले राष्ट्रीय आरोग्य धोरण जाहीर केले. ते कालांतराने राष्ट्रीय आरोग्य धोरण २००२ या नावाने प्रसिध्द झाले. २००५ मध्ये आरंभ झालेले राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन (एनएचआरएम) हे देशात प्राथमिक आरोग्य सेवेचे पुनरुज्जीवन करण्यासाठी सुरु करण्यात आले होते.

सुरक्षा संकटाच्या तसेच आर्थिक अस्थिरतेच्या काळात सामाजिक सुरक्षा या विषयाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त होते. १९४२ मध्ये स्थापन केलेल्या- ऐतिहासिक बेव्हरीज समितीच्या अहवालात “गरजांपासून मुक्तता’ अशी त्याची व्याख्या केलेली आढळते. या व्याख्येचा कधीही पाठपुरावा केला गेला नाही. आणि जागतिक कामगार संघटनेच्या १९५० च्या परिषदेनुसार अधिक कार्यशील परंतु संकुचित अशा अंगाने ‘आकस्मिक निवारणाचा एक भाग‘ म्हणून याकडे पाहिले गेले. १९८९ मध्ये, ड्रेझ आणि सेन यांनी विकसनशील देशांच्या अनुषंगाने या व्याख्येचा विस्तार केला, त्याचा पुनरुच्चार प्रभू यांनी करताना म्हटले आहे की, भारताच्या हितार्थ जे असेल तीच सामाजिक आर्थिक सुरक्षा होय, जे सामाजिक क्षमतेचे संवर्धन आणि आर्थिक सुरक्षेची खात्री देईल. आरोग्य हा ह्या व्यापक संकल्पनेचा गाभाच होय.

सर्वांसाठी आरोग्य

आरोग्य सुरक्षितता ही वैश्विक आरोग्यसेवेशी जटिलतेने जुळली गेली आहे. शिवाय अल्मा अटा जाहिरनाम्याचे पालन करत असता सन २००० पर्यत सर्वांसाठी आरोग्य प्राप्त करण्याच्या उद्‌देशाने त्यास मुख्य महत्व मिळाले आहे. ध्येयाने प्रेरित आणि आयसीएसएसआर-आयसीएमआर अहवाल १९८१ ने सूचित केल्याने, भारत सरकारने १९८३ मध्ये आपले राष्ट्रीय आरोग्य धोरण जाहीर केले. ते कालांतराने राष्ट्रीय आरोग्य धोरण २००२ या नावाने प्रसिध्द झाले. २००५ मध्ये आरंभ झालेले राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन (एनएचआरएम) हे देशात प्राथमिक आरोग्य सेवेचे पुनरुज्जीवन करण्यासाठी सुरु करण्यात आले होते. अनेक धोरणात्मक पुढाकार घेतल्यानंतरसुध्दा सर्वांसाठी आरोग्य हा एक अपूरा राहिलेला कार्यक्रम आहे. अल्प उत्पन्न असणाऱ्या बांग्लादेश सारख्या देशांच्या पंक्तीमध्ये भारत उभा आहे. त्याचप्रमाणे महत्वपूर्ण अशा आरोग्याच्या एमडीजी च्या उद्‌दीष्ट्यांपासून दूरही आहे.

भारताची आरोग्ययंत्रणा विकासाचे आगळे रुप दाखवते, जे आता देशात मूळ धरु लागले आहे. उच्च उत्पन्न आणि आर्थिक असमानता ही आरोग्य सेवेच्या द्वितीय तथा तृतीय स्तरावरच्या औपचारिक सेवेच्या विषम स्वरुपात प्रतित होते आहे. प्राथमिक सेवांवर आणि प्रतिबंधात्मक सेवांवर दुर्लक्ष होत आहे. खरेतर ह्या सेवा गरिबांस जगण्यासाठी अत्यावश्यक आहेत. २००८ च्या जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार, ५.२ दशलक्ष भारतीय हे असंसर्गजन्य रोगांमुळे मरण पावले. म्हणजेच एकूण देशातील जनतेच्या ५३% हा आकडा होय. उत्पन्न आणि आर्थिक तफावतीचा एकूण परिणाम ग्रामीण तथा शहरी, राज्यीय आणि इतर सामाजिक गटांमध्ये देखील दिसून येत आहे. सन २०१५ मध्ये, युएनडीपीमार्फत मोजल्या गेलेल्या भारतीय आरोग्य सूचीनुसार आरोग्याची गणती २४ % अंकानी नीचांकी दिसली त्यावरुन ही असमानता अधोरेखित होत आहे.

य़ापुढे असे निदर्शनास येते की, प्राथमिक तसेच प्रतिबंधात्मक आरोग्य सेवांच्या बाबतीत राजकीय बांधिलकी कमी आहे. शिक्षणाप्रमाणे या क्षेत्राचे महत्व नाही. निवडणुकांच्या दृष्टीकोनातून आरोग्य ही कधीही महत्वपूर्ण बाब बनली नाही. आंध्रप्रदेशातील उदाहरण डोळयासमोर असतानाही खूप मोठे भवितव्य असलेल्या या विषयाला राज्यकर्त्यांकडून निवडणुकांच्या दृष्टीकोनातून या विषयाकडे पाहिले गेले नाही. सामान्यत याच औदासिन्याचे प्रतिबिंब अर्थसंकल्पीय तरतूदीच्या वेळीही दिसून येते. अर्थव्यवस्था उत्कृष्ट मार्गक्रमण करत असतानाही गेल्या दशकभरात सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या केवळ १.५% इतकीच तरतूद आरोग्यासाठी केलेली दिसून येते. याचाच अर्थ असा की आरोग्यावरील ७५% खर्च हा स्वत:च्या खिशातूनच करावा लागत असल्याने आपत्तीजनक परिस्थितीत अनेकजण दारिद्र्य रेषेखाली ढकलले जातात.

अर्थव्यवस्था उत्कृष्ट मार्गक्रमण करत असतानाही गेल्या दशकभरात सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या केवळ १.५% इतकीच तरतूद आरोग्यासाठी केलेली दिसून येते. याचाच अर्थ असा की आरोग्यावरील ७५% खर्च हा स्वत:च्या खिशातूनच करावा लागत असल्याने आपत्तीजनक परिस्थितीत अनेकजण दारिद्र्य रेषेखाली ढकलले जातात.

भारतातील आरोग्यविमा

ब्राझिल, बोलिव्हिया, इंडोनेशिया आणि थायलंड या साऱ्या देशांचे वैशिष्ट्य असे की, येथे आरोग्यासंदर्भात मोठ्या प्रमाणावर असमानता होती. १९८० सालापासून त्यांनी त्यामध्ये सार्वत्रिक सुधारणा केल्या.आपली आरोग्य विषयक धोरणे बदलली. थायलंडमधील ३० बाहट योजना, इंडोनेशियामध्ये केलेले आरोग्य सेवांचे विकेंद्रीकरण आणि सामाजिक आरोग्य योजना, ब्राझिल मधील सर्वंकष आरोग्य प्रणाली ही याची उदाहरणे या देशांनी कशाप्रकारे आपल्या देशातील आरोग्य सेवांसाठी आघाडी घेतली आहे हे दर्शवतात. या देशांनी घालून दिलेली ही उदाहरणे प्राथमिक आरोग्यसेवा यंत्रणेची बळकटी ही जागतिक आरोग्य व्याप्ती प्राप्त करण्याच्या उद्देश्याने प्रथमावश्यक बाब आहे, हे स्पष्ट करतात.

आरोग्य विम्याची सुरुवात भारतात कर्मचारी राज्य विमा योजना (ईएसआयएस) आणि केंद्रीय शासन आरोग्य योजना (सीजीएचएस) येथून झाली. या दोन्ही योजनांचा सरकारी नोकरांमध्ये आणि त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्यांमध्ये प्रसार झाला आहे. ह्या योजना द्वितीय आणि तृतीय स्तरावरील आरोग्य सेवांवर लक्ष केंद्रीत करतात व सरकारी नोकरी करणाऱ्या भारतीय नोकरदारांच्या एकूण संख्येच्या १०% जनतेला सेवा पुरवतात.

ग्रामीण भागातील गरीब आणि गरजू भागांतील स्त्रियांसाठी जननी सुरक्षा योजना ही सन २००५ मध्ये घोषित झाली. ही योजना सशर्त असल्याने अटींची पूर्तता करणाऱ्या लाभार्थींना त्यांच्या खात्यावर रोख रक्कम मिळते. गरीब राज्यांमधून रुग्णालयीन प्रसूतींना यामुळे प्रोत्साहन मिळाला मात्र जननी मृत्यूदरात यामुळे घसरण झाली नाही.

राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना(आरएसबीवाय) ही सन २००८ मध्ये जाहीर झाली. या योजनेअंतर्गत संवेदनशील समाज घटकांना आपतीजनक आरोग्यखर्चाकरिता आर्थिक मदत देण्यात येते. शिवाय दारिद्र्यरेषेखालील जनतेला उत्तम

दर्जाची आरोग्यसेवा पुरवण्यात येते. प्रथमत ही योजना दारिद्र्यरेषेखालील जनतेला समोर ठेवून बनविण्यात आली होती मात्र पश्चात् ती हातगाडी ओढणारे आणि कचरा वेचणारे आदी श्रमिकांसाठी विस्तारली गेली. इस्पितळात दाखल केलेल्या रुग्णांसाठी रु. ३०००० पर्यंतच्या खर्चाची तरतूद केली आहे. वर्षाला प्रत्येक कुटुंबाला ३० रुपये इतके नोंदणी शुल्क द्यावे लागते. सुधारित मर्यादेनुसार ही रक्कम एक लाख रुपये इतकी वाढवण्यात आलेली आहे. ही योजना मार्च २०१६ पर्यंत एकूण ७२.८ दशलक्ष कुटुंबांपैकी ४१.३ दशलक्ष कुटुंबांपर्यंत पोहोचल्याची या अंतर्गत नोंद झाली आहे. या योजनेची व्याप्ती फार कमी कुटुंबांपर्यंत पोहोचली असल्यामुळे केवळ ११.८ दशलक्ष कुटुंबे हा लाभ घेऊ शकली. या क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव हे सांगतो का, जरी ही योजना गरीब जनतेचा आरोग्यविषयक आर्थिक ताण घटवण्यासाठी असली तरीही हे उद्दीष्ट्य अजूनही पुरेसे गाठता आले नाही. याचे कारण असे की, रुग्णांना औषधोपचार तसेच विविध तपासण्या, आणि आरोग्यासाठीचा प्रवास खर्च याकरिता येणाऱ्या खर्चाची तरतूद या योजनेत अंतर्भूत केलेली नाही. केरळ सारख्या राज्यांत स्वास्थ्य योजनेची पूर्तता बऱ्याच प्रमाणात दिसून येते कारण सदरहू योजनेसाठी तेथे पोषक वातावरण आहे.

किमान आठ राज्य शासने, सदरहू योजना अंमलात आणत आहेत. त्यात प्रामुख्याने दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांकरिता वाजपेयी आरोग्यश्री योजना त्याचप्रमाणे यशस्विनी सहकारी कृषी आरोग्य योजना ह्या कर्नाटक राज्यात राबवल्या जात आहेत. तर आंध्रप्रदेशात तसेच तेलंगणामध्ये राजीव गांधी आरोग्यश्री योजना, मुख्यमंत्री आरोग्यविमा योजना ही तामिळनाडू मध्ये तर राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना महाराष्ट्रात प्रभावीपणे राबवली जात आहे. मुख्यमंत्री अमृत योजना ही गुजरातमधील तर संजिवनी कोष ही छत्तीसगढ मध्ये कार्यरत आहे. या सर्वांमध्ये राजीवगांधी आरोग्य योजना आंध्रामध्ये अत्यंत प्रभावी

राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना(आरएसबीवाय) ही सन २००८ मध्ये जाहीर झाली. या योजनेअंतर्गत संवेदनशील समाज घटकांना आपत्तीजनक आरोग्यखर्चाकरिता आर्थिक मदत देण्यात येते. शिवाय दारिद्र्यरेषेखालील जनतेला उत्तम दर्जाची आरोग्यसेवा पुरवण्यात येते.प्रथमत ही योजना दारिद्र्यरेषेखालील जनतेला समोर ठेवून बनविण्यात आली होती मात्र पश्चात् ती हातगाडी ओढणारे आणि कचरा वेचणारे आदी श्रमिकांसाठी विस्तारली गेली.

असून योजनेच्या ८५% कुटुंबे यात समाविष्ट झाली आहेत. योजनेचे हे फलित व्यापक जागतिक आरोग्य उद्दीष्टांच्या समीप आहे. योजनेचा कल पाहता, हृदयविकार, कर्करोग, मूत्रपिंडाचे आजार आणि मूत्रपिंड निकामी होणे यासाठी लोकसंख्येच्या सुमारे ४०% रुग्णांना हा त्रास जाणवतो. पण ऐरणीवर आलेला मुद्दा म्हणजे मुदतीपूर्व जन्माला आलेली मुले श्वसन संस्थेच्या कमजोरीने त्रस्त आहेत वा संग्रहणी, क्षयरोग आणि हृदयरोगाने पिडीत आहेत. त्यांच्याकडे लक्ष देणे गरजेचे असून प्राथमिक स्तरावर तपासण्या आवश्यक आहेत. एकत्रितपणे २०१५ सालापर्यंत कोणत्या ना कोणत्या प्रकारचे आरोग्य संरक्षण, २८० दशलक्ष जनतेला किंवा लोकसंख्येच्या एक चतुर्थांश जनतेला आरोग्य सुविधा पोहोचवण्यात यश आले आहे. शासनाकडून आरोग्यविमा कार्यक्रम राबवला जातो. सी जी एच एम्, इ एस आय एस् इत्यादी. तसेच राज्यांच्या इतर खास आरोग्य विमा योजना आणि सर्वांत महत्वाची आर एस् बी वाय योजना आहेतच. असे असून सुध्दा केंद्र किंवा राज्य सरकारे प्राथमिक आरोग्याकरिता संरक्षण देऊ शकलेले नाहीत. मेघालय राज्य मात्र अपवाद आहे. तेथे काही प्रमाणात मदत दिली जाते. साऱ्या योजना आजार बळावल्यानंतरच्या आहे. प्राथमिक स्वरुपात आजार असतानाची स्थिती यात गणली जात नाही.

पुढील मार्गक्रमण

भारताचे नवे राष्ट्रीय आरोग्य धोरण २०१७ यामध्ये स्पष्ट दिसून येते की शासनाच्या धोरणामध्ये चांगलाच बदल झालेला असून सर्वंकष प्राथमिक आरोग्यावर भर देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे त्याची उपयुक्तता देखील वाढलेली दिसते. त्याचे प्रथम कारण असे की आरोग्याची व्याख्या करताना सुदृढता हा शब्दावर भर दिलेला दिसून येतो.

सुदृढता म्हणजे रोगाची अनुपस्थिती. त्याचप्रमाणे प्राथमिक आरोग्यावर भर देण्यात आलेला असून सार्वजनिक क्षेत्राला यात महत्वपूर्ण भूमिका बजावावी लागणार आहे. आश्चर्याची बाब म्हणजे शासनाने राष्ट्रीय उत्पन्नाच्या २.५% इतकी रक्कम खर्च करण्याचे ठरविले असून हे उद्दीष्टष्य सन २०२५ पर्यंत साध्य केले जाईल. आर्थिक तरतूद करताना खाजगी तसेच सार्वजनिक भागिदारीला बरोबर घेतले जाईल. मात्र याचे पुरावे खास उत्साहवर्धक नाहीत. आणि हे दर्शवतात की जोपर्यंत खूप काटेकोर नियोजन आणि आखणी केली जात नाही, तोवर सार्वजनिक क्षेत्राला दिलेले अनुदान या क्षेत्राला मिळून त्यांची चंगळ होते. आंतरराष्ट्रीय स्तरावरचा अनुभव असे सांगतो की, आरोग्यासाठीचे पर्यावरण जर चांगले असेल तरच आरोग्यासाठीच्या विमा योजना चांगल्या प्रकारे कार्यरत करता येऊ शकतात आणि ही तत्परता फक्त शासनच आणू शकते.'सर्वांसाठी आरोग्य' ही संकल्पना प्रत्यक्षात आणायची असेल तर कठोर परिश्रमाला पर्याय नाही. आणि या करता शासनाने भरभक्कम आर्थिक तरतूद करणे आवश्यक आहे. यामुळे आरोग्यक्षेत्र विस्तारेल आणि त्याचबरोबर कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी सुधारणा घडवून आणाव्या लागतीत.

आरोग्यासाठीचे पर्यावरण जर चांगले असेल तरच आरोग्यासाठीच्या विमा योजना चांगल्या प्रकारे कार्यरत करता येऊ शकतात आणि ही तत्परता फक्त शासनच आणू शकते.'सर्वांसाठी आरोग्य' ही संकल्पना प्रत्यक्षात आणायची असेल तर कठोर परिश्रमाला पर्याय नाही. आणि या करता शासनाने भरभक्कम आर्थिक तरतूद करणे आवश्यक आहे. यामुळे आरोग्यक्षेत्र विस्तारेल आणि त्याचबरोबर कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी सुधारणा घडवून आणाव्या लागतीत.

राव (२०१७) यांनी आर्थिक तरतूदीची व्याप्ती वाढविण्या करिता काही सूचना केल्या आहेत. त्यांच्या अंदाजानुसार आरोग्य सेवा सक्षम करण्याकरिता, पुरेसे आरोग्यदायी वातावरण निर्माण करण्याकरिता राष्ट्रीय उत्पन्नाच्या १ ते १.५ % भांडवली खर्च होणे अपेक्षित आहे. त्याचबरोबर राष्ट्रीय उत्पन्नाच्या १% अधिक खर्च केला तर, सर्वांच्या प्राथमिक, दुय्यम आणि ६०% जनतेने निवडलेल्या तृतीय स्तरावरील उपचारांसाठी सेवा देता येऊ शकतील. या व्यतिरिक्त राष्ट्रीय उत्पन्नाच्या २% इतका भांडवली खर्च आपण करु शकलो तर सार्वजनिक आरोग्यासंदर्भातील सेवांसाठी व्यापक पाठिंबा देता येऊ शकेल, वैद्यकीय कचऱ्याचा निपटारा करता येऊ शकेल, आहार आणि गृहबांधणी करिताही लक्ष देता येईल.

शाश्वत विकास उद्दीष्टये कार्यक्रम २०३०, या मध्ये शासनाने सार्वत्रिक आरोग्य व्याप्तीचे धोरण अंगिकारले असून उदीष्ट्य ३.८ मध्ये याचा उल्लेख आहे. आरोग्य विषयक जागतिक आशा-आकांक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीने भारत महत्वपूर्ण भूमिका बजावू शकतो. भारत सरकारचे सन २०१७ चे राष्ट्रीय आरोग्य धोरण, आणि त्याची अंमलबजावणी करण्याचे घोषणापत्र लिखित तसेच स्फूर्तीदायी आहे. सन २०३० पर्यंत वैश्विक दृष्टीकोनातून 'सर्वांसाठी आरोग्य' हा दीर्घ पल्ला कठीण असला तरी आनंदाने आपण नक्कीच गाठू.

■■■

लेखिका मुंबईतील टाटा सामाजिक विज्ञान संस्थेत मुख्य प्राध्यापक असून सामाजिक विषयातील तज्ञ आहेत.

email: seeta.prabhu@tiss.edu

लेखकांना आवाहन

योजना मासिकासाठी लेख पाठवितांना लेखकांनी UNICODE (Mangal) or KRUTI DEV या फॉन्ट मध्येच आपले लेख पाठवावेत,

हे नम्र आवाहन.

द्रष्टे सरकार भारताचे
भविष्य सुरक्षित करत आहे

साथ आहे, विश्वास आहे
...होत हा विकास आहे

सर्वांसाठीच्या ऊर्जेसाठी ऊर्जा निर्मिती क्षमतेवर भर

क्षेत्र	मार्च 2014पर्यंतस्थापित क्षमता (एम डब्ल्यू)	मार्च 2017पर्यंतस्थापित क्षमता (एम डब्ल्यू)
पवन ऊर्जा	21,042.40	32,304.00
सौर ऊर्जा	2,621.00	12,277.00
लघु जलविद्युत ऊर्जा	3,803.69	4,341.85
जैव ऊर्जा	7,287.08	8,296.08
सौर वीज	9.6 Lakh	20 Lakh
पथदिवे	2.7 Lakh	4.4 Lakh
सौर पंप	11600	1.09 Lakh

कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व आणि उपेक्षितांचे सक्षमीकरण

जतिंदर सिंग

सीएसआरच्या तरतुदींसंदर्भात कायदे करणारा भारत हा जगातील पहिला देश बनला आहे. कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने २००९ मध्ये सीएसआर संदर्भात ऐच्छिक मार्गदर्शक तत्वे जारी केली आहेत. कंपनी कायदा २०१३ सोबत ही मार्गदर्शक तत्वे सुसंगत होती. सीएसआरच्या कक्षेअंतर्गत येणाऱ्या कंपन्या, २०१३ च्या कंपनी कायद्यातील कलम १३५ च्या उपकलम एकमध्ये आहेत.

कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व(सीएसआर) लोकांवर, या ग्रहावर आणि फायद्यांवर निर्माण करत असलेल्या प्रभावाची जबाबदारी घेऊन विविध समुदायांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी विविध संघटनांना प्रोत्साहित करत असते. सीएसआरच्या तरतुदींसंदर्भात कायदे करणारा भारत हा जगातील पहिला देश बनला आहे. कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने २००९ मध्ये सीएसआर संदर्भात ऐच्छिक मार्गदर्शक तत्वे जारी केली आहेत. कंपनी कायदा २०१३ सोबत ही मार्गदर्शक तत्वे सुसंगत होती. सीएसआरच्या कक्षेअंतर्गत येणाऱ्या कंपन्या, २०१३ च्या कंपनी कायद्यातील कलम १३५ च्या उपकलम एकमध्ये आहेत. खालील श्रेणीतील कंपन्यांना सीएसआरमधील तरतुदींचे पालन करणे बंधनकारक आहे.

i) ५०० कोटी रुपये किंवा त्याहून अधिक एकूण मालमत्ता असलेल्या कंपन्या

ii) १००० कोटी रुपये किंवा त्याहून अधिक उलाढाल असलेल्या कंपन्या

iii) ५ कोटी रुपये किंवा त्याहून अधिक नफा कमावणाऱ्या कंपन्या

या संदर्भातील अंदाजांनुसार सुमारे ८००० कंपन्या या कायद्यानुसार सीएसआर तरतुदींच्या कक्षेत आल्या आहेत. गेल्या तीन वर्षात या कंपन्यांनी सीएसआर उपक्रमांवर त्यांच्या सरासरी नफ्याच्या किमान २ टक्के खर्च केलाच पाहिजे, असे या कायद्यात स्पष्ट करण्यात आले आहे. याचा अर्थ असा आहे की दरवर्षी सुमारे १००००-१२००० कोटी रुपये या अंतर्गत खर्च केले जातात. वाढते राष्ट्रीय उत्पन्न आणि त्या अनुषंगाने वाढणारा नफा लक्षात घेतला तर अनिवार्य असलेला हा खर्च दर वर्षागणिक वाढत जाण्याचा अंदाज आहे. कलम १३५ नुसार कंपनी तिच्या संचालक मंडळाची सीएसआर समिती स्थापन करेल, ज्यामध्ये एका स्वतंत्र संचालकासह तीन किंवा अधिक संचालक असतील.परिशिष्ट VII मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे ही समिती सीएसआर उपक्रमांसह कंपनीचे धोरण निश्चित करेल. या कंपन्यांना त्यांची स्वतःची विश्वस्त मंडळे किंवा संस्थांच्या माध्यमातून सीएसआर उपक्रम राबवता येतील किंवा स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने राबवता येतील

किंवा त्यांचा सीएसआर निधी दुसऱ्या कंपनीकडे वळवून हे उपक्रम राबवता येतील.

सीएसआर हे केवळ एक अनुपालन नसून, उपेक्षितांचे जीवनमान उंचावण्यासाठी होणाऱ्या प्रयत्नांना पाठबळ देण्याची एक वचनबद्धता आहे हे या धोरणात सुनिश्चित करण्यात येते.

सीएसआर- सक्षमीकरणाचा अग्रदूत

उपेक्षितांचे सक्षमीकरण म्हणजे त्यांची क्षमता उभारणी करून आणि तिचा विकास करून आणि त्यांच्या जीवनाचा दर्जा सुधारून त्यांच्या सामाजिक, आर्थिक दर्जात केलेली सुधारणा होय. याची प्रमुख जबाबदारी सरकारची आहे, मात्र या योजनांचे स्वरूप, गती आणि इतरांनी अनुकरण करण्याजोगे सर्वोत्तम रिवाज निर्माण करण्यासाठी कॉर्पोरेट क्षेत्राचा पुढाकार आवश्यक आहे.

उद्योग क्षेत्र ते ज्या ठिकाणी आहेत, त्या भागात असलेल्या एखाद्या विशिष्ट समुदायावर आपले लक्ष केंद्रित करतात, जेणेकरून त्यांना त्यांच्यासंदर्भातील विविध समस्या, आव्हाने आणि सीएसआर प्रकल्पांच्या माध्यमातून उपेक्षितांसाठी कोणत्या प्रकारच्या संधी निर्माण करता येतील याचा अंदाज घेता येतो. गेल्या काही वर्षात भारताने अभूतपूर्व विकासाचा अनुभव घेतला आहे. अनेक शतकांपासून विविध समाजघटकांना डावलण्याच्या वृत्तीचा प्रभाव दूर करण्यास आणि उपेक्षितांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी वेळ लागेल आणि त्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील. 'सबका साथ सबका विकास' या सर्वांना सामावून घेणाऱ्या विकासाच्या मंत्राचा उपयोग खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील विकासाच्या मॉडेलना परस्परांशी जोडल्यानंतरच होऊ शकेल. लोकांच्या वाढत्या गरजा भागवण्यासाठी सरकारचे लोकांच्या कल्याणासाठी असलेले अंदाजपत्रक पुरेसे ठरत नाही. उपेक्षितांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजनांची अंमलबजावणी करून सरकार आपल्या परीने आटोकाट प्रयत्न करत असते. मात्र, कमी कालावधीत लोकांच्या कल्याणाचे उद्दिष्ट परिपूर्ण रितीने साध्य करण्यासाठी ते पुरेसे ठरत नाहीत. उपेक्षितांच्या सक्षमीकरणासाठी खाजगी क्षेत्राचा सहभाग महत्त्वाचा आहे.

'सबका साथ सबका विकास' या सर्वांना सामावून घेणाऱ्या विकासाच्या मंत्राचा उपयोग खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील विकासाच्या मॉडेलना परस्परांशी जोडल्यानंतरच होऊ शकेल. लोकांच्या वाढत्या गरजा भागवण्यासाठी सरकारचे लोकांच्या कल्याणासाठी असलेले अंदाजपत्रक पुरेसे ठरत नाही. उपेक्षितांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजनांची अंमलबजावणी करून सरकार आपल्या परीने आटोकाट प्रयत्न करत असते. मात्र, कमी कालावधीत लोकांच्या कल्याणाचे उद्दिष्ट परिपूर्ण रितीने साध्य करण्यासाठी ते पुरेसे ठरत नाहीत.

गरजू लोकांच्या उत्थानासाठी शिक्षण, चरितार्थाची साधने किंवा आरोग्यनिगा या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर निधीची गरज आहे. संयुक्त राष्ट्रांच्या विकास कार्यक्रमाने प्रसिद्ध केलेल्या मानव विकास अहवालानुसार जगातील १८८ देशांमध्ये भारत १३१व्या क्रमांकावर आहे. मानव विकास निर्देशांक हा एखाद्या देशामध्ये मानव विकासासंदर्भातील मुलभूत योजनांच्या सरासरी मोजमापाचा निर्देशांक आहे.

या आकडेवारीत सुधारणा करण्यासाठी केवळ आर्थिक पाठबळच गरजेचे नसून, विविध संबंधितांकडून दिल्या जाणाऱ्या योगदानाचा समावेश असलेला सर्वसमावेशक दृष्टिकोन आवश्यक आहे.

मेक इन इंडिया, स्टार्ट अप इंडिया, स्किल इंडिया आणि डिजिटल इंडियासारख्या कार्यक्रमांना सीएसआर प्रकल्पांद्वारे चालना देता येईल.

उपेक्षितांना सक्षम करण्यामध्ये या कार्यक्रमांचा एकामागोमाग असा सतत सुरू राहणारा प्रभाव निर्माण होतो. कारण या कार्यक्रमांमुळे ते अधिक शिक्षित आणि कुशल होतात आणि मोठ्या प्रमाणावर रोजगार संधी निर्माण होतात.

सीएसआर मार्गाद्वारे कॉर्पोरेट क्षेत्राची भूमिका

सीएसआर उपक्रमांच्या एकत्रिकरणामुळे, अनेक कंपन्या समुदायांच्या चरितार्थांची साधने त्यांना आपल्या पुरवठा साखळीमध्ये आणून निर्माण करत आहेत. नव्या युगाच्या सीएसआरचा पाया घातला गेला आहे. २०१५ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी स्वीकृत केलेली शाश्वत विकासाची १७ उद्दिष्टे कॉर्पोरेट क्षेत्रासाठी सीएसआर उपक्रमांच्या माध्यमातून कृती करण्यासाठी प्रमुख

क्षेत्रे बनल्यामुळे सीएसआर पर्यावरण प्रणालीला चालना मिळाली आहे. सर्वात प्रभावी सीएसआर उपक्रम हे सिद्ध करत आहेत की त्यांची कंपनी कायद्याचे अनुपालन करत असतानाच त्यांच्या गुंतवणुकीमुळे उपेक्षित समुदायांचे सक्षमीकरण होत आहे.

भारताच्या संदर्भात विचार करायचा झाला तर भूतकाळात साक्षरता हा मानवतावादी मॉडेलमधील प्रमुख घटक होता. या युगामध्ये कौशल्यविकास आणि चरितार्थाची निर्मिती यावर प्रमुख भर दिला जात आहे. मुलभूत लेखनक्षमता आणि वाचनक्षमता याच्या पलीकडे शिक्षणाचा विचार होत आहे, तर कौशल्याला महत्त्व प्राप्त झाले आहे. समुदायाच्या तळाशी असलेल्यांना कौशल्यप्राप्त करण्यासाठी होणाऱ्या धोरणात्मक गुंतवणुकीचा थेट परिणाम व्यवसायांच्या तळाच्या स्तरावर होऊ शकतो.

जागतिक आर्थिक मंचाच्या वैश्विक जोखीम आकलन सर्वेक्षण २०१६ नुसार गंभीर सामाजिक अस्थैर्य आणि संरचनात्मक बेरोजगारी किंवा गरजेपेक्षा कमी रोजगार या परस्परांशी संबंध असलेल्या दोन सर्वात मोठ्या जोखमी आहेत आणि परस्परांशी संबध असलेल्या सर्वांमध्ये त्यांचे प्रमाण ५ टक्के आहे.

परस्परसंबंध असलेल्या बाबींच्या ज्ञानामुळे नेत्यांना आकस्मिक घटनांसाठी योजना आखण्यासाठी आणि कृती करण्यासाठी प्राधान्यक्रमाची क्षेत्रे निश्चित करता येतात.

उपेक्षित घटकांसाठी सीएसआर उपक्रम

दिव्यांग व्यक्तींसाठी कौशल्याच्या आणि चरितार्थाच्या संधी:

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले होते की अपंगत्व असलेल्या व्यक्तींमध्ये काही अतिरिक्त क्षमता असतात आणि ते अपेक्षेपेक्षा जास्त सक्षम असतात. त्यामुळे या व्यक्तींसाठी त्यांनी दिव्यांग या शब्दाचा वापर करायला सुचवले होते. जगातील सर्वात जास्त दिव्यांग व्यक्ती भारतात आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार या व्यक्तींचे प्रमाण २.२१ टक्के आहे आणि त्यापैकी बहुसंख्य दिव्यांग व्यक्ती ग्रामीण भागात आहेत. सामाजिक आर्थिक प्रवाहातून वगळले जाण्याचा सर्वात जास्त धोका दिव्यांग व्यक्तींना असतो कारण पायाभूत सुविधा, शिक्षण आणि कौशल्य विकास यांची त्यांच्यासाठी अतिशय कमी उपलब्धता असते. यापूर्वीच्या काळात दिव्यांग व्यक्तींसाठी राबवले जाणारे प्रकल्प मर्यादित स्वरुपाचे होते. मात्र, दिव्यांगांसाठी सीएसआर प्रकल्पांचा समावेश केल्यावर दिव्यांगाना भेडसावणाऱ्या आव्हानांवर योग्य पद्धतीने मात करण्याच्या उपाययोजनांवर या कंपन्या विचार करू लागल्या आहेत.

जगातील सर्वात जास्त दिव्यांग व्यक्ती भारतात आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार या व्यक्तींचे प्रमाण २.२१ टक्के आहे आणि त्यापैकी बहुसंख्य दिव्यांग व्यक्ती ग्रामीण भागात आहेत. सामाजिक आर्थिक प्रवाहातून वगळले जाण्याचा सर्वात जास्त धोका दिव्यांग व्यक्तींना असतो कारण पायाभूत सुविधा, शिक्षण आणि कौशल्य विकास यांची त्यांच्यासाठी अतिशय कमी उपलब्धता असते. यापूर्वीच्या काळात दिव्यांग व्यक्तींसाठी राबवले जाणारे प्रकल्प मर्यादित स्वरुपाचे होते.

स्वयंसहायता गट/बचतगट (एसएचजीएस) आणि सूक्ष्म उद्योगः

ग्रामीण भागात बचत गट आणि सूक्ष्म उद्योगांच्या माध्यमातून स्थलांतर होऊ न देता रोजगार संधी निर्माण करण्याला सीएसआर प्रकल्प चालना देत आहेत. सीएसआर प्रकल्प उत्पादने आणि सेवांसाठी बाजारपेठा आणि सूक्ष्म वित्त पुरवठा उपलब्ध करून देण्यावर लक्ष केंद्रित करू शकतात. ई-कॉमर्स व्यवहारांमुळे उत्पादकांना आणि कारागिरांना त्यांची उत्पादने ऑनलाइन विक्री करण्यासाठी बाजारपेठांशी जोडता येईल. योग्य मार्गदर्शन आणि पाठबळ देऊन हे साध्य करता येईल. बचतगटांसाठी कौशल्य प्रशिक्षणातील नाविन्यपूर्ण सीएसआर मॉडेल राबवून या गटांची क्षमता आणि उत्पादकता वाढवता येईल.

ज्येष्ठ नागरिक संख्याः

भारतात तरुण लोकसंख्येमध्ये वाढ होण्याव्यतिरिक्त, ज्येष्ठ नागरिकांच्या संख्येतही नियमित दराने वाढ होत आहे आणि आजच्या घडीला त्यांचे प्रमाण १० कोटींच्या जवळपास आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या संख्येत वार्षिक ३.८% दराने वाढ होत आहे आणि एकंदर लोकसंख्येमध्ये त्यांचे प्रमाण ८ टक्के आहे. २०५० पर्यंत ज्येष्ठ नागरिकांची संख्या २४ कोटींपर्यंत वाढणार आहे.

ज्येष्ठ नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या सर्वश्रुत आहेत. शारीरिक आणि मानसिक व्याधींबरोबरच त्यांना हालचाली करण्यात येणाऱ्या अडचणी आणि उत्पन्नाची मर्यादित साधने या

समस्या भेडसावत असतात. त्यातच दुय्यम नागरी पायाभूत सुविधांमुळे त्यांच्या समस्यांमध्ये भरच पडत असते, ज्यामुळे त्यांना त्यांची आरोग्यनिगा, निरोगी आयुष्य आणि निवास आदी गरजा पूर्ण करणे एक आव्हान ठरते.

सीएसआरमध्ये केलेल्या नव्या सुधारणांनी वृद्धाश्रम, ज्येष्ठ नागरिकांची काळजी घेणारी केंद्रे आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी अशाच प्रकारच्या इतर सुविधा निर्माण करण्यास सुचवले आहे. परिशिष्ट VII मध्ये सीएसआर उपक्रमाच्या समावेशामुळे ज्येष्ठ नागरिकांची काळजी घेण्याच्या सरकारच्या प्रयत्नांना पाठबळ मिळाले आहे.

झोपडपट्टी विकास

शहरी भागातील वाढत चाललेल्या झोपडपट्ट्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी गृहनिर्माण आणि रोजगारनिर्मिती हे दोन प्रमुख घटक आहेत. २०११ मध्ये झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण ९३ दशलक्ष इतके होते. सीएसआर उपक्रमांमध्ये झोपडपट्टी विकास कार्यक्रमाचा अंतर्भाव केल्यामुळे शहरे झोपडपट्टीमुक्त करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांना पाठबळ मिळाले आहे. स्मार्ट शहरे प्रकल्प सुरू करण्यापूर्वी आपल्या देशाने झोपड्यांच्या समस्येचे निराकरण करणे गरजेचे आहे. शाश्वत आर्थिक विकासासाठी भारताने झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकसंख्येसाठी चांगल्या प्रकारच्या रोजगारसंधी निर्माण करण्याची गरज आहे. झोपडपट्टी विकासाचे उद्दिष्ट ठेवून राबवण्यात येणाऱ्या सीएसआर प्रकल्पांमध्ये उद्योग आणि शहरी गरीब यांना परस्परपूरक फायदे मिळवून देण्याची मोठी क्षमता आहे.

समारोप

आपल्या उद्योगातील वरच्या आणि तळाच्या पातळीवर लक्ष केंद्रित करण्याव्यतिरिक्त व्यावसायिक आणि विचारवंत मानवी विकासाच्या आव्हानांना तोंड देण्याच्या प्रयत्नांमध्येही पुढाकार घेत आहेत. मानवी विकासाचा थेट परिणाम त्यांच्या व्यवसायावर होत असल्याने हा पुढाकार घेतला जात आहे. बड्या व्यावसायिक कंपन्यांनी त्यांची सीएसआर उद्दिष्टे, संघटनात्मक उद्दिष्टांमध्ये सामावली पाहिजेत कारण देशाच्या विकासाच्या जाहिरनाम्यातील एक प्रवाह बनण्याची ही एक उत्तम संधी

Subscription Coupon

[For New Membership / Renewal / Change of Address]

I want to subscribe to :

Yojana : 1 Yr. **Rs. 230/-;** 2 Yrs. **Rs. 430/-;** 3 Yrs. **Rs. 610/-**

(Circle the period of subscription)

DD / MO No. ______________________ date ______________

Name (in block letters) : ______________________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ______________________

____

____

Phone No. / email : ______________________

PIN : ☐☐☐☐☐☐

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

सभासद शुल्क मनी ऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे पाठवावे,

अथवा www.bharatkosh.gov.in/product **येथे ऑनलाईन भरावे.**

आहे. सीएसआरचे अंदाजपत्रक वार्षिक सुमारे १००००-१२००० कोटी रुपयांचे असते, भारत सरकारच्या सामाजिक क्षेत्राच्या विकासाच्या अंदाजपत्रकाच्या आराखड्याच्या तुलनेत ते कमी आहे. त्यासाठी नावीन्यपूर्ण सीएसआर प्रकल्प, जे प्रकल्प लोकसंख्येच्या संदर्भात आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य, मोजमाप करण्याजोगे आणि लोकसंख्येच्या संदर्भात प्रतिकृती तयार करता येण्याजोगे असले पाहिजेत. कॉर्पोरेट कंपन्या त्यांच्या सीएसआर निधीचा काही भाग सीएसआर प्रकल्पांच्या संशोधन आणि विकासाकडे वळवू शकतात. सामाजिक क्षेत्रांच्या मुलभूत समस्या म्हणजे त्यांचे मोजमाप आहे. ही आदर्श मॉडेल शाश्वत प्रभाव निर्माण करण्यासाठी सार्वजनिक क्षेत्राला देता येऊ शकतात. कॉर्पोरेट सामाजिक नवनिर्मितीची वाटचाल कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्वाच्या सोबत झाली पाहिजे. नावीन्यपूर्ण मॉडेलच्या माध्यमातून मूल्यांची परस्परांमध्ये विभागणी झाली तर उपेक्षितांना मुख्य प्रवाहात आणणारा खोल सामाजिक परिणाम साध्य करणे शक्य होईल. कॉर्पोरेट कंपन्या संपत्तीची निर्मिती करत असतात, जिचे रूपांतर सीएसआरच्या अंदाजपत्रकात होते. गरज असते ती मोठ्या प्रमाणावर पसरलेल्या स्रोतांच्या साठ्यांची आणि कॉर्पोरेट क्षेत्राच्या संघटनात्मक क्षमतेची चाचपणी करण्याची आणि त्यानुसार व्यवहार्य व नावीन्यपूर्ण सीएसआर प्रकल्प तयार करण्याची. समावेशक विकासाच्या जाहिरनाम्यात सर्वांसाठी पोषक वातावरण तयार करण्यावर भर आहे, जेणेकरून सर्वांना उत्पादक, निरोगी आणि सर्जनशील आयुष्य उपभोगता येईल. कारण देशाच्या विकासगाथेमध्ये सामूहिक सहभागातून विकासाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. अल्पसंख्य, दलित, आदिवासी, महिला आणि असंघटित क्षेत्रातील कामगार यांसारख्या क्षेत्रांसाठी राबवल्या जाणाऱ्या नियोजनबद्ध सीएसआर प्रकल्पांची भूमिका या क्षेत्रांच्या सामाजिक विकासामध्ये महत्त्वाची मानली जात आहे.

■■■

लेखक नवी दिल्लीस्थित पीएचडी चेंबर ऑफ कॉमर्स अॅण्ड इंडस्ट्रीचे वरिष्ठ सचिव आणि मनुष्यबळ विभागाचे प्रमुख आहेत.

email: jaiinder@phdcci.in

Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

Advertisement & Criculation Manager, Publications Division, Ministry of Information & Broadcasting Room No. 48 to 53, Soochna Bhavan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi - 110003.

Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022-2756 6582 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

सामाजिक सुरक्षेतील आंतरराष्ट्रीय रिती व भारत

चंद्रकांत लहारिया

संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेच्या ठराव २१ ए १९४८ मधील मानवी हक्क सामायिक जाहीरनाम्याच्या कलम २२ अन्वये समाजाचा सदस्य असलेल्या प्रत्येकाला सामाजिक सुरक्षेचा अधिकार आहे, राष्ट्रीय प्रयत्न व आंतरराष्ट्रीय सहकार्यातून सामाजिक सुरक्षा मिळणे आवश्यक आहे. कुणाही व्यक्तीच्या मुक्त विकासाकरिता सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक कल्याण साधणे आवश्यक असते. जाहीरनाम्यातील कलम २३ अनुसार प्रत्येक व्यक्तीला सामाजिक सुरक्षेचे पाठबळ गरजेचे आहे.

सामाजिक सुरक्षा ही संकल्पना वेगवेगळ्या संदर्भाने नेहमी येत असते त्याची वैशिष्ट्येही वेगळी आहेत. सामाजिक संरक्षण, सामाजिक कल्याण व इतर अनेक शब्दांच्या माध्यमातून त्याचा उल्लेख होतो. सामाजिक सुरक्षा ही नेहमी वापरली जाणारी संकल्पना आहे. संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेच्या ठराव २१ ए १९४८ मधील मानवी हक्क सामायिक जाहीरनाम्याच्या कलम २२ अन्वये समाजाचा सदस्य असलेल्या प्रत्येकाला सामाजिक सुरक्षेचा अधिकार आहे, राष्ट्रीय प्रयत्न व आंतरराष्ट्रीय सहकार्यातून सामाजिक सुरक्षा मिळणे आवश्यक आहे. कुणाही व्यक्तीच्या मुक्त विकासाकरिता सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक कल्याण साधणे आवश्यक असते. जाहीरनाम्यातील कलम २३ अनुसार प्रत्येक व्यक्तीला सामाजिक सुरक्षेचे पाठबळ गरजेचे आहे. सामायिक मानवी हक्क जाहीरनाम्याच्या कलम २२ नुसार सामाजिक सुरक्षा हा महत्वाचा विषय मानला जातो.

सामाजिक सुरक्षा संकल्पनेचा उदय

इतिहासकारांनी आतापर्यंत समाट व राजे यांच्या लोककल्याणकारी दृष्टिकोनाचे दस्तावेजीकरण केले आहे. अगदी प्राचीन ते मध्ययुगीन काळातील लोककल्याण योजनांची माहिती त्यात आहे. सामाजिक सुरक्षा या आधुनिक संकल्पनेचा उदय हा एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी झाला. जर्मनीत ही संकल्पना प्रथम सुरू झाली, ऑटोव्हान बिस्मार्क हा जर्मनीचा चॅन्सेलर होता तेव्हा सामाजिक सुरक्षेची संकल्पना मांडली गेली. त्यात कामगारांना भरपाई (१८८४), आजारपण विमा योजना (१८८८), सामाजिक विमा योजना (१९८९) असे अनेक दाखले जर्मनीच्या बाबतीत देता येतील विसाव्या शतकाच्या सुरूवातीला सर्वंकष सामाजिक सुरक्षा योजना तेथे अंमलात होती. त्यावेळी १८९७ मध्ये ब्रिटनने महिला भरपाई कायदा केला. त्यापाठोपाठ राष्ट्रीय विमा कायदा १९११ करण्यात आला. ब्रिटन सरकारने पहिली सामुदायिक सामाजिक सुरक्षा योजना दुसऱ्या महायुद्धानंतर तयार केली. याचे श्रेय विल्यम हेन्री बेव्हरीज यांना जाते. बेव्हरीज हे अर्थतज्ञ व पुरोगामी विचाराचे समाज सुधारक होते. त्यांनी सरकारला बेव्हरीज योजना सादर केली होती. त्यातूनच ब्रिटनची राष्ट्रीय आरोग्य व्यवस्था आकारास आली. आरोग्य सेवा अंमलबजावणीत आजही ती आदर्श मानली जाते. १९०० ते १९२० दरम्यान अमेरिका तत्वज्ञानातील क्रांतीची साक्षीदार ठरली त्यातच वृद्धापकाळ मदत योजना , आर्थिक सुधारणा योजना व सामाजिक सुरक्षा योजना सुरू झाल्या. अमेरिकेने १९३५ मध्ये सामाजिक सुरक्षा कायदा केला. त्यावेळी फ्रँकलीन रूझवेल्ट अध्यक्ष होते, या योजनेतून पुढे सामुदायिक राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा योजना १९४३ मध्ये सुरू झाली. फ्रान्समध्ये १९४६ मध्ये पिअर लॅरॉत यांनी राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा योजना तयार केली त्यात सगळ्या लोकांना सामावून घेतले होते. या

सगळ्या काळात आंतरराष्ट्रीय कामगार संघटना व संयुक्त राष्ट्रे यांनी सामाजिक सुरक्षेच्या आंतरराष्ट्रीय कायद्यांना प्रोत्साहन दिले. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या १९४४ च्या जाहीरनाम्यात सामाजिक सुरक्षा संस्थांनी माहितीची देवाणघेवाण करणे, सहकार्य व आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय कृतीवर भर दिला होता. सामाजिक सुरक्षा उपाययोजना करण्यास देशांना प्रोत्साहन दिले पाहिजे, लोकांना त्यांच्या गरजा भागवण्यास पुरेसे उत्पन्न व वैद्यकीय सुविधा असल्या पाहिजेत असे जाहीरनाम्यात म्हटले होते. १९५२ मध्ये आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने सामाजिक सुरक्षा (किमान मानके) जाहीरनामा मंजूर केला. त्यात सामाजिक सुरक्षेत कुठल्या आपत्कालीन समस्यांचा समावेश असावा याचा विचार केला गेला. हा जाहीरनामा म्हणजे आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या सामाजिक सुरक्षेचा प्रमुख आधारस्तंभ आहे. एकतर तो आंतरराष्ट्रीय जाहीरनामा आहे व दुसरे म्हणजे मूलभत सामाजिक सुरक्षा तत्वांच्या आधारे तयार केलेले ते जगाने मान्य केलेले सामाजिक सुरक्षा निकष आहेत. अनुभवातून जे शिकता येते त्यानुसार सामाजिक सुरक्षा यंत्रणा या लोकांना सामाजिक असुरक्षितता, दारिद्र्य, यापासून वाचवून मानवी आदर व सभ्यता, सामाजिक एकोपा, लोकशाहीचे फायदे प्राप्त करून देणारी आहेत. अनेक आंतरराष्ट्रीय उद्दीष्ट्ये व जाहीरनाम्यात या तत्वांचा वापर केला आहे. सहस्रक विकास उद्दिष्टातही त्याचा समावेश असून शाश्वत विकास उद्दिष्टातही त्यांचा समावेश केला आहे. आधीच्या काही उपक्रमानंतर सामाजिक सुरक्षा उपायांची अंमलबजावणी कमी व मध्यम उत्पन्न गटाच्या देशात कमी होती . त्याआधी काही निवडक देशात त्यांची प्रगती ही जास्त होती. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने २०१४ मध्ये दिलेल्या माहितीनुसार जगात २७ टक्के लोकांना सामाजिक सुरक्षेचे लाभ आहेत. सामाजिक सुरक्षा उद्दिष्टांचा विचार करता त्यात काही आव्हाने आहेत.त्यात शाश्वतता व वैश्विकीकरण यांचा समावेश आहे. अनेक देशात निवडक लोकांमध्येच सामाजिक सुरक्षा योजना सुरू झाल्या. त्यानंतर या लाभांचा विस्तार होत गेला. फार थोड्या योजना या वैश्विक पातळीवर होत्या. कमी व मध्यम उत्पन्न गटातील देशात सामाजिक सुरक्षेसाठी मर्यादित तरतुदी होत्या व यातील लोकसंख्येचे लक्ष्य गटही लहान होते. या योजना कागदोपत्री चांगल्या वाटतात पण त्यात अनेक लोक त्यापासून दूर राहतात. कोणत्या लोकांनी लाभ घ्यायचे आहेत त्यांची ओळख पटवणे हे एक आव्हान आहे, त्यामुळे या योजनांना वैश्विकता राहत नाही. लाभधारक लोकसंख्या जास्त असावी यासाठी राजकीय चढाओढ सुरू असते शिवाय या योजनांचा नेहमी विस्तारही करणे व नियमितपणे फेरआढावाही घेणे आवश्यक असते. लोकांच्या अपेक्षा व देशाची आर्थिक क्षमता यांचा मेळ घालावा लागतो. शाश्वततेच्या दृष्टिकोनातून सामाजिक सुरक्षा योजना या वेगवेगळ्या देशात वेगवेगळ्या असतात यात लोकसंख्या व आर्थिक उद्दिष्टांचे अंदाज २०५० पर्यंत निश्चित केले आहेत. अनेक विकसित देशात सामाजिक सुरक्षा योजनांचा खर्च एकूण राष्ट्रीय उत्पादनाच्या एक पंचमांश दिसून येतो. आयुमर्यादा वाढत असताना निवृत्तीला पोहोचणाऱ्या लोकांची संख्या वाढत असून निवृत्तीचा खर्च व एकूण देशांतर्गत उत्पादन किंवा उत्पन्न यांचे गुणोत्तर वाढत चालले आहे, त्यामुळे सामाजिक सुरक्षा योजनांचा खर्च वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येने या योजनांना फटका बसणार नाही याची काळजी देशांनी घेतली पाहिजे व त्यांची पोच व विस्तार वाढवला पाहिजे ती दोन मोठी आव्हाने यात आहेत. विकसनशील देशात सामाजिक सुरक्षा योजनांची अंमलबजावणी हा महत्वाचा प्रश्न आहे कारण संस्थात्मक क्षमता कमी असून त्यामुळे वंचित लोकांना फायदे दिले जात नाहीत, कारण यातील अनेक लाभार्थी हे असंघटित क्षेत्रात काम करीत असतात व त्यांना या योजनांतून बाहेर रहावे लागते. त्यामुळे फायदेही मिळत नाहीत. योग्य लाभार्थ्यांना लक्ष्य करणे व त्यांच्याकडून पैसे भरून न घेता त्यांना फायदे देणे महत्वाचे आहे. देशाच्या राज्यघटनेला अनुसरून सामाजिक सुरक्षा योजनांच्या तरतुदी ठरवल्या पाहिजेत. सामाजिक सुरक्षा ही अनेक देशांच्या राज्यघटनेतील थेट किंवा अप्रत्यक्ष तरतूद असते, ज्या देशात या तरतुदी स्पष्ट आहेत ते देश अंमलबजावणीत आघाडीवर आहेत.जगात सामाजिक सुरक्षा प्रणाली विकसित केल्याची काही उदाहरणे आहेत. फिनलंडमध्ये जगातील सर्वात सर्वंकष व प्रगत अशी सामाजिक सुरक्षा प्रणाली आहे. तेथे सर्व रहिवासी सामाजिक सुरक्षा योजनेत आहेत. विशिष्ट गटांसाठी वेगवेगळ्या योजनाही आहेत. निवासी लोकांसाठी असलेल्या योजनांना

१९५२ मध्ये आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने सामाजिक सुरक्षा (किमान मानके) जाहीरनामा मंजूर केला. त्यात सामाजिक सुरक्षेत कुठल्या आपत्कालीन समस्यांचा समावेश असावा याचा विचार केला गेला. हा जाहीरनामा म्हणजे आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या सामाजिक सुरक्षेचा प्रमुख आधारस्तंभ आहे. एकतर तो आंतरराष्ट्रीय जाहीरनामा आहे व दुसरे म्हणजे मूलभत सामाजिक सुरक्षा तत्वांच्या आधारे तयार केलेले ते जगाने मान्य केलेले सामाजिक सुरक्षा निकष आहेत.

करातून पैसा पुरवला जातो व त्या स्वयंसेवी संस्था चालवतात. रोजगाराधाराधारित व अर्थार्जन निगडित सामाजिक सुरक्षा योजना या खासगी कंपन्यांकडे किंवा पेन्शन निधीत प्रीमियम भरून राबवल्या जातात. फिनीश सेंटर फॉर पेन्सन्स ही संस्था त्याचे नियंत्रण करते. यात सामाजिक विमा, कल्याण योजना यांचा समावेश असतो. फिनलंडची आरोग्य प्रणाली ही सर्वंकष आहे व ती सामाजिक सुरक्षेचा भाग आहे. सामाजिक सुरक्षा पुढाकार व यंत्रणात जगातील इतर पाच विभागांचा समावेश आहे.

विविध देशातील सामाजिक सुरक्षा प्रणाली काही समान वैशिष्ट्ये दाखवते.

१. बहुदा सर्वच देशात वृद्धापकाळ निवृत्तीवेतन व निवृत्ती लाभ यांचा समावेश आहे. त्यात किमान वेतनाची तरतूदही आहे. अनेक देशांनी अतिरिक्त लोकांनाही त्याचे लाभ

दिले आहेत.

२. अतिरिक्त लोकसंख्येला सामावून घेण्याचे प्रयत्न अपुरे आहेत व चालू फायदे हे सर्वंकष नाहीत.

३. सामाजिक सुरक्षेत आरोग्य सेवेला सामावून घेण्याचा प्रयत्न करण्याच्या आवश्यकतेवर सर्वांचे मतैक्य आहे. पण फार थोड्या देशांनी त्यासाठी प्रयत्न केले आहेत.

४. अनेक देशांनी चांगले प्रयत्न केले त्यात संमीलित योजनांचा समावेश आहे, अंमलबजावणीचे एकात्मीकरण आहे. यात पुरवठादार व खरेदीदार वेगळे आहे. ते स्वतंत्र व स्वायत्त आहेत पण ते सरकारच्या वतीने या सुविधा देत आहेत.

भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहे व त्याला जागतिक आर्थिक मंदीचा फटका बसलेला नाही. कदाचित भारतातील सामाजिक सुरक्षा योजना मजबूत होण्यासाठी हा योग्य काळ असावा. भारताच्या राज्यघटनेतच कलम ४१ व ४२ च्या भाग ४ मध्ये कामाचा अधिकार दिलेला आहे व बेरोजगारीच्या काळात मदत त्याचबरोबर शिक्षणाचा अधिकार दिला आहे. वृद्धापकाळात. आजारपणात, अपंगत्वात मदतीचे आश्वासन आहे. सामाजिक सुरक्षेचे जाळे मजबूत व्हावे यासाठी त्याला कायदेशीर आधारही दिला आहे.

५. संघराज्य रचनेत प्रांत किंवा राज्येच या योजनांची रचना ठरवतात व अंमलबजावणी करतात. राष्ट्रीय पातळीवर सामाजिक सुरक्षा योजनांबाबत मार्गदर्शन केले जाते व सुसंवादासाठी नियम केले जातात.

६. यात नवीन बाबींचा अंतर्भाव केला जात असून माहिती व संदेशवहन साधनाचा वापर करून जास्तीत जास्त लोकांपर्यंत सेवा पोहोचवली जात आहे. त्याच्या जोडीला विविध देशांनी गरज असेल तेथे त्याला कायदेशीर व वैधानिक संरक्षणही दिले आहे.

भारतासाठी सात उपाययोजना

भारताला स्वातंत्र्य मिळून आता सत्तर वर्षे झाली आहेत. बरीच लोकसंख्या तरूण आहे. त्यात लोकसंख्यात्मक लाभाची मोठी अपेक्षा आहे. भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहे व त्याला जागतिक आर्थिक मंदीचा फटका बसलेला नाही. कदाचित भारतातील सामाजिक सुरक्षा योजना मजबूत होण्यासाठी हा योग्य काळ असावा. भारताच्या राज्यघटनेतच कलम ४१ व ४२ च्या भाग ४ मध्ये कामाचा अधिकार दिलेला आहे व बेरोजगारीच्या काळात मदत त्याचबरोबर शिक्षणाचा अधिकार दिला आहे. वृद्धापकाळात. आजारपणात, अपंगत्वात मदतीचे आश्वासन आहे. सामाजिक सुरक्षेचे जाळे मजबूत व्हावे यासाठी त्याला कायदेशीर आधारही दिला आहे. भारतात सामाजिक सुरक्षेची सुरूवात १९२३ मधील कामगार भरपाई कायद्याने झाली , त्यानंतर जास्तीत जास्त लोक या योजनेत आणले गेले, हे सगळे कागदावर छान वाटत असले तरी भारतातील अनेक राज्यात आव्हाने कायम आहेत. जगाच्या इतर भागाप्रमाणे येथेही काही योजनांचे काम पूर्ण क्षमतेने नाही किंवा त्या लोकांपर्यंत व्यवस्थित पोहोचलेल्या नाहीत. ही सगळी परिस्थिती लक्षात घेता भारत पुढील सात उपाययोजना करू शकतो.

सामाजिक सुरक्षा योजनांचा सार्वत्रिकीकरणावर आधारित आराखडा विकसित करणे. आंतरराष्ट्रीय अनुभवावरून असे दिसते की, विशिष्ट लाभार्थींना मदत देण्यासाठी पद्धतशीर योजना असल्या पाहिजेत. या योजना वरिष्ठ पातळीवर पुरेसे कायदेशीर संरक्षण देऊन राबवल्या पाहिजे. यातील मार्गदर्शक आराखडा सरकारने जाहीर करून त्याला सार्वजनिक उत्तरदायित्व दिले पाहिजे. त्याला संस्थात्मक पाठबळ हवे तसेच कार्यक्षमता आणण्यासाठी आधार कार्ड, जनधन योजना यासारख्यांचा फायदा सामाजिक सर्वसमावेशकतेसाठी करायला हवा. योजनांच्या अंमलबजावणीत त्याचा उपयोग केला तर योग्य व्यक्तींना त्याचा फायदा होऊ शकेल.

स्वायत्त राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा संघटना स्थापन करण्यात यावी. जगातील अनेक देशांनी सामाजिक सुरक्षा योजनांसाठी स्वायत्त संस्था स्थापन केल्या आहेत. त्यामुळे

राज्य व राष्ट्रीय पातळीवर अशा संस्था स्थापन करून कार्यक्षमता साधता येईल यात सरकारला धोरण निश्चित करता येईल व काही तरतुदी करता येतील.

सामाजिक क्षेत्रात नवीन पद्धतीने आर्थिक गुंतवणूक करणे आवश्यक आहे. आतापर्यंतच्या अनुभवानुसार सर्वंकष व सामायिक योजनांच्या अंमलबजावणीसाठी एखादा देश श्रीमंतच असावा लागतो असे नाही. सामाजिक सुरक्षेतील गुंतवणुकीने आर्थिक वाढीस मदत होते. लोकसंख्येचे स्वरूप लक्षात घेऊन साधनांची गरज पाहून सामाजिक सुरक्षेसाठी १५ ते २० वर्षांची गुंतवणूक करण्याची गरज आहे. आर्थिक समावेशकतेसाठी नवीन व आश्वासित योजना असल्या पाहिजेत. त्यात शाश्वतता असली पाहिजे. जर निवडक लोकांकडून प्रीमियम घेणे आवश्यक असेल तर त्याला कायदेशीर व घटनात्मक संरक्षण असणे गरजेचे असते.

सार्वजनिक जागरूकता आवश्यक असते. सामाजिक सुरक्षा योजनेत वचनबद्धता राखून वंचित लोकांना लाभ देणे आवश्यक असते. यात श्रीमंत गरिबांना, शिक्षित अशिक्षितांना, असंघटित क्षेत्रातील लोक संघटित क्षेत्रातील लोकांना मदत करू शकतात. यात एकमेकांना मदतीचे आश्वासन आहे. समाजाचा सहभाग आहे. सध्याच्या योजनांची परिणामकारकता वाढू शकते.

सामायिक आरोग्य कव्हरेज ही सामाजिक सुरक्षा उपायातील योजना आहे, यात भारतात वार्षिक ६३ दशलक्ष लोक दारिद्र्य रेषेखाली असून त्यांना आरोग्य खर्चाला तोंड द्यावे लागते. त्यामुळे त्यांची ही अवस्था आहे. जे लोक आधीच दारिद्र्य रेषेखाली आहेत, ते आणखी दारिद्र्यात जातात. दुसऱ्या भाषेत सांगायचे तर सामुदायिक समाज सुरक्षा योजनेतून सध्याच्या योजनेची फलश्रुती वाढते. आपल्याकडे आरोग्यावरील सरकारी खर्च हा एक मोठा मुद्दा आहे. ते प्रमाण केवळ ३० टक्के आहे. लोकांचा आरोग्य खर्च हा जगात भारतात सर्वात अधिक म्हणजे ६५ टक्के आहे. जेव्हा सरकार आरोग्यात गुंतवणूक करते तेव्हा तो सामाजिक सुरक्षेचा भाग बनतो व आरोग्यातील गुंतवणूक एकूण राष्ट्रीय उत्पन्नात सहायक ठरते. आर्थिक वाढीतही त्याचा चांगला अप्रत्यक्ष परिणाम दिसतो. अनेक देशात सामाजिक आरोग्य विम्याच्या माध्यमातून सामायिक आरोग्य योजना राबवल्या जातात.

राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना ही चांगल्या उद्देशांनी सुरू करण्यात आली पण त्याचा वार्षिक खर्च हा भारतातील सरकारी आरोग्य खर्चाच्या एक टक्काही नाही, त्यामुळे या योजनेचा प्रभाव फार कमी आहे. आता प्रस्तावित राष्ट्रीय आरोग्य संरक्षण योजना राबवून त्याला अर्थसहाय्य करण्याची गरज आहे. २०१७ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या राष्ट्रीय आरोग्य धोरणाची अंमलबजावणी करण्याचीही गरज आहे. त्यामुळे सामुदायिक आरोग्य संरक्षण योजनेत चांगले योगदान होईल.

सरकारने आरोग्य व सामाजिक आरोग्य विमा योजनेत गुंतवणूक करणे गरजेचे आहे. राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना ही चांगल्या उद्देशांनी सुरू करण्यात आली पण त्याचा वार्षिक खर्च हा भारतातील सरकारी आरोग्यखर्चाच्या एक टक्काही नाही, त्यामुळे या योजनेचा प्रभाव फार कमी आहे. आता प्रस्तावित राष्ट्रीय आरोग्य संरक्षण योजना राबवून त्याला अर्थसहाय्य करण्याची गरज आहे. २०१७ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या राष्ट्रीय आरोग्य धोरणाची अंमलबजावणी करण्याचीही गरज आहे. त्यामुळे सामुदायिक आरोग्य संरक्षण योजनेत चांगले योगदान होईल.

राज्य सरकारांचे स्वयंनेतृत्व- भारतासारख्या संघराज्य प्रणालीत सरकारचा सामाजिक सुरक्षा उपायात मोठा वाटा असला पाहिजे. त्यातून सामाजिक सुरक्षा योजनात नवीन मार्ग व लवचिकता येते. केंद्र सरकारचे आर्थिक स्त्रोत हे मर्यादित आहेत. पण राजकीय नेतृत्व दूरदृष्टीचे असेल तर या योजनांच्या अंमलबजावणीत फरक पडतो.

वैधानिक व कायदेशीर सुधारणा- सामाजिक सुरक्षा योजनांना शाश्वतता आणण्यासाठी वैधानिक व कायदेशीर पाठबळ लागते. काहीवेळा कराधारित अर्थसाहयाऐवजी जे लोक पैसे देऊ

शकतात त्यांच्या मदतीतूनही या योजना राबवता येऊ शकतात. या योजनांचे व्यवस्थापनही महत्वाचे असते. त्यांची शाश्वतताही एक आव्हान आहे. यात वैधानिक व कायदेशीर तरतुदी गरज पडल्यास आवश्यक आहेत. या प्रक्रियेत विषय तज्ञ व शैक्षणिक क्षेत्रातील तज्ञ तसेच भारतातील धोरण संस्थांना सहभागी करून घ्यायला हवे.

निष्कर्ष

सामाजिक सुरक्षा योजनांची अंमलबजावणी गेल्या काही दशकात सुरू झाली, त्यातून अनेक देशांच्या अनुभवातून काही गोष्टी शिकता येण्यासारख्या आहेत. सामाजिक सुरक्षा योजना हा भारतीय घटनात्मक तरतुदींचा भाग आहे व त्याला देशातील सरकारांनी वेळोवेळी अग्रक्रम दिला आहे, पण तरी या योजना फार मर्यादित लोकांपर्यत पोहोचल्या आहेत. याता जागतिक पातळीवरचे अनुभव भारताला या योजनांची सामायिकीकरण व शाश्वतता यात उपयोगी आहे. सामाजिक क्षेत्रात गुंतवणूक, विविध संस्थांचे एकात्मीकरण व योजना, लोकांची प्रीमियममधील गुंतवणुकीची बांधिलकी, केंद्र व राज्य सरकारांची इच्छाशक्ती याला प्राधान्य देणे आवश्यक आहे. सामाजिक सुरक्षेतेचे महत्व हे शाश्वत विकास उद्दिष्टांच्या दृष्टिकोनातून महत्वाचे आहे. देशातील सामुदायिक आरोग्य संरक्षण योजनातही त्याचा मोठा वाटा आहे.

सामाजिक सुरक्षेच्या जागतिक अंमलबजावणी अनुभवातून भारतासाठी पुढील सात उपाय महत्त्वाचे ठरू शकतात.

१. सामुदायिक आराखड्याचा विकास व सहमती

२. स्वायत्त राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा संघटनेची स्थापना

३. सामाजिक क्षेत्रातील गुंतवणुकीसाठी अभिनव अर्थसाह्य योजना

४. सार्वजनिक जागृती व वचनबद्धता

५. सामुदायिक सामाजिक आरोग्य संरक्षण योजना

६. राज्यांचे स्वनेतृत्व

७. वैधानिक व कायदेशीर सुधारणा

सामाजिक क्षेत्रात गुंतवणूक, विविध संस्थांचे एकात्मीकरण व योजना, लोकांची प्रीमियममधील गुंतवणुकीची बांधिलकी, केंद्र व राज्य सरकारांची इच्छाशक्ती याला प्राधान्य देणे आवश्यक आहे. सामाजिक सुरक्षेचे महत्व हे शाश्वत विकास उद्दिष्टांच्या दृष्टिकोनातून महत्वाचे आहे. देशातील सामुदायिक आरोग्य संरक्षण योजनातही त्याचा मोठा वाटा आहे.

सामाजिक सुरक्षा उपायांचे देशनिहाय निष्कर्ष

ऑस्ट्रेलिया- या देशात सामाजिक कल्याण अर्थसहाय योजनात त्याच व्यक्ती पात्र आहेत ज्यांच्याकडे आर्थिक साधने अपुरी आहेत. ऑस्ट्रेलियात निवृत्त लोक, जोडीदार, मुले, अपंग, बेरोजगार, आजारी व्यक्ती व मुलांची काळजी घेणारे आईवडील हे पारंपरिक लाभधारक आहेत. विद्यार्थी, केअर गिव्हर्स यांनाहील लाभ मिळतात.

चीन- या देशात सामाजिक सुरक्षा योजना या प्रांतांशी निगडित आहेत. त्यात नियम मात्र केंद्र सरकारचे असतात, स्थानिक अधिकारी प्रशासकीय काम करतात. या योजनात चार दशकात अनेक बदल झाले आहेत. अनेक योजना व तरतुदी यात आहेत. काही नियोक्ता व कामगार यांच्या वर्गणीतून आहेत तर काही नियोक्त्याच्या वर्गणीवर आधारित आहेत. त्यात वेतन मर्यादेनुसार वर्गणी असते. सामाजिक सुरक्षा संरक्षणासाठी करायच्या काही तरतुदी आहेत.

क्युबा- या देशात 'दी सोशल सिक्युरिटी सिस्टीम' म्हणजे एसएसएस ही योजना सामायिक आहे व त्यातील खर्च सरकारने उचलला आहे. अनेक विकसित देशांपेक्षा या योजनेची व्याप्ती मोठी असून आरोग्यसेवा मोफत आहे. क्युबात अनेक आरोग्य खर्चाच्या तरतुदी या किफायतशीर आहेत.

जपान- जपानमध्ये सामाजिक सुरक्षा योजना सामायिक असून तेथे प्रत्येक नागरिकास सहभागी होणे सक्तीचे आहे. जपानमध्ये मूलभूत जीवनमान खर्च भागवण्यासाठी मदतीची तरतूद आहे त्यात घर, शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण खर्च, आरोग्य विमा व अंत्यसंस्कार यासाठी मदत दिली जाते. ही योजना इतर देशांना आदर्श अशीच आहे.

फिलीपीन्स - फिलीपीन्समध्ये त्यांची सरकारी सामाजिक सुरक्षा प्रणाली असून त्यात सामाजिक विमा खासगी, व्यावसायिक व असंघटित क्षेत्रातील कामगारांना दिला जातो. त्यात सामाजिक सुरक्षा कार्यक्रम, वैद्यकीय कार्यक्रम, कर्मचारी भरपाई कार्यक्रम असे मुद्दे आहेत. सरकारी सेवा विमा योजनेत सरकारी पेन्शन निधी चालवला जातो, तो सरकारी कर्मचाऱ्यांसाठी आहे.

■■■

लेखक जागतिक आरोग्य संघटनेच्या नवी दिल्ली स्थित कार्यालयात कार्यरत असून सार्वजनिक आरोग्य,सामाजिक सुरक्षा, समावेशन, शाश्वत आणि निरोगी शहरे या क्षेत्रातील तज्ञ आहेत.

email: c.lahariya@gmail.com

शेतकऱ्यांचा सर्वांगिण विकास-वास्तव आणि उद्दिष्ट

निलब्जा घोष

स्वातंत्र्योत्तर अगदी पहिल्या सरकारच्या काळापासून अस्तित्वात आलेल्या कृषी मंत्रालयाने देशातील कृषी क्षेत्राच्या विकासात मोलाची कामगिरी बजावली. कृषी उत्पादनांची वाढ, त्यासंबंधीचे संशोधन व विकास कार्य तसेच देशाच्या अन्नधान्याच्या गरजांची योग्य आपूर्ती करण्याच्या दृष्टीने कृषी मंत्रालयाने वेळोवेळी योग्य धोरणात्मक निर्णय घेऊन त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी केली.

वर्ष २०१५ मध्ये कृषी मंत्रालयाचे नामकरण कृषी व शेतकरी विकास मंत्रालय असे करण्यात आले. मंत्रालयाच्या नावातील बदल ही केवळ कार्यात्मक पुनर्रचना नव्हती तर या नामांतरणाद्वारे कृषी मंत्रालयाच्या कार्यसीमाही विस्तारित झाल्या. नावातूनच हा संदेश पोहचवायचा होता की, शेतीचा विकास करणे व देशातील अन्नधान्याचे उत्पादन वाढवणे केवळ एवढेच कार्य करण्यापर्यंत कृषी मंत्रालय सीमित नसून, या दोन प्रमुख बाबींसह देशातील सर्वसामान्य शेतकऱ्यांना समाजातील इतर लोकांप्रमाणेच चांगले जीवन मिळवून देण्याचा प्रगल्भ दृष्टीकोनातून काम करण्याचे दायित्व नेटाने करण्याची कामगिरी पार पाडण्यासही कृषी मंत्रालय बांधिल आहे.

स्वातंत्र्योत्तर अगदी पहिल्या सरकारच्या काळापासून अस्तित्वात आलेल्या कृषी मंत्रालयाने देशातील कृषी क्षेत्राच्या विकासात मोलाची कामगिरी बजावली. कृषी उत्पादनांची वाढ, त्यासंबंधीचे संशोधन व विकास कार्य तसेच देशाच्या अन्नधान्याच्या गरजांची योग्य आपूर्ती करण्याच्या दृष्टीने कृषी मंत्रालयाने वेळोवेळी योग्य धोरणात्मक निर्णय घेऊन त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी केली. १९६० मध्ये झालेल्या महापूरामुळे देशात मोठ्या प्रमाणात अन्नधान्याचा तुटवडा निर्माण झाला होता. पण अगदी थोड्या कालावधीत या संकटावर मात करत भारताने जगात तांदूळ व दुधाच्या उत्पादनात पहिल्या दोन अग्रेसर देशांच्या यादीत स्थान मिळवत एकूणच अन्नधान्याच्या उत्पादनात स्वयंपूर्णता प्राप्त करण्यात यश मिळवले. यानंतर कृषी धोरणे अधिक व्यापक होत गेली. यात प्रामुख्याने ग्राहकांच्या मागणीनुसार फळे, भाज्या व कडधान्यांचे उत्पादन वाढवण्यावर भर देण्यात आला.

एकीकडे कृषी क्षेत्रात हरितक्रांतीसारख्या क्रांतीकारी संशोधनानंतर प्रचंड उलाढाल होण्यास सुरूवात झाली तरी दुसरीकडे प्राथमिक स्तरावरील शेतकरी वर्गाची परिस्थिती मात्र हालाखीचीच होती. कारण या शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीतून मिळणारे उत्पन्न त्यांना लागणाऱ्या खर्चाच्या पुढे अगदीच तुटपुंजे होते तसेच देशाच्या अर्थव्यवस्थेतील अनिश्चिततेचा फटकाही शेतकऱ्यांना सोसावा लागे.

२००३-०४ मध्ये नॅशनल सॅम्पल सर्वे तर्फे करण्यात आलेल्या सर्व्हेक्षणात असे निरिक्षण नोंदवण्यात आले की, व्यवसाय बदलण्याची संधी व अनुकूल परिस्थिती उपलब्ध झाल्यास, ४० टक्के शेतकरी कुटुंबांना शेतीव्यतिरिक्त व्यवसाय निवडण्याकडे जास्त कल असल्याचे आढळून आले. तसेच २०१४ मध्ये याच संस्थेने केलेल्या सर्वेक्षणातून असेही लक्षात आले की, दैनंदिन आवश्यकतेच्या लहान खर्चांसाठीही अनेक शेतकरी कुटुंबांना शेतीव्यतिरिक्त अन्य लहानसहान पूरक व्यवसायांतील तुटपुंज्या कमाईवर अवलंबून राहावे लागते. सदर लेखातून शेतीची मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांनाही गेली अनेक वर्षांपासून सतावणारे गरिबीचे संकट, त्यांचे हालाखीचे जीवनमान, व अनिश्चित उत्पन्न या काही ठळक परिस्थितीजन्य बाबींवर चर्चा करण्यात आली असून शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यावर सरकारने राबवलेल्या काही पारंपारिक तसेच काही नवीन उपाययोजनांवरही चर्चा करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांच्या उत्पन्नातील तफावत

स्वातंत्र्योत्तर काळात शासनाचा रोख प्रामुख्याने शेती उत्पादन वाढवण्यावर होता. शेतकऱ्यांची हालाखीची परिस्थिती त्यांना शेतीतून मिळणारे तुटपुंजे उत्पन्न या बाबीं पूर्वी दुर्लक्षित राहिल्या. मात्र गेल्या काही वर्षात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या वाढलेल्या संख्येमुळे शेतकऱ्यांच्या जीवनमानाविषयी अनेक अहवाल प्रसिध्द झाले. देशातील अनेक सामाजिक संस्थांसह आंतरारष्ट्रीय स्तरातील अग्रणी संघटनांकडूनही भारतीय शेतकऱ्यांच्या हालाखीच्या जीवनमानाविषयी सर्वेक्षण करण्यात आले. यातून प्रसिध्द झालेल्या माहितीतून सामाजिक स्तरावर शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीबाबत मोठ्या प्रमाणात सामाजिक जाणीव जागृत झाली. २०१३ मध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सत्तेची सूत्रे हाती घेतल्यावर प्रथमतः आपल्या सरकारच्या काही प्रमुख ध्येयधोरणांची घोषणा केली.

भारतात हवामानानुसार शेतीच्या प्रकारांत प्रचंड विविधता आढळते. तसेच देशातील विविध राज्यांत कृषी संबंधी धोरणांतही एकसंधता नाही. परिणामी, पीक उत्पादनाचा दर, शेतीशी संबंधीत पायाभूत सोयीसुविधा व संस्थात्मक संरचना इ. मध्येही तफावत दिसून येते. भारतातील विविध राज्यांत लहान प्रमाणात शेती केली जाते. या प्रकारच्या शेतीवरील खर्च जास्त असून त्यामानाने त्यातून मिळणारे उत्पन्न व उत्पादन दोन्हीही फार कमी असते. या प्रकारच्या शेतीमुळे अर्थव्यवस्थेला बळकटी न मिळता उलट एकूणच व्यवस्थेवर प्रचंड ताण येतो.

यामध्ये २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याबरोबरच देशातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी सरकार प्राधान्याने प्रयत्नशील राहिल, अशी ग्वाहीही पंतप्रधानांनी दिली. या घोषणेपुरते मर्यादित न राहता केंद्र सरकार तर्फे देशातील सर्व राज्य सरकारांना शेतकऱ्यांसाठी विशेष उपाययोजना सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले. याचा परिणाम असा झाला की, आजवर दुर्लक्षित राहिलेल्या शेतकरी वर्गाचे उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने धोरणकर्ते व राज्यकर्ते कामाला लागले. सर्वसाधारणपणे शेतीपासून मिळणारे उत्पन्न अनेक घटकांवर आवलंबून असते. यामध्ये प्रमुख घटक म्हणजे शेत जमिनीची उत्पादकता हा होय. जमिनीपासून जितक्या अधिक प्रमाणात उत्पादन मिळेल तेवढे शेतीपासून मिळणारे उत्पन्न जास्त असे समीकरण आहे. तसेच शेती उत्पन्न वाढीसाठी इतर घटकांची उत्पादकता वाढवणेही तितकेच गरजेचे ठरते. कारण पाणी व किटकनाशके हे दोन घटक बाकी घटकांपेक्षा मर्यादित प्रमाणात उपलब्ध असतात व तुलनेने महागही असतात. शेतीचे एकूण उत्पन्न वाढवण्यासाठी आजच्या काळात शेती तंत्रज्ञान व शेतीच्या पध्दतींमध्ये सुधारणा करणे हा पर्यायही उपयोगी ठरतो.

भारतात हवामानानुसार शेतीच्या प्रकारांत प्रचंड विविधता आढळते. तसेच देशातील विविध राज्यांत कृषी संबंधी धोरणांतही एकसंधता नाही. परिणामी, पीक उत्पादनाचा दर, शेतीशी संबंधीत पायाभूत सोयीसुविधा व संस्थात्मक संरचना इ. मध्येही तफावत दिसून येते. भारतातील विविध राज्यांत लहान प्रमाणात शेती केली जाते. या प्रकारच्या शेतीवरील खर्च जास्त असून त्यामानाने त्यातून मिळणारे उत्पन्न व उत्पादन दोन्हीही फार कमी असते. या प्रकारच्या शेतीमुळे अर्थव्यवस्थेला बळकटी न मिळता उलट एकूणच व्यवस्थेवर प्रचंड ताण येतो. लोकसंख्या वाढ, कमी रोजगारक्षमता असणारे

उद्योगधंदे यामुळे उत्पन्नासाठी शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या वाढते. परिणामी शेतजमिनीवर प्रचंड ताण येतो. तसेच आर्थिकदृष्ट्या लहान शेतकरी कुटुंबांचे दरडोई उत्पन्नही कमी भरते. नैसर्गिक, भौगोलिक, व प्रशासकिय फरकांमुळे भारतात विविध राज्यांत पीक उत्पन्नात भिन्नता आढळते. काही राज्यांत शेती उत्पन्न अधिक चांगले व फायदेशीर असते तर काही राज्यांत ते अतिशय कमी व आर्थिकदृष्ट्या लाभाचे ठरत नाही. असे असले तरिही लहान प्रमाणातील शेती, कमी उत्पन्नाची शेती नुकसानीची असूनही पारंपारिक व्यवसाय वर्षानुवर्षे केला जात आहे. शेतकरी, शेतीमजुर इ.चे दरडोई उत्पन्न वाढवण्यासाठी त्यांना शेतीव्यतिरिक्त इतर व्यवसायांकडे वळवणे आवश्यक ठरते. शेतीपूरक क्षेत्रांत रोजगारनिर्मिती होण्याच्या दृष्टीने नवनव्या कल्पना व आवश्यक कौशल्यविकास करण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. शेतीक्षेत्राला नेहमी सतावणारे संकट म्हणजे हवामानातील बदलांवर असलेले शेतीचे अवलंबित्व व नैसर्गिक आपत्ती. वर्तवलेल्या शक्यतेप्रमाणे वेळेत पाऊस झाला नाही तर त्याचा एकूणच त्या हंगामाच्या व वर्षभराच्या शेती उत्पादनाला प्रचंड फटका बसतो. नदी, ओढे जलाशये, तलावामध्ये पुरेसा पाणी साठा उपलब्ध न झाल्यास पावसानंतरच्या हंगामातील पीक उत्पादन घेणेही कठीण होऊन बसते. याचे ताजे उदाहरण २०१४-१५ मध्ये पाहायला मिळाले. या दोनही वर्षात अत्यंत कमी व अनियमित प्रमाणात पाऊस झाला व त्यामुळे देशातील शेतीक्षेत्राचे फार नुकसान झाले. तसेच देशाचा एकूण अन्नधान्य साठा, कृषी व्यापार निर्यात इ.चे प्रमाणही घटले. या सर्व नुकसानीत सर्वात वाईट हाल झाले ते शेतकऱ्यांचे. शेतीतून अपेक्षित उत्पन्न न मिळाल्यामुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी झाले. जास्त पाऊस, कमी पाऊस, अवेळी पाऊस, नद्यांचा पूर, दुष्काळ अशी सर्वच परिस्थिती शेतीसाठी नुकसानकारक ठरतात. २०१६ मध्ये सर्वसाधारण देशभरात पाऊसमान चांगले झाले, पण जवळजवळ ९ राज्यांत पूरस्थिती होती. तसेच बिहार सारख्या राज्यात नद्यांच्या पाण्याच्या पातळीत हंगामांत होणारी वाढ तेथील शेतीचे दरवर्षी प्रचंड नुकसान करते. २०१६ मध्ये बिहार राज्यातील नदीजलपातळीच्या वाढीमुळे ३ लाख कुटुंब विस्थापित झालीत व सुमारे ३ लाख हेक्टर शेतजमिनीचे नुकसान झाले.

सरकार व्दारे हमी भावात मोठ्या प्रमाणात शेती उत्पादनाची खरेदी केली गेल्यास संपूर्ण बाजार यंत्रणा, मागणी व पीकाचा भाव या तिनही बाबतीत शेतकऱ्यांना लाभ मिळू शकतो. शेतमालाच्या जास्तीच्या पुरवठ्यालाही अत्यंत कमी बाजारमूल्य मिळते. २०१६-१७ या वर्षांत डाळींचे उत्पादन वाढवण्यात आले त्यानुसार त्याचा पुरवठाही वाढला,परिणामी डाळीचे बाजारमूल्य कमी झाले. मागणीतील अनिश्चितता व जागतिक बाजारातील स्पर्धात्मक परिस्थिती या दोन घटकांमुळेही पीकाला मिळणाऱ्या बाजारभावावर परिणाम होतो.

शेती उत्पादनाच्या दरातील चढ उतार ही शेतकऱ्यांसमोरील अजून एक समस्या आहे. बाजारीत मागणीनुसार पीकांच्या किंमती कमी-जास्त होत राहतात. शेतकरी या अनिश्चित परिस्थितीचा व्यापाऱ्यांप्रमाणे कोणताच लाभ घेऊ शकत नाही कारण शेतकऱ्यांजवळ उत्पादनाचा साठा करून ठेवायचे किंवा मागणीनुसार उत्पादन पोहचवायची स्वतंत्र व जलद यंत्रणा नसते. बरेचदा शेतकऱ्यांना आपले पीक उत्पादन नुकसान सोसूनच विकावे लागते तसेच जास्त भावाने पीक खरेदी करण्याची नामुष्कीही त्यांना सोसावी लागते. बाजारयंत्रणेत शेतकऱ्यांना कमीतकमी आधारभूत उत्पादन दर ठरवून दिला जातो. या दरात मागणीनुसार बदल होत असतो. जास्त आधार भाव मिळाल्यास शेतकऱ्यांना किमान लाभ मिळू शकतो. परंतु, असे नेहमी होत नाही. यासाठी सरकार व्दारे हमी भावात मोठ्या प्रमाणात शेती उत्पादनाची खरेदी केली गेल्यास संपूर्ण बाजार यंत्रणा, मागणी व पीकाचा भाव या तिनही बाबतीत शेतकऱ्यांना लाभ मिळू शकतो. शेतमालाच्या जास्तीच्या पुरवठ्यालाही अत्यंत कमी बाजारमूल्य मिळते. २०१६-१७ या वर्षांत डाळींचे उत्पादन वाढवण्यात आले त्यानुसार त्याचा पुरवठाही वाढला,परिणामी डाळीचे बाजारमूल्य कमी झाले. मागणीतील अनिश्चितता व जागतिक बाजारातील स्पर्धात्मक परिस्थिती या दोन घटकांमुळेही पीकाला मिळणाऱ्या बाजारभावावर परिणाम होतो.

ग्रामीण सोयीसुविधा

केवळ उत्पादकता व उत्पादनाचा बाजारभाव किंवा दर यात वाढ केली म्हणजे शेतकऱ्यांचे हित जपले जाईल असा तर्क चुकीचा ठरेल. कारण शेतकऱ्यांच्या दृष्टीने त्यांच्या व्यवसायाच्या दैनंदिन गरजांना आवश्यक सोयीसुविधांची योग्य प्रमाणात उपलब्धता शेतीत नव्या संधी व क्षमतांच्या विकास करण्यात हातभार लावू शकतात. यासाठी तंत्रज्ञानातील प्रगत संशोधनांचा वापर करणे आवश्यक ठरते. हे तंत्रज्ञानच सर्वसामान्य नागरिकांच्या हक्काचे शस्त्र आहे आणि यामुळे सरकारवरही योग्य व प्रगत स्वरूपातील सेवा देण्याचे दायित्व वाढत जाते. दुर्दैवाने, भारतात ग्रामीण व शहरी भागात अनेक बाबतीत विशेषतः पायाभूत सुविधा व तंत्रज्ञानाच्या बाबतीत प्रचंड तफावत आढळते याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसतो.

भारतात गेली कित्येक वर्षे गरिब जनतेचा मानवी संसाधन विकास या संकल्पनेनुसार विचारच केला गेला नव्हता. बहुतेक करून देशातील सर्व ग्रामीण भागांत गरिब व निरक्षर लोकांची संख्या जास्त होती व विकासाचा कोणताही थेट लाभ या ग्रामीण भागांपर्यत पोहचलेला नव्हता. प्राथमिक शिक्षणाची सुविधाही बऱ्याच उशीराने ग्रामीण भागांपर्यंत पोहचली. त्यातही शैक्षणिक दर्जा व सुविधा अतिशय सुमार होत्या. विद्यार्थ्यांना बाहेरील जगात व्यवसाय किंवा नोकरी करण्याचे कोणतेही ठोस कौशल्य या ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेतून दिले जात नव्हते. ग्रामीण भागाचा विकास खुंटण्यामागे प्रामुख्याने तत्कालीन धोरणकर्त्यांची उदासीनता, भ्रष्टाचार व धोरणांच्या अंमलबजावणीतील कुचराई व ग्रामीण भागासाठी मांडलेल्या उत्पन्न व खर्चाच्या अंदाजपत्रकातील मर्यादा इ. काही परंपरागत घटक जबाबदार होते. यात आणखीन महत्वाचा घटक म्हणजे ग्रामीण भागात सार्वजनिक आरोग्यसेवा प्रदान करणारी प्राथमिक यंत्रणा पार खिळखिळी झालेली होती. त्यामुळे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर वसलेल्या शेतकरी वर्गाला आतापर्यंत ना योग्य शिक्षण मिळू शकले ना त्यांना आरोग्यसंबंधी योग्य उपचार मिळण्याची कोणतीही हमी लाभू शकली. योग्य पोषक आहार आरोग्याला पूरक अशी सभोवतालची परिस्थिती या बाबींचा थेट संबंध चांगले आरोग्य व कार्यक्षमतेशी जोडला जातो. सुरूवातीला ग्रामीण भागातील लोकांसाठी सुरू करण्यात आलेली सार्वजनिक अन्नधान्य वितरण व्यवस्था, नंतर केवळ गरिब वर्गासाठी सीमित करण्यात आली. या व्यवस्थेचा लाभ काही प्रमाणात छोट्या शेतकऱ्यांना मिळाला. परंतु, थोड्याच अवधित ही व्यवस्था भ्रष्टाचार, भेसळ, काळा बाजार इ.सारख्या वाईट चक्रात अडकून पार निकामी झाली. १९८० पासून या व्यवस्थेच्या पुरवठा, साठवणूक इ. नियमांत बऱ्याच सुधारणा करण्यात येत आहेत.

पक्की घरे, सांडपाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था या बाबी वैयक्तिक व सभोवतालच्या आरोग्यासाठी महत्वाच्या आहेत. परंतु दुर्दैवाने ग्रामीण भागात यासर्व व्यवस्था अतिशय प्राथमिक अवस्थेत आहेत. २०११ च्या जनगणना अहवालातील नोंदीनुसार सुमारे ४५-७० टक्के ग्रामीण घरांमध्ये विद्युतीकरणाची कोणतीही सोय उपलब्ध नाही. तसेच देशाच्या १८ टक्के ग्रामीण भागांत आजही दैनंदिन गरजांसाठी गरजा जसे, चांगले पाणी थेट घरापर्यंत येईल अशी कोणतीही जलपुरवठा यंत्रणा, घरात स्वतंत्र शौचालये नाहीत.

भारताच्या ग्रामीण भागांत अनेक ठिकाणी आजही शहरी भागात सहजपणे पोहचता येईल अशी थेट दळणवळण यंत्रणा नाही. देशाच्या १६ टक्के ग्रामीण भागात आजही पक्के रस्ते नाहीत. विजेच्या उपलब्धतेमुळे दैनंदिन जीवन सुलभ होऊन अनेक आर्थिक घडामोडींना चालना मिळाली आहे. पक्की घरें, सांडपाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था या बाबी वैयक्तिक व सभोवतालच्या आरोग्यासाठी महत्वाच्या आहेत. परंतु दुर्दैवाने ग्रामीण भागात यासर्व व्यवस्था अतिशय प्राथमिक अवस्थेत आहेत. २०११ च्या जनगणना अहवालातील नोंदीनुसार सुमारे ४५-७० टक्के ग्रामीण घरांमध्ये विद्युतीकरणाची कोणतीही सोय उपलब्ध नाही. तसेच देशाच्या १८ टक्के ग्रामीण भागांत आजही दैनंदिन गरजांसाठी गरजा जसे, चांगले पाणी थेट घरापर्यंत येईल अशी कोणतीही जलपुरवठा यंत्रणा, घरात स्वतंत्र शौचालये नाहीत. माहिती संदेशवहन व तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा पुढचा टप्पा म्हणजे मोबाईल क्रांती. माहितीचे त्वरित दळणवळण मोबाईल फोन, इंटरनेट व आवकाशतंत्रज्ञानातील

नवनव्या संशोधनांमुळे शक्य झाले आहे. शेतकऱ्यांना वेळोवेळी उद्‌भवणाऱ्या कृषीविषयक शंका व समस्यांबाबत तज्ज्ञांकडून वेळीच योग्य माहितीतून मार्गदर्शन मिळाल्यास त्याचा मोठा लाभ शेतकरी वर्गाला मिळेल. माहिती व संदेशवहनाच्या प्रगत तंत्रज्ञानाच्या बदलांचा एक भाग होत शेतकरी समूदायही सामाजिक स्तरावर इतर लोकांशी संपर्क जोडला गेल्यास शेतकऱ्याची परिस्थिती सुधारण्यास बराच वाव मिळेल. आजवर समाजाच्या इतर घटकांपासून उपेक्षित राहिला गेलेला शेतकरी समाज माहिती तंत्रज्ञानातून स्वतःचा विकास घडवून आणू शकतो. यासाठी भौतिक सोयीसुविधांचा विकास होणे आवश्यक ठरते. कारण यामुळे शेतीतील कार्यक्षमता, विपणन, उत्पादनाचा अपव्यय कमी करणे, मूल्यवर्धिततेला प्रोत्साहन व सामाजिक पायाभूत सुविधांचा विकास करण्यात शेतकरीवर्ग परस्परांना सहाय्य करू शकतो.

शेतीची कामे करणारा स्त्री वर्गही शेतकऱ्यांइतकाच किंबहुना त्यांच्यापेक्षा जास्तच उपेक्षित राहिलेला आहे. शेतीतील स्त्रियांच्या गरजा वेगळ्या आहेत. त्यांना मिळणारी मजुरी ही त्या करित असलेल्या कष्टप्रद कामाच्या मानाने अतिशय कमी आहे. लहान प्रमाणातील शेतीत भात पीकाची पेरणी करण्यासाखे अतिशय कष्टदायक काम करण्यासाठी मोठ्या प्रमाणात स्त्री शेतमजूरांनाच जुंपले जाते. परंतु, मागील काही वर्षात काही प्रगत ग्रामीण भागात नवीन तंत्रज्ञानामुळे इतर उद्योगांत शेतीच्या तुलनेने स्त्रियांसाठी उच्च उत्पन्नाच्या संधी मिळत असल्यामुळे शेतमजुर स्त्रियांची संख्या कमी होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. तरिही, बऱ्याच भागात स्त्रियांपेक्षा पुरूष शेतीव्यतिरिक्त उद्योगांत मजुरीसाठी बाहेर पडतात, त्यामुळे गावाकडेच राहिलेल्या त्यांच्या कुटुंबातील स्त्रियांना नाईलाजानेच तुटपुंजी मजुरी देणारे शेतीचे काम करावे लागते. या स्त्रियांना त्यांच्या कामाबाबत अधिक चांगले प्रशिक्षण, कौशल्य विकास,

---

गेली अनेक वर्षे देशाच्या कृषीव्यवस्थेच्या विकासातील प्रमुख घटक जसे, चांगल्या दर्जाचे बी-बियाणे, खते व किटकनाशके खरेदीसाठी सरकारद्‌वारा सवलत, कमी दरात इंधन व उर्जेची उपलब्धता, सिंचनासाठी सवलतीत कर्ज योजना व सरकार द्‌वारा हमीभावात मोठ्या प्रमाणातील अन्नधान्याची खरेदी इ.मुळे सेती उत्पादन प्रक्रियेला मदत मिळाली शेतकऱ्यांना किफायतशीर उत्पादन घेणे शक्य झाले तसेच देशासमोरील खाद्यन्न सुरक्षेच्या प्रश्नाचेही समाधान झाले.

त्यांच्या आरोग्यासंबंधी आवश्यक सुविधांची उपलब्धता, त्यांच्या मुलांची देखरेखीची सोय, स्त्रियांना त्यांच्या शारिरिक क्षमतेला सोयीची व कमी कष्टप्रद अशी शेतीची अवजारे असणे, व संपर्क व माहिती यंत्रणा सेवेची सहज उपलब्धता इ. काही गोष्टी शेतमजुर स्त्रीवर्गाच्या सर्वांगिण विकासासाठी आवश्यक आहेत.

आधुनिक काळातील नव्या संकल्पना व शेतकऱ्याचा विकास

गेली अनेक वर्षे देशाच्या कृषीव्यवस्थेच्या विकासातील प्रमुख घटक जसे, चांगल्या दर्जाचे बी-बियाणे, खते व किटकनाशके खरेदीसाठी सरकारद्‌वारा सवलत, कमी दरात इंधन व उर्जेची उपलब्धता, सिंचनासाठी सवलतीत कर्ज योजना व सरकार द्‌वारा हमीभावात मोठ्या प्रमाणातील अन्नधान्याची खरेदी इ.मुळे शेती उत्पादन प्रक्रियेला मदत मिळाली शेतकऱ्यांना किफायतशीर उत्पादन घेणे शक्य झाले तसेच देशासमोरील खाद्यान्न सुरक्षेच्या प्रश्नाचेही समाधान झाले. नंतर असे लक्षात आले की, कृषीव्यवस्थेच्या विकासासाठी जी पावले उचलण्यात आली त्याचे लाभ प्रामुख्याने अतिरिक्त उत्पादन घेणाऱ्या प्रदेशांनाच जास्त प्रमाणात मिळाले. ही बाब लक्षात आल्यावर धोरणकर्त्यांनी पीक साठवणूक, कमी पावसाचे प्रदेश व सर्वसामान्य सोईसुविधा देण्यावर भर दिला. हरितक्रांतीचे तंत्रज्ञान भारताच्या पूर्वोत्तर भागातील शेतीक्षेत्राकडे वळवणे - BGRNE, तेलबिया, डाळी, इ.च्या शेतीसाठी एकात्मिक योजना - ISOPOM, राष्ट्रीय अन्न सुरक्षा मिशन-NFSM, राष्ट्रीय कृषी विकास योजना- RKVY, व पीक साठवणूक व्यवस्था शीतगृहे अर्थात वेअरहाऊसिंग डेव्हलपमेंट एन्ड रेग्युलेटरी अथॉरिटी (WDRA) अशा इतर योजना सुरू करण्यात आल्या. यात शाश्वत पध्दतींना प्राधान्य मिळाले. नुकत्याच पॅरिस येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय हवामान परिषदेत भारताने जागतिक हवामान बदल कमी करण्यासाठी उपायांसंबंधी

जागतिक सांमजस्य करारावर स्वाक्षरी केली. या करारानुसार समाजातील सर्व स्तराच्या लोकांना हवामान बदलाबाबत जागरूक करणे, विशेषतः शेतकरी वर्गाला याबाबत वेळोवेळी माहिती देणे, नैसर्गिक आपत्तीच्या संकटाचा मुकाबला करण्याची यंत्रणा विकसीत करणे, तसेच नैसर्गिक आपत्तीपासून शेतीचे होणारे नुकसान कमी करणे, प्रदूषण नियंत्रित करणे इ. काही उपाययोजना करण्यास सरकार बांधिल आहे.

नैसर्गिक आपत्तीतून शेतकऱ्यांचे होणारे प्रचंड आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी कृषी विमा योजना हा एक उत्तम उपाय आहे. पण ही योजना भारतात फार उशीरा सुरू झाली.

राष्ट्रीय कृषी विमा योजना-NAIS १९९९ मध्ये सुरू करण्यात आली. या योजनेत शेतजमिनीच्या एकूण क्षेत्रफळानुसार विमा दिला गेला कारण लहान वा मोठी शेती, या दोन्हीं प्रकारच्या शेतीला सामोरे जावे लागणाऱ्या संकटाचे स्वरूप सारखेच असते. परंतु, तरिही या योजनेचा अंतभूधारक शेतकऱ्यांना विशेष लाभ मिळाला नाही. नंतर या योजनेत बरेच बदल करण्यात आले. २०१६ च्या जानेवारी महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व शेतकऱ्यांच्या गरजांना समाविष्ट करून घेणारी-प्रधानमंत्री फसल बिमा योजना जाहिर केली. या नव्या योजनेत हवामानातील बदलांमुळे होणारे पीकांचे नुकसान, पीकावर पडणारे रोग, पेरणीदरम्यान होणारे नुकसान, व इतर कोणत्याही कारणाने उभ्या पीकाचे होणारे नुकसान इ. सर्व बाबी समाविष्ट करण्यात आल्या आहेत. या क्षेत्रात आता खाजगी विमा कंपन्याही शेतकऱ्यांना सोयीच्या दरात विमा सुरक्षा देणाऱ्या योजना चालवित आहे. तंत्रज्ञानामुळे विम्यासाठी आधारभूत क्षेत्र निश्चित करणे व नेमक्या कृषी उत्पन्नाचा आकडा निश्चित करणे सुलभ झाले आहे. पीक विमा हवामान बदलाच्या संकटावर मात करण्याचा एक चांगला उपाय आहे. परंतु, अनेकदा मोठ्या नैसर्गिक आपत्तीतून नुकसानग्रस्त होणारा शेतीप्रदेश व नुकसान झालेल्या पीकांचे एकूण प्रमाण प्रचंड असते. अशा परिस्थितीत पीक व शेतीक्षेत्राच्या एकूण नुकसानीची व्याप्ती ठरवण्यासाठी राष्ट्रीय उपग्रह

२०१६ च्या जानेवारी महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व शेतकऱ्यांच्या गरजांना समाविष्ट करून घेणारी- प्रधानमंत्री फसल बिमा योजना जाहिर केली. या नव्या योजनेत हवामानातील बदलांमुळे होणारे पीकांचे नुकसान, पीकावर पडणारे रोग, पेरणीदरम्यान होणारे नुकसान, व इतर कोणत्याही कारणाने उभ्या पीकाचे होणारे नुकसान इ. सर्व बाबी समाविष्ट करण्यात आल्या आहेत. या क्षेत्रात आता खाजगी विमा कंपन्याही शेतकऱ्यांना सोयीच्या दरात विमा सुरक्षा देणाऱ्या योजना चालवित आहे.

व हवामानशास्त्र विभागाच्या उच्च तांत्रिक क्षमतांची गरज भासते. २००५ या वर्षात आलेल्या त्सुनामी नंतर देशात नैसर्गिक आपदा संबंधी नियम व कायदा बनवण्यात आला व त्याचवेळी आपदा सूचक दलाची स्थापनाही करण्यात आली. देशात विविध भागात नद्यांना येणारे महापूर व त्यामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात होणारे नुकसान नैसर्गिक आपत्ती म्हणून गणले जाते. व या दरम्यान सिंचनासाठी सरकार तर्फे विशेष सवलत देण्याची सोय करण्यात आली आहे. पारंपारिक विपणन व्यवस्था कुचकामी ठरू लागल्यामुळे एकूणच कृषीक्षेत्रात विपणन व्यवस्थेत सुधारणा करण्याची आवश्यकता निर्माण झाली. याचाच एक महत्वाचा भाग म्हणून कृषी उत्पन्न बाजार समिति नियमांत APMC Act सुधारणा करण्यात आल्या. या सुधारणांचा प्रमुख रोख शेतकऱ्यांना विपणनाचे अधिक सुलभ पर्याय उपलब्ध करून देण्यावर होता. सध्या साठवणूक व पुरवठा व्यवस्थेसमोर प्रभावी देखरेख यंत्रणा व त्यासाठी लागणारा निधी ही दोन प्रमुख आव्हाने आहेत. तसेच सरकारचा या यंत्रणेच्या कामकाजात कमीतकमी हस्तक्षेप व एकूणच यंत्रणेचे खर्च नियंत्रित ठेवणे यासारखी आव्हानेही आहेत. राष्ट्रीय अन्नधान्य सुरक्षा कायदा २०१३ ची अंमलबजावणी व खाद्यान्नावरील सवलती इ. मुळे अन्नहक्क कायदेशीर बनला. तरिही जागतिक बाजारातील बदलांचा परिणामांमुळे देशांतर्गत खाद्यान्नांच्या किंमतींवर परिणाम होतो. दरम्यान भारतातील कृषी अनुदान योजनेतही आधुनिक काळाच्या गरजांनुसार अनेक महत्वाचे बदल होत आहेत. प्रधानमंत्री जनधन योजना व आधार योजनेसारख्या ऐतिहासिक योजना, निधीचे थेट हस्तांतरण योजना-Direct Benefit Transfer, एलपीजी सवलत अशा सारख्या नव्या योजना गरिब शेतकऱ्यांसाठी वरदान ठरल्या आहेत.

राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका मिशन-National Rural Livelihoods Mission, इलेक्ट्रॉनिक राष्ट्रीय कृषी बाजार- electronic National Agricultural Market-

(eNAM), राष्ट्रीय ग्रामीण आवास योजना, सामाजिक सहाय्य योजना, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य योजना इ. योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीचा लाभ शेतकऱ्यांनाही मिळत असून, त्यामुळे त्यांचे जीवनमान सुधारत आहे. दुष्काळ व दुष्काळसदृश परिस्थितीवर मात करण्यासाठी सिंचन योजनांना फार महत्व प्राप्त झाले आहे. वर्षभर कमीतकमी खर्चात सिंचनाची यंत्रणा विकसित करण्यासाठी सरकारतर्फे आर्थिक सवलतींसह प्रोत्साहनही दिले जाते. तसेच ग्रामीण भागातील गरिब जनतेसाठी शेतीव्यतिरिक्त पूरक कामांत रोजगारसंधींची हमी देणारा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा हा सार्वजनिक उपक्रम २००५ या वर्षापासून राबवण्यात येत आहे. ग्रामीण युवकांमध्ये उद्योजकता कौशल्य वाढवून त्यांना स्वतंत्र व्यवसाय सुरू करण्याचे प्रशिक्षण देणारा राष्ट्रीय कौशल्य व उद्योजकता विकास कार्यक्रम National Policy on Skill Development and Entrepreneurship २०१५ पासून राबवण्यात येत आहे. ग्रामीण भारताचा सर्वांगिण विकास करण्याच्या दृष्टीने सरकारने हा कार्यक्रम बनवला आहे. याचा सर्वाधिक फायदा शेतकरी कुटुंबांतील नव्या पिढीला मिळतो आहे. एकाप्रकारे भविष्यातील शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने स्वयंपूर्ण बनवण्याच्या दूरदर्शी उद्देशाने सरकारने राबवलेला हा उपक्रम खरोखरच एतिहासिक ठरेल यात शंका नाही.

निष्कर्ष

गेली अनेक वर्षे देशातील शेतकऱ्यांच्या सुरक्षेची व्यवस्था ही सर्वसामान्य ग्राहकांच्या सोयीनुसार ठरवण्यात आली होती. परंतु आताच्या काळात ही प्रणाली बाजारव्यवस्थेतील बदलांमुळे व एकूणच व्यवस्थेच्या वाढत्या खर्चाच्या बोजामुळे कोलमडण्याच्या स्थितीत आहे. या बदलाच्या ओघातच एक सामाजिक सुरक्षेची हमी देणारी एक नवीन पध्दत विकसित होत आहे. या नव्या व्यवस्थेत प्रत्येक नागरिकाला किमान लाभ मिळेल यावर भर दिला जात आहे. खुल्या बाजाराच्या किमती व उत्पन्नावर सरकारचे मर्यादित नियंत्रण ठेऊन या नव्या प्रणालीला अधिक बळकटी देण्यासाठी व बाजार व्यवस्थेला अधिक कार्यक्षम करण्यासाठी सरकार काही ठोस निर्णय नक्कीच घेऊ शकते. असे करणे शक्य असले तरिही शासनाला एकाच वेळी शेतकऱ्यांच्या सामाजिक सुरक्षेची व सर्वसामान्य नागरिकांच्या अन्न सुरक्षेची नैतिक जबाबदारीही निभवायची आहे. तसेच शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तींपासून सुरक्षा मिळेल अशा पायाभूत व सामाजिक सोयीसुविधा निर्माण करणे व याबाबतच्या सर्व माहिती सर्व घटकांपर्यंत योग्यरित्या पोहचेल अशी संदेशयंत्रणा विकसित करणे ही देखील सरकारची प्रमुख जबाबदारी आहे.

बाजार व्यवस्थेला अधिक कार्यक्षम करण्यासाठी सरकार काही ठोस निर्णय नक्कीच घेऊ शकते. असे करणे शक्य असले तरिही शासनाला एकाच वेळी शेतकऱ्यांच्या सामाजिक सुरक्षेची व सर्वसामान्य नागरिकांच्या अन्न सुरक्षेची नैतिक जबाबदारीही निभवायची आहे. तसेच शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तींपासून सुरक्षा मिळेल अशा पायाभूत व सामाजिक सोयीसुविधा निर्माण करणे व याबाबतच्या सर्व माहिती सर्व घटकांपर्यंत योग्यरित्या पोहचेल अशी संदेशयंत्रणा विकसित करणे ही देखील सरकारची प्रमुख जबाबदारी आहे.

ज्यांना अन्न सुरक्षेच्या हमीचे सर्व लाभ मिळत आहेत असे सर्व करदाते नागरिक व खाजगी क्षेत्रातील उद्योजक ज्यांच्या सर्व गरजा प्रामुख्याने कृषी क्षेत्राद्वारे पुरवल्या जातात, या दोन्ही घटकांनी सरकारला कृषी क्षेत्र भक्कम करण्याच्या कामी सर्वार्थाने साथ देणं ही काळाची गरज आहे.

येणाऱ्या काळात कृषी क्षेत्राचा विकास एक स्वतंत्र उद्योगक्षेत्र म्हणून होणार आहे. हे एक असे उद्योगक्षेत्र राहिल जे इतर वाढत्या उद्योगधंद्यांशी थेट संबंधित असेल व या एकात्मिकीकरणामुळे व एकूणच उपजीविकांच्या विविध पर्यायांमुळे जमिनीवरील ताण हलका होण्यास मदत होईल. तसेच काळानुरूप होणाऱ्या बदलांमुळे व तंत्रज्ञानावर आधारित नव्या प्रशासन व्यवस्थेमुळे सरकारही आपल्या जबाबदाऱ्या कार्य अधिक जलद व कार्यक्षमतेने पार पाडू शकेल. याबरोबरच, शेतकऱ्यांना इतर सर्वसामान्य नागरिकांप्रणे एक सुरक्षित जीवन जगण्याचा मूलभूत हक्क खऱ्या अर्थाने उपभोगता येईल व परिणामी शेतकऱ्यांच्या कार्यक्षमतेतही वाढ होऊन बाजार यंत्रणा भक्कम होण्यास मदत होईल.

■■■

लेखिका नवी दिल्ली येथील इन्स्टिट्यूट ऑफ इकॉनॉमिक ग्रोथ मध्ये प्राध्यापक असून कृषी, अन्न आणि पर्यावरण या क्षेत्रात कार्यरत आहेत.

email: nila@iegindia.org

संचित

वृद्धापकाळातील आर्थिक सुरक्षितता

डॉ बद्री सिंग भंडारी

निवृत्तीवेतन प्रणाली ही सर्व ग्राहकांना परवडणारी असावी, वित्तियदृष्ट्या कार्यक्षम असावी, अर्थव्यवस्थेसाठी शाश्वत असावी,ज्यामुळे व्यावसायिक गट आणि उत्पन्न श्रेणीतल्या जास्तीत जास्त लोकांपर्यंत ती पोहोचू शकेल. गेल्या तीन दशकात जगभरातल्या अनेक देशांनी,पेन्शन यंत्रणा वित्तीय दृष्ट्या शाश्वत ठेवण्यासाठी, वाढत्या लोकसंख्या विषयक आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी, आणि पेन्शन यंत्रणेचे जाळे, प्रामुख्याने असंघटित क्षेत्रात विस्तारण्यासाठी त्यात सुधारणा केल्या.

पेन्शन अर्थात निवृत्तीवेतन किंवा वृद्धापकाळातील उत्पन्नाची तरतूद हा सामाजिक सुरक्षा जाळ्यातला महत्वाचा घटक आहे. वृद्धापकाळातील विपन्नावस्थेचा धोका कमी करण्यासाठी, यंत्रणा पुरवण्याबरोबरच निवृत्तीनंतरही जीवनमानाचा आधीचाच दर्जा कायम राखण्यासाठीचे ते साधन आहे. निवृत्तीवेतन प्रणाली ही सर्व ग्राहकांना परवडणारी असावी, वित्तियदृष्ट्या कार्यक्षम असावी, अर्थव्यवस्थेसाठी शाश्वत असावी,ज्यामुळे व्यावसायिक गट आणि उत्पन्न श्रेणीतल्या जास्तीत जास्त लोकांपर्यंत ती पोहोचू शकेल. गेल्या तीन दशकात जगभरातल्या अनेक देशांनी,पेन्शन यंत्रणा वित्तीय दृष्ट्या शाश्वत ठेवण्यासाठी, वाढत्या लोकसंख्या विषयक आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी, आणि पेन्शन यंत्रणेचे जाळे, प्रामुख्याने असंघटित क्षेत्रात विस्तारण्यासाठी त्यात सुधारणा केल्या.

भारतात,पारंपरिक, एकत्र कुटुंब पद्धतीद्वारे, वृद्धापकाळातील आर्थिक सुरक्षा पुरवली जात असे.मात्र व्यवसाय बदल, शहरीकरण आणि विभक्त कुटुंब पद्धतीच्या उदयामुळे, पारंपरिक एकत्र कुटुंब यंत्रणेचा आधार हळू-हळू ढासळू लागला आहे. त्याबरोबरच वैद्यकीय विज्ञानातल्या प्रगतीमुळे, जन्म आणि मृत्युदरात हळू-हळू घट होत असल्यामुळे,उत्पन्न स्तर उंचावल्यामुळे, गेल्या काही दशकांच्या तुलनेत,आता निवृत्तीनंतरच्या आयुष्यमानात वाढ झाली आहे. एकीकडे लोकसंख्येशी निगडित आव्हान आणि दुसरीकडे पेन्शन यंत्रणेचा आर्थिक बोजा हे अनेक देशातल्या पेन्शन विषयक सुधारणेचे मुख्य कारण ठरले आहे.

निवृत्तीवेतन किंवा भविष्य निर्वाह निधी अथवा सुपरॲन्यूएशन फंड,निवृत्तीवेतन लाभ अशा विविध नावानी मिळणारी, वृध्दापकाळातली आर्थिक सुरक्षितता, ही पूर्वापार संघटित क्षेत्रातल्या विशेषतः सरकारी सेवा,सार्वजनिक क्षेत्रातल्या संघटना आणि खाजगी क्षेत्रातल्या काही मोठ्या आस्थापनांपुरताच मर्यादित होती. २००४ मधल्या निवृत्तीवेतन सुधारणांपूर्वी भारतीय पेन्शनमध्ये खालील पेन्शन, भविष्य निर्वाह निधी, सुपरॲन्यूएशन फंड यांचा समावेश होता.

- एनएसएपी अर्थात राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रमांतर्गत, दारिद्र्य रेषेखालील आणि ६० वर्षावरील वृद्धांना तसेच दिव्यांग आणि विधवांना किमान

आर्थिक सुरक्षितता पुरवण्यासाठीच्या सामाजिक पेन्शन योजना

• २००४ पूर्वी केंद्र सरकारी सेवेत दाखल झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी 'पे ॲज यु गो' तत्वावरची केंद्रीय नागरी सेवा निवृत्तीवेतन योजना १९७२. अशाच प्रकारची योजना राज्य सरकारी तसेच अनेक सार्वजनिक उपक्रम त्याचबरोबर बँक, विमा कंपन्यातल्या कर्मचाऱ्यांसाठीही आहे.

• सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातल्या २० किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी असलेल्या आस्थापनांमध्ये, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि संबंधित कायदा १९५२ नुसार, कर्मचारी भविष्य निर्वाह संघटनेद्वारे चालवण्यात येत असलेला ईपीएफ अर्थात कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि कर्मचारी निवृत्तीवेतन योजना

• खाण क्षेत्र भविष्य निर्वाह निधी,खलाशी तसेच आसामच्या चहाच्या मळ्यात काम करणाऱ्यांसाठी भविष्य निर्वाह निधी यासारखे वैधानिक व्यवसायाधारित भविष्य निर्वाह निधी

• म्युच्युअल फंड आणि जीवन विमा कंपन्यांकडून देऊ करण्यात येत असलेले सुपरॲन्यूएशन आणि निवृत्तीवेतन लाभ, त्याचबरोबर केंद्र सरकारकडून बँका आणि टपाल कार्यालयामार्फत देऊ करण्यात येत असलेला सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी, या मध्ये कोणतीही व्यक्ती स्वेच्छेने सहभागी होऊ शकते आणि यात सहभागी होणाऱ्या व्यक्तीसाठी कर वजावट देऊ केली जाते.

४ एकीकडे, सार्वजनिक निधीची तरतूद नसणाऱ्या नागरी सेवांचा अर्थसंकल्पीय ताण, पे ॲज यु गो पेन्शन व्यवस्था तर दुसरीकडे कष्टकरी वर्गापैकी ८४ % पेक्षा जास्त संख्येने असणाऱ्या असंघटित क्षेत्रापर्यंत, वृद्धापकाळातील आर्थिक सुरक्षितता विस्तारण्याची गरज यामुळे भारतात पेन्शन विषयक सुधारणांची गरज निर्माण झाली. आर्थिक अनिवार्यता आणि लोकसंख्या विषयक कल लक्षात ठेवून पेन्शन यंत्रणेचा अंगीकार करण्याची, ओल्ड एज सोशल अँड इनकम सिक्युरिटी, भट्टाचार्य, रंगाचार्य यासारख्या विविध तज्ञ समितीच्या शिफारशींना अनुसरून भारताने, ठराविक लाभ 'पे ॲज यु गो' सार्वजनिक निधीची तरतूद नसणाऱ्या पेन्शन यंत्रणेकडून, ठराविक हप्ता असलेल्या आणि निधीची तरतूद असलेल्या, सुरवातीला नवी पेन्शन योजना म्हणून आणि आता एन पी एस अर्थात राष्ट्रीय पेन्शन यंत्रणा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या योजनेकडे वाटचाल केली. एन पी एस अर्थात राष्ट्रीय पेन्शन यंत्रणा ही निवृत्तीवेतन निधी नियामक आणि विकास प्राधिकरणाकडून संचालित केली जाणारी योजना आहे. सुरवातीला, १ जानेवारी २००४ ला किंवा त्यानंतर (सैन्य दले वगळता), केंद्र सरकारच्या सेवेत दाखल होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी,एन पी एस अनिवार्य करण्यात आली. त्यानंतर या योजनेचा विस्तार करून ती संबंधित राज्यांनी ज्या तारखेपासून या योजनेचा स्वीकार केला, त्या तारखेपासून त्या-त्या राज्यात आणि १ मे २००९ पासून, सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातल्या तसेच असंघटित क्षेत्रातल्या सर्व भारतीय नागरिकांसाठी, ऐच्छिक करण्यात आली. आता एनपीएस १८ ते ६० वयोगटातल्या सर्व भारतीय नागरिकांसाठी उपलब्ध असून आपल्या नोकरीच्या काळात सुयोग्य गुंतवणूक करून, त्याद्वारे निवृत्तीनंतर पेन्शनची सुविधा त्यांना घेता येऊ शकते. सरकारी कर्मचाऱ्यांसाठी, एनपीएस अनिवार्य असून वेतनाच्या १०% (मूळ वेतन अधिक महागाई भत्ता) आणि मालकाकडूनही तितकीच रक्कम, कर्मचाऱ्यांच्या पर्मनंट रिटायरमेंट अकाउंट नंबर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पेन्शन खात्यात जमा केली जाते.एनपीएस स्वेच्छेने घेणारी व्यक्ती,वार्षिक किमान १००० रुपयांची गुंतवणूक करू शकते आणि उत्पन्नानुसार त्यात वाढ करू शकते. जमा झालेली रक्कम निवृत्तीवेतन निधी नियामक आणि विकास प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्वांना अनुसरून सरकारी रोखे, कर्जरोखे, निवृत्तीवेतन निधी नियामक आणि विकास प्राधिकरणाकडे नोंदणी झालेल्या कंपन्यातल्या भांडवली समभागात गुंतवली जाते. एनपीएस मध्ये गुंतवणूक करणारी व्यक्ती,पेन्शन फंडाची निवड करून ते पैसे सरकारी रोखे, कर्जरोखे,भांडवली समभाग यापैकी कोणत्या स्वरूपात

एन पी एस अर्थात राष्ट्रीय पेन्शन यंत्रणा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या योजनेकडे वाटचाल केली. एन पी एस अर्थात राष्ट्रीय पेन्शन यंत्रणा ही निवृत्तीवेतन निधी नियामक आणि विकास प्राधिकरणाकडून संचालित केली जाणारी योजना आहे. सुरवातीला, १ जानेवारी २००४ ला किंवा त्यानंतर (सैन्य दले वगळता), केंद्र सरकारच्या सेवेत दाखल होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी,एन पी एस अनिवार्य करण्यात आली. त्यानंतर या योजनेचा विस्तार करून ती संबंधित राज्यांनी ज्या तारखेपासून या योजनेचा स्वीकार केला, त्या तारखेपासून त्या-त्या राज्यात आणि १ मे २००९ पासून, सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातल्या तसेच असंघटित क्षेत्रातल्या सर्व भारतीय नागरिकांसाठी, ऐच्छिक करण्यात आली.

आणि किती रक्कम गुंतवायची याचा पर्याय निवडू शकते.

एनपीएस अंतर्गत येणाऱ्या ग्राहकांची नोंदणी,पेन्शनचा मासिक हप्ता गोळा करणे,यासंदर्भातला तपशील ठेवणे, सर्व ग्राहकांचा निधी एकत्रित करणे, वित्तीय बाजारातल्या रोख्यात त्याची गुंतवणूक करणे,रोख्यांच्या तपशिलाची नोंद ठेवणे, यासारखी विविध कामे वेगवेगळ्या कंपन्यांकडे अथवा मध्यस्थांकडे सोपवली जातात. त्या-त्या कार्यक्षेत्रातले तज्ञ आणि ज्ञान लक्षात घेऊन या कंपन्यांची निवड केली जाते. सरकारी कर्मचाऱ्यांच्या एनपीएस विषयक कामांसाठी सरकारी कार्यालयांचा संच त्याचबरोबर पॉईंट्स ऑफ प्रेझेन्स म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बँका आणि बिगर बँकिंग कंपन्या कार्यरत असतात.एनपीएस खाती उघडणे,ग्राहकांकडून विशिष्ट रक्कम गोळा करणे आणि त्याच्या खात्यात ती रक्कम जमा करण्यासाठी संबंधित बँकेकडे सोपवण्याचा अधिकार या कार्यालयांना आणि बँकांना असतो. वैयक्तिक ग्राहकांचा तपशील ठेवण्याचे आणि एनपीएससाठी विविध कामे करणारी कार्यालये आणि संबंधितामध्ये समन्वय ठेवण्याचे काम सेंट्रल रेकॉर्ड कीपिंग एजन्सी करते. सेंट्रल रेकॉर्ड कीपिंग एजन्सी, प्रत्येक खातेदाराला पर्मनंट रिटायरमेंट अकाउंट नंबर जारी करते, त्यासंदर्भातील तपशील ठेवते आणि राष्ट्रीय पेन्शन यंत्रणा आणि सरकारी नोडल कार्यालये,संबंधित बँका, पेन्शन फंड आणि ग्राहक यांच्यातला कार्यात्मक दुवा म्हणून काम करते. राष्ट्रीय पेन्शन यंत्रणेसाठी मध्यवर्ती नोंदी राखल्यामुळे वैयक्तिक पेन्शन खाते, देशात कुठेही,कोणत्याही रोजगारात हलवता येऊ शकते. राष्ट्रीय पेन्शन योजनेचे व्यवस्थापन, उच्च तंत्रज्ञानावर आधारित आहे. रक्कम आणि फंडासंदर्भातली माहिती पाठवणे यासाठी इलेक्ट्रॉनिक यंत्रणेचा वापर केला जात असल्याने वेग आणि अचूकता राखली जाते. निवृत्तीवेतन निधी नियामक आणि विकास प्राधिकरणाकडे नोंदणी करण्यात आलेल्या पेन्शन फंडाना, प्राधिकरणाच्या गुंतवणूकविषयक मार्गदर्शक तत्वांना अनुसरून आणि ग्राहकाचे हित जपत, ग्राहकाच्या पेन्शन निधी व्यवस्थापनाचे अधिकार असतात.

६ सरकारी क्षेत्रात काम करणारे कर्मचारी, त्यांच्या ड्रॉइंग आणि डिस्ट्रिबुटिंग अधिकाऱ्यामार्फत अथवा पे अँड अकाउंट्स अधिकाऱ्यामार्फत राष्ट्रीय पेन्शन योजनेत खाते उघडू शकतात.खाजगी क्षेत्रात अथवा असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती, सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातल्या बँका, टपाल कार्यालये, बिगर बँकिंग वित्तीय संस्थांचा समावेश असलेल्या आणि देशभरात ६०,००० पेक्षा जास्त कार्यालये असलेल्या पॉईंट्स ऑफ प्रेझेन्स मार्फत हे खाते उघडू शकतात, त्यासाठी निर्देशित नोंदणी फॉर्म (एनएसआरएफ १) आणि केवायसी कागदपत्र भरून ओळख आणि रहिवासाच्या पुराव्यासह पॉईंट्स ऑफ प्रेझेन्स कडे ही कागदपत्रे सादर केल्यानंतरच हे खाते उघडता येऊ शकते. काही मोजक्या पॉईंट्स ऑफ प्रेझेन्सची परदेशात कार्यालये आहेत. www.pfrda.org.in आणि www.npscra.nsdl.co.in. या संकेतस्थळावर पॉईंट्स ऑफ प्रेझेन्सची तपशीलवार यादी उपलब्ध आहे. एनपीएस ट्रस्टच्या www. npstrust.org.in. या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन हे खाते उघडता येऊ शकते. ई एनपीएस मध्ये एखादी व्यक्ती, केवायसी कागदपत्र म्हणून आधार, पॅन कार्ड आणि बँक खात्याचा वापर करून ऑनलाईन हे खाते उघडू शकते. काही पॉईंट्स ऑफ प्रेझेन्सनी ऑनलाईन नोंदणी सुविधेव्यतिरिक्त आपल्या ग्राहकांना इंटरनेट पोर्टलवर ही सुविधा देऊ केली आहे. एनपीएस ग्राहकाला पर्मनंट रिटायरमेंट अकाउंट नंबर देण्यात येतो, ज्यामध्ये त्याची हप्त्याची रक्कम थेट खात्यात जमा केली जाते. हा पर्मनंट रिटायरमेंट अकाऊंट नंबर आपल्या देशात इतरत्र आणि नोकरीच्या ठिकाणी हलवता येऊ शकतो. तंत्रज्ञानावर आधारित असल्यामुळे ग्राहक, एनपीएस मोबाईल अँप चा वापर करून आपले खाते पाहू शकतात. केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी, एनपीएसची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र सरकारच्या वित्त मंत्रालयाने डिसेंबर २००३ मध्ये अधिसूचना जारी केली. एनपीएस कार्यन्वित करण्यासाठी लेखा महानियंत्रकांनी नियमावली जारी केली. जानेवारी २००४ ते मार्च २००८ या काळातली कर्मचाऱ्यांची एनपीएस हप्त्याची रक्कम लोक

राष्ट्रीय पेन्शन यंत्रणेसाठी मध्यवर्ती नोंदी राखल्यामुळे वैयक्तिक पेन्शन खाते, देशात कुठेही,कोणत्याही रोजगारात हलवता येऊ शकते. राष्ट्रीय पेन्शन योजनेचे व्यवस्थापन, उच्च तंत्रज्ञानावर आधारित आहे.रक्कम आणि फंडासंदर्भातली माहिती पाठवणे यासाठी इलेक्ट्रॉनिक यंत्रणेचा वापर केला जात असल्याने वेग आणि अचूकता राखली जाते. निवृत्तीवेतन निधी नियामक आणि विकास प्राधिकरणाकडे नोंदणी करण्यात आलेल्या पेन्शन फंडाना, प्राधिकरणाच्या गुंतवणूकविषयक मार्गदर्शक तत्वांना अनुसरून आणि ग्राहकाचे हित जपत, ग्राहकाच्या पेन्शन निधी व्यवस्थापनाचे अधिकार असतात.

लेख्यात ठेवली गेली आणि केंद्रीय निवृत्तीवेतन लेखा कार्यालयाने त्याची देखरेख केली. मार्च २००८ नंतर हा निधी, निवृत्तीवेतन निधी नियामक आणि विकास प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या बँकेत पाठवण्यात आला. सुरवातीला सरकारने निर्देशित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार हा निधी बाजारात गुंतवण्यासाठी या बँकांकडे सुपूर्द करण्यात आला. या निर्देशित बँकांकडे हा निधी सुपूर्द करेपर्यंत, सरकारने या निधीवर वार्षिक ८% दराने व्याज दिले. लेखा महानियंत्रक, व्यय खाते यांनी,एनपीएस मध्ये जमा झालेली रक्कम, संबंधित बँकांकडे आणि मध्यवर्ती नोंद ठेवणाऱ्या सेंट्रल रेकॉर्ड किपींग एजन्सीकडे सोपवण्यासाठी, त्यासंदर्भातल्या तयारीसाठी २००८ च्या सप्टेंबरमध्ये, कालबद्ध आणि तपशीलवार पद्धती जारी केली. त्याचप्रमाणे,ऑल इंडिया सर्व्हिसेस अधिकाऱ्यांसाठी, कार्मिक विभागाने सप्टेंबर २००९ मध्ये राज्यांच्या मुख्य सचिवांसाठी मार्गदर्शक तत्वे जारी केली.

श्रेणी १ आणि श्रेणी २ अशा दोन प्रकारची खाती एनपीएस मध्ये देऊ केली जातात. पहिल्या श्रेणीतले खाते हे निवृत्तीवेतन खाते असून द्वितीय श्रेणीतले खाते उघडण्यासाठी, पहिल्या श्रेणीतले खाते उघडणे अनिवार्य असते. द्वितीय श्रेणीतले खाते हे वैकल्पिक गुंतवणूक खाते आहे. पहिल्या श्रेणीतल्या खात्यामध्ये अंशतः रक्कम काढण्याची सुविधा असते. खातेदाराच्या मुलांचे उच्च शिक्षण आणि लग्न,खातेदाराचे स्वतःचे अथवा त्याच्या पत्नी,मुले आणि त्याच्यावर अवलंबून असलेल्या आई-वडिलांच्या विशिष्ट आजारपणावर वैद्यकीय उपचार, घर खरेदीसाठी किंवा बांधण्यासाठी, अंशतः रक्कम काढता येते मात्र ही रक्कम, ग्राहकाच्या योगदानाच्या २५% टक्क्यांहून जास्त असता काम नये.अपघात आणि जीवघेण्या आजारांसाठीही अंशतः रक्कम काढता येते. संपूर्ण काळात जास्तीत जास्त तीनवेळा रक्कम काढता येते. एनपीएस घेतल्यापासून तीन वर्षे पूर्ण झाल्यानंतर पहिल्यांदा रक्कम काढता येते.पहिल्या श्रेणीतल्या खात्यातून काढलेली अंशतः रक्कम ही पूर्णतः करमुक्त असते.व्दितीय श्रेणीतील खाते हे ऐच्छिक गुंतवणुकीची सुविधा देत असून रक्कम जमा करण्याबाबत आणि काढण्याबाबत लवचिकता असते. मात्र या खात्यातल्या रकमेच्या हप्त्यासाठी आणि काढलेल्या रकमेवर कर वजावट मिळत नाही.

जानेवारी २००४ ते मार्च २००८ या काळातली कर्मचाऱ्यांची एनपीएस हप्त्याची रक्कम लोक लेख्यात ठेवली गेली आणि केंद्रीय निवृत्तीवेतन लेखा कार्यालयाने त्याची देखरेख केली. मार्च २००८ नंतर हा निधी, निवृत्तीवेतन निधी नियामक आणि विकास प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या बँकेत पाठवण्यात आला.सुरवातीला सरकारने निर्देशित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार हा निधी बाजारात गुंतवण्यासाठी या बँकांकडे सुपूर्द करण्यात आला. या निर्देशित बँकांकडे हा निधी सुपूर्द करेपर्यंत, सरकारने या निधीवर वार्षिक ८% दराने व्याज दिले.

सेवानिवृत्ती अथवा ६० व्या वर्षी,या खातेधारकाला त्याच्या पर्मनंट रिटायरमेंट अकाउंट नंबर खात्यात जमा असलेल्या रकमेपैकी,किमान ४०% रक्कम वार्षिक पद्धतीने दिली जाते तर उर्वरित ६०%रक्कम एकरकमी काढता येऊ शकते.एकूण जमा रकमेपैकी, एकरकमी काढलेल्या ४०% रकमेला करातून सूट आहे. वार्षिक मिळणाऱ्या रकमेलाही करातून सूट आहे. ६० वर्ष पूर्ण होण्याआधीच त्यातून बाहेर पडण्याचा निर्णय खातेधारकाने घेतल्यास त्याला, जमा रकमेपैकी किमान ८०% रक्कम एन्यूईटी घेण्यासाठी गुंतवावी लागते, उर्वरित २०% रक्कम एकरकमी काढता येते. सेवानिवृत्ती अथवा ६० वर्षे पूर्ण होण्याआधीच खातेधारकाचा मृत्यू झाल्यास, त्याने नियुक्त केलेल्या वारसदाराला त्याची या खात्यातली जमा रक्कम, कोणत्याही कराशिवाय काढण्याचा पर्याय आहे. बाजारातली सुयोग्य परिस्थिती पाहून त्याप्रमाणे आपला एनपीएस निधी पूर्णतः काढून घेण्याचा निर्णय, खातेधारक, त्याच्या वयाच्या ७० वर्षापर्यंत लांबणीवर टाकू शकतो आणि वार्षिकी खरेदी करण्याचा निर्णय, ६० वर्षापासुन अथवा सेवानिवृत्तीच्या तारखेपासून तीन वर्षे लांबणीवर टाकू शकतो. या काळात ती व्यक्ती तिची इच्छा असल्यास आपल्या रकमेचा हप्ता सुरु ठेवू शकते.

अनिवासी भारतीयांसाठी एनपीएस

अनिवासी भारतीय, रिपॅट्रिएबल म्हणजे खातेदाराची परदेशातली मालमत्ता, त्याच्या मूळ देशी आणण्याची क्षमता असलेले आणि नॉन रिपॅट्रिएबल म्हणजे अशी क्षमता नसलेले अशा दोन्ही आधारे एनपीएस खाते उघडू शकतात आणि त्यांच्या एनआरई, एफसीएनआर, एनआरओ खात्यातून आपल्या हप्त्याची रक्कम पाठवू शकतात. नॉन रिपॅट्रिएबल एनपीएस मध्ये, अंशतः रक्कम काढण्याच्या वेळी अथवा परिपक्वतेच्या वेळी, एनपीएस निधी केवळ एन आर ओ खात्यातच जमा करावा लागतो. वैयक्तिक नावावरच एनपीएस खाते उघडता येऊ शकते, मुखत्यारपत्र देऊन हे खाते चालवण्याची तरतूद नाही.परदेशात पॉवर ऑफ प्रेझेन्स सेवा पुरवठादारामार्फत हे

खाते उघडले असल्यास श्रेणी १ खात्यासाठी, खाते उघडताना किमान योगदान ६००० रुपये आणि श्रेणी २ खात्यासाठी ही रक्कम २००० रुपये असली पाहिजे. नंतरचे योगदान वार्षिक किंवा ग्राहकाच्या सोयीप्रमाणे विशिष्ट काळाच्या अवधीने करता येते. ग्राहकांच्या नोंदणीसाठी पॉवर ऑफ प्रेझेन्स सेवा आकार ८ अमेरिकी डॉलर किंवा त्याच मूल्याचे स्थानिक चलन इतके असते.सुरवातीचे आणि नंतरच्या योगदानासाठीचे शुल्क हे त्या रकमेच्या नुसार मात्र किमान १ अमेरिकी डॉलर किंवा त्याच मूल्याचे स्थानिक चलन आणि कमाल 8 अमेरिकी डॉलर किंवा त्याच मूल्याचे स्थानिक चलन इतके असते. वित्तीय नसलेल्या व्यवहारासाठी १ अमेरिकी डॉलर किंवा त्याच मूल्याचे स्थानिक चलन, हे त्या व्यवहारानुसार आकारले जाते. खाते भारतात उघडल्यास श्रेणी १ खात्यासाठी किमान प्रारंभिक योगदान ५०० आणि वार्षिक किमान योगदान १००० रुपये आहे. भारतात ,खाते उघडण्यासाठीचे आणि सेवा शुल्क हे निवासी भारतीयांप्रमाणेच म्हणजे १२५ रुपये आणि योगदानाच्या रकमेच्या ०.२५% मात्र किमान २० रुपये आणि कमाल २५,००० रुपये आहे. वित्तीय नसलेल्या व्यवहारांसाठी, प्रति व्यवहार २० रुपये आकारले जातात.

एनपीएस अंतर्गत कर विषयक लाभ

कर्मचाऱ्यांचा, त्याच्या वेतनाच्या (मूळ वेतन अधिक महागाई भत्ता)१०%,स्वतःचा हप्ता हा प्राप्ती कराच्या कलम ८० सी सी डी (१) खाली कर वजावटीसाठी पात्र असतो मात्र त्यासाठी ८० सी सी ई अंतर्गत १,५०,००० रुपयांची मर्यादा आहे. मालक, कर्मचाऱ्याच्या खात्यात जमा करत असलेली, मूळ वेतन आणि महागाई भत्त्याच्या १०% पर्यंत रक्कमही ८० सी सी डी (२) अंतर्गत कर वजावटीसाठी पात्र असतो. याशिवाय, कलम ८० सी सी डी (१ ब)अंतर्गत, ५०,००० रुपयांपर्यंतच्या गुंतवणुकीला अतिरिक्त वजावट मिळते अशी एनपीएसमधल्या स्वतःच्या योगदानासाठी एकूण २ लाखापर्यंत वजावट मिळू शकते. याशिवाय स्वयं रोजगार करत असलेली व्यक्ती आणि एखाद्या आस्थापनेत अथवा इतर ठिकाणी

सध्या सरकारी कर्मचाऱ्यांचा एनपीएस निधी, एसबीआय पेन्शन फंड,यूटीआय रिटायरमेंट सोल्युशन्स आणि एलआयसी पेन्शन फंड या तीन फंडात,याआधीच्या वर्षातल्या त्यांच्या कामगिरीच्या प्रमाणानुसार गुंतवला जातो. त्याचप्रमाणे निवृत्तीवेतन निधी नियामक आणि विकास प्राधिकरणाच्या गुंतवणूक मार्गदर्शक तत्वांना अनुसरून खालील प्रमाणात ही गुंतवणूक केली जाते:

काम करणारा कर्मचारी यांच्यात यासंदर्भात समानता राहावी यासाठी २०१७ च्या वित्त कायद्यात एकूण ढोबळ उत्पन्नाची, वजावटीसाठीची १० % ही जास्तीत जास्त मर्यादा, स्वयं रोजगार करत असलेल्या व्यक्तीसाठी २० % पर्यंत वाढवण्यात आली आहे.प्रत्येक कर्मचाऱ्यासाठी, वेतन अधिक महागाई भत्त्याच्या १०% पर्यंत, मालक देत असलेले योगदान हे व्यापाराचा खर्च म्हणून दाखवता येते आणि त्यासाठी कोणत्याही कमाल मर्यादेशिवाय, कलम ३६ (१)(iv)(a)अंतर्गत वजावट मिळू शकते.

एनपीएस अंतर्गत शुल्क आणि आकार

एनपीएस मध्ये गुंतवणूक करण्याचा खर्च त्याच्या०.५%पेक्षाही कमी येतो. या खर्चात खाते उघडणे,पॉईंट्स ऑफ प्रेझेन्सचे आकार,खात्याची देखभाल आणि व्यवहार शुल्क,निवृत्तीवेतन निधीसाठी गुंतवणूक व्यवस्थापन शुल्क, एनपीएस ट्रस्ट साठीचे सेवा शुल्क यांचा समावेश आहे.विमा कंपन्या आणि म्युच्युअल फंडाच्या,अशाच प्रकारच्या निवृत्तीवेतन विषयक योजनांशी तुलना करता हा खर्च कमी आहे.

एनपीएस अंतर्गत गुंतवणूक व्यवस्थापन आणि लाभ

सरकारी क्षेत्रातल्या एनपीएस धारकांसाठी गुंतवणूक आकृतिबंध : सध्या सरकारी कर्मचाऱ्यांचा एनपीएस निधी, एसबीआय पेन्शन फंड,यूटीआय रिटायरमेंट सोल्युशन्स आणि एलआयसी पेन्शन फंड या तीन फंडात,याआधीच्या वर्षातल्या त्यांच्या कामगिरीच्या प्रमाणानुसार गुंतवला जातो. त्याचप्रमाणे निवृत्तीवेतन निधी नियामक आणि विकास प्राधिकरणाच्या गुंतवणूक मार्गदर्शक तत्वांना अनुसरून खालील प्रमाणात ही गुंतवणूक केली जाते:

a) ५०%टक्क्यांपर्यंत सरकारी रोखे आणि संबंधित दस्तावेज
b) ४५% पर्यंत कर्ज रोखे आणि तत्सम दस्तावेज
c) १५%पर्यन्त समभाग आणि तत्सम दस्तावेज

d) ५%पर्यंत अल्प मुदतीचे कर्ज आणि संबंधित दस्तावेज

e) ५ %पर्यंत ट्रस्ट आणि इतर गुंतवणूक

सरकारी कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतर एनपीएस धारक कर्मचारी,एचडीएफसी पेन्शन मॅनेजमेंट कंपनी, आयसीआयसीआय प्रुडेन्शिअल पेन्शन फंड मॅनेजमेंट कंपनी, कोटक महिंद्रा पेन्शन फंड, एलआयसी पेन्शन फंड, रिलायन्स कॅपिटल पेन्शन फंड, एसबीआय पेन्शन फंड प्रायव्हेट लिमिटेड,युटीआय रिटायरमेंट सोल्युशन आणि बिर्ला सन लाईफ पेन्शन मॅनेजमेंट या आठ पेन्शन फंडामध्ये निवड करू शकतात.याशिवाय हे ग्राहक गुंतवणुकीचा आकृतिबंध निवडू शकतात. समभाग, सरकारी रोखे, खाजगी रोखे यांचा समावेश असलेला आकृतिबंध निवडू शकतात. मात्र समभाग ५०% पर्यंतच असावेत तर सरकारी रोखे आणि कॉर्पोरेट बॉण्ड आणि रोखे मात्र १००% घेता येतात. ग्राहक लाइफ सायकल फंड निवडू शकतात, ग्राहकाचे वय लक्षात घेऊन गुंतवणुकीचा प्रकार ठरवला जातो. विझा कॉंझर्व्हेटिव्ह लाईफ सायकल फंड, ३५ वर्षापर्यंत, कमाल समभाग गुंतवणूक २५%(लाईफ सायकल:२५), ऑरा मॉडरेट लाईफ सायकल फंड (लाईफ सायकल:५०), ओरान अग्रेसिव्ह लाईफ सायकल फंड (लाईफ सायकल:७५)

३ जून २०१७ रोजी एनपीएस अंतर्गत १०.७ दशलक्ष ग्राहक असून त्यांचे १४२२६३ कोटी रुपयांचे योगदान आहे तर व्यवस्थापनाखाली असलेली एकूण मालमत्ता १८४९४८ कोटी रुपये आहे एकूण ग्राहकांपैकी ४९% ग्राहक सरकारी कर्मचारी आहेत आणि व्यवस्थापनाखाली असलेली एकूण मालमत्ता ८८% आहे. अटल पेन्शन योजनेच्या ग्राहकांची संख्या त्यात मिळवल्यास १६.१ दशलक्ष ग्राहक, १४४३४० कोटी योगदान आणि व्यवस्थापनाखाली असलेली एकूण मालमत्ता १८७१५१ कोटी रुपये आहे. विभागवार तपशील खालील तक्त्यानुसार आहे.

तक्ता : ग्राहक योगदान आणि एनपीएस अंतर्गत व्यवस्थापनाखाली असलेली एकूण मालमत्ता

विभाग	ग्राहकांची संख्या		एकूण निधी		व्यवस्थापनाखाली असलेली एकूण मालमत्ता	
	एकूण आकडे	(%)	कोटी रुपये	(%)	कोटी रुपये	(%)
केंद्र सरकार	१८१९४५७	१७.०	५१ ,३३२	३६.१	७० ,९६५	३८ .४
राज्य सरकार	३४१२४८६	३१.८	७२ ,३३१	५० .८	९१ ,५९५	४९ .५
एकूण	५२३१९४३	४८.८	१२३ ,६६३	८६ .९	१६२,५६१	८७.९
कॉर्पोरेट	६०८४३४	५.७	१२ ,९५०	९ .१	१६,०९१	८ .७
असंघटित	४६०४६८	४.3	३ ,३८७	२ .४	३५२०,०	१.९
एकूण	१०६८९०२	१०.०	१६ ,३३७	११ .५	१९,६१०	१०.६
एनपीएस एलआयटीई	४४२४०६	४१.3	२ ,२६३	१ .६	२,७७७	१.५
एकूण	**१०७२५६५१**	**१००.०**	**१४२ ,२६३**	**१०० .०**	**१८४,९४८**	**१०० .०**
एपीवाय	५३७२६१८		२ ,०७७		२ ,२०३	
एकूण	**१६०९८२६९**		**१४४ ,३४०**		**१८७,१५१**	

योजनेनुसार आणि पेन्शन फंडानुसार तपशीलवार आकडेवारी खालील तक्त्यात दिली आहे. २९ एप्रिल २०१७ रोजी

पेन्शन फंड ▸		**एसबीआय**	**यूटीआय**	**एलआयसी**	**कोटक**	**रिलायन्स**	**आयसीआयसीआय**	**एचडीएफसी**
केंद्र सरकार		१० .४३	१० .०६	१० .१३				
राज्य सरकार		१० .०४	१० .११	१० .२३				
कॉर्पोरेट - सीजी		१० .६१		१० .७९				
श्रेणी -१	ई	९ .६९	११ .८१	१३ .८९	१० .९४	११ .०१	११ .८४	१६ .८०
	सी	११ .१४	९ .७९	११ .६१	११ .०६	९ .६७	११ .११	११ .६५
	जी	१० .०६	८ .७५	१२ .४४	८ .९६	८ .६३	९ .०३	११ .०४
श्रेणी -२	ई	९ .३३	९ .६४	८ .९१	१० .०८	९ .५९	९ .३१	१२ .३१
	सी	१० .८०	९ .९९	९ .९४	९ .८०	९ .४४	११ .०४	९ .९०
	जी	१० .२९	९ .८६	१२ .६३	८ .८२	८ .९५	९ .२०	११ .६५
एनपीएस स्वावलंबन		११ .१०	१० .९६	१० .९२	११ .१८			

स्रोत: www.npst.org.in

एनपीएस गुंतवणूक, विविध वर्गातली मालमत्ता आणि रोख्यात विभागलेली असते. सद्य स्थितीत एकूण एनपीएस गुंतवणुकीपैकी १३.५ % समभागात, ४८% सरकारी रोख्यात, ३५.५% कॉर्पोरेट रोख्यात आणि उर्वरित अल्प मुदतीच्या प्रकारात गुंतवले जातात. ए ए किंवा उच्च मानांकनप्राप्त रोख्यात ९८% कॉर्पोरेट रोखे गुंतवणूक केली जाते. एनपीएस वर मिळणारा वार्षिक सरासरी परतावा -

केंद्र आणि राज्य सरकारी योजनात सुरवातीपासून एप्रिल २०१७ पर्यंत १०% केंद्र सरकार १ एप्रिल ०८, राज्य सरकार २५ जून ०९, स्वावलंबन : (एसबीआय, एलआयसी, यूटीआय):४ ऑक्टोबर १०, (कोटक पीएफ) ३१ जानेवारी १२, कॉर्पोरेट (केंद्र सरकारी धर्तीवर) ५ नोव्हेंबर १२, योजना- [ई ,सी,जी] (श्रेणी -१) (एसबीआय, यूटीआय, आयसीआयसीआय, रिलायन्स, कोटक) १ मे ०९, (एलआयसी) २३ जुलै १३, (एचडीएफसी पीएफ): १ ऑगस्ट १३, योजना- [ई,सी,जी] (श्रेणी -२) (एसबीआय, यूटीआय, आयसीआयसीआय, रिलायन्स, कोटक): १४ डिसेंबर ०९, (एलआयसी) १२ ऑगस्ट १३, (एचडीएफसी पीएफ): १ ऑगस्ट १३, १८ अशा रीतीने, करविषयक कार्यक्षमतेबरोबरच ५०,००० रुपयांची विशेष कर वजावट, सोपी रचना, पारदर्शकता, भौगोलिक आणि नोकरीच्या ठिकाणी नेण्याची क्षमता, पेन्शन फंड आणि गुंतवणूक आकृतिबंधाचे पर्याय, कमी व्यवस्थापन खर्च, आकर्षक परतावा यामुळे राष्ट्रीय पेन्शन प्रणाली ही आकर्षक निवृत्ती योजना ठरली आहे.

■■■

लेखक पेन्शन फंड रेग्युलेटरी ॲन्ड डेव्हलपमेंट ॲथॉरिटीचे पूर्णवेळ सदस्य आहेत.

email: badris.bhandari@pfrda.org.in

असंघटित मजूर क्षेत्रासाठी सामाजिक सुरक्षा

डॉ. रूमा घोष

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचा भारत हा स्थापनेपासून सदस्य आहे. अनेक आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या आणि संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या ठरावांना त्याने सहमती दिली आहे. यातील अनेक ठराव सामाजिक सुरक्षा क्षेत्रासाठी सुसंगत आहेत आणि धारणक्षम विकासाच्या उद्दिष्टांमध्ये याचा पुनरुच्चार केला आहे. आपल्या देशात सामाजिक सुरक्षा पद्धती नीटपणे स्थापित झाल्या आहेत.

सामाजिक सुरक्षा ही न्यायी समाजाची एक आवश्यकता आहे. यामुळेच सामाजिक सुरक्षेचा अधिकार हा एक मानवी हक्क आहे संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्कांच्या वैश्विक जाहीरनाम्याच्या कलम २२ आणि २५ नुसार सामाजिक सुरक्षेचा हक्क हा मूलभूत हक्क आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटन (ILO) यांनी १९५२ मध्ये निर्गमित केलेला सामाजिक सुरक्षा (किमान मानक) करार सुद्धा सामाजिक सुरक्षेच्या खालील महत्त्वाच्या मुद्यांवर किमान मानकाचा आग्रह धरतो. यानुसार सामाजिक सुरक्षेत खालील नऊ क्षेत्रात तरतुदींची आवश्यकता आहे. १) वैद्यकीय मदत, २) आजारपणात मदत, ३) बेकार स्थितीतील मदत, ४) वृद्धावस्थेतील मदत, ५) नोकरीत असताना झालेल्या इजेसाठी मदत, ६) कुटुंबासाठी साहाय्य, ७) प्रसूतीसाठी मदत, ८) अग्राहय ठरले असता मदत, ९) मृत इसमाच्या मागे जिवंत राहिलेल्यासाठी साहाय्य.

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचा भारत हा स्थापनेपासून सदस्य आहे. अनेक आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या आणि संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या ठरावांना त्याने सहमती दिली आहे. यातील अनेक ठराव सामाजिक सुरक्षा क्षेत्रासाठी सुसंगत आहेत आणि धारणक्षम विकासाच्या उद्दिष्टांमध्ये याचा पुनरुच्चार केला आहे. आपल्या देशात सामाजिक सुरक्षा पद्धती नीटपणे स्थापित झाल्या आहेत. वर व्यक्त केलेल्या ILO सामाजिक सुरक्षा (किमान मानके) ठराव १०२ (१९५२) नुसार नऊ क्षेत्रात वेगवेगळया स्तरावर भर दिला आहे. मात्र त्यात संघटित क्षेत्रातील औपचारिक कामकरी वर्गाचा समावेश होतो. विशिष्ट आकारमानाच्या वरच्या खाजगी कंपनीचा वा कोणत्याही आकारमानाच्या सार्वजनिक क्षेत्रातील संस्थेचा यात विचार केला आहे. या सर्व उपाययोजनांचा काही लाभ संघटित क्षेत्रातील अनौपचारिक कर्मचाऱ्यांना होतो तर काही असंघटित क्षेत्रातील आस्थापनांना होतो.

भारतीय अर्थव्यवस्थेतील असंघटित क्षेत्रातील कामगार वर्गाचे प्रमाण ८४% आहे आणि हे असंघटित क्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे मात्र त्यांना सर्वसमावेशक सामाजिक सुरक्षेचा लाभ होत नाही.

भारतातील असंघटित क्षेत्र

NSSO च्या ६८ व्या बैठकीच्या अंदाजानुसार कामकरी वर्गातील ८४% हे असंघटित वा अनौपचारिक क्षेत्रातील आहेत आणि ९०% हून जास्त लोक हे अनौपचारिक उपजीविका करतात. (औपचारिक आणि अनौपचारिक क्षेत्र एकत्र धरुन)

भारतातील अनौपचारिक क्षेत्र आणि त्यातील उपजीविका २०११-१२ या NSS च्या अहवालानुसार ग्रामीण भागात स्वतंत्र काम करणाऱ्यांच्या ९७%, किरकोळ कामगार वर्गाच्या ७८% आणि नियमितपणे मजुरी वा पगार मिळणाऱ्यांच्या ४२% लोक अनौपचारिक क्षेत्राशी संबंधित आहेत हेच प्रमाण शहरी विभागात स्वतंत्रपणे काम करणाऱ्यांच्या ९८%, किरकोळ कामे करणाऱ्यांच्या ८१% आणि नियमितपणे मजुरी वा पगार मिळणाऱ्यांना ४०% हे अनौपचारिक क्षेत्रात आहेत. या आकडेवारीवरून हे लक्षात येते की अनौपचारिक क्षेत्रातील कामकरी वर्गापैकी ग्रामीण विभागातील ७५% आणि शहरी विभागातील ७०% हे छोटया संस्थांशी संबंधित काम करतात. शतकी आणि बिगरशेतकी क्षेत्रातील ७९% कामकरी वर्गाचा रोजगाराबाबत कोणताही लेखी करार केलेला नव्हता. तर शेतकी आणि बिगरशेतकी क्षेत्रातील ४२% कामगार हे तात्पुरत्या स्वरुपातील काम करत होते. हेच प्रमाण किरकोळ कामगाराच्या बाबत ६०% होते तर नियमित मजुरी वा नोकरी असलेल्यांच्या बाबतीत हे प्रमाण २८% होते.

कृषिक वा अकृषिक क्षेत्रातील ७२% कामगार हे सामाजिक सुरक्षा साहाय्यासाठी पात्र नव्हते. हे प्रमाण किरकोळ कामगारांसाठी ९३% होते तर नियमित मजुरी वा वेतन असलेल्या वर्गासाठी हे प्रमाण ५६% होते. नोकरीच्या/कामाच्या बाबतीत औपचारिक क्षेत्रातील मालकासोबत कोणताही करार नसलेला आणि घरगुती वा स्वतंत्र वा मजुरीवर काम करणारा म्हणजे असंघटित क्षेत्रातील कामगार अशी येथे ढोबळ मानाने व्याख्या करता येईल.

सामाजिक वा आर्थिकदृष्ट्या अप्रगत वर्गातील लोक हे मोठया प्रमाणात अनौपचारिक आर्थिक उलाढालीत एकवटलेले आढळून येतात. मागील दोन दशकात भारतीय अर्थव्यवस्थेत मोठीच सुधारणा झाली आहे त्याचसोबत रोजगारातील अनौपचारिकीकरण ही वाढते आहे. अनौपचारिक आणि औपचारिक आर्थिक उपक्रमात एकमेकांशी संबंध वाढतो आहे. अनौपचारिक अर्थव्यवस्थेची गतिमानता उत्पादित माल, रोजगार, उत्पन्न या तिन्ही बाबतीत नवीन आहे. चांगल्या आणि समग्र वाढीसाठी अनौपचारिक अर्थव्यवस्थेकडे बारकाईने लक्ष देण्याची गरज आहे.

अनौपचारिक अर्थव्यवस्थेत समाविष्ट असलेल्याची या देशातील आवश्यकता वाढवणे आणि या क्षेत्रातील कर्ज, कौशल्य, तंत्रज्ञान, जाहिरात, पायाभूत सुविधा या

सामाजिक वा आर्थिकदृष्ट्या अप्रगत वर्गातील लोक हे मोठया प्रमाणात अनौपचारिक आर्थिक उलाढालीत एकवटलेले आढळून येतात. मागील दोन दशकात भारतीय अर्थव्यवस्थेत मोठीच सुधारणा झाली आहे. त्याचसोबत रोजगारातील अनौपचारिकीकरण ही वाढते आहे. अनौपचारिक आणि औपचारिक आर्थिक उपक्रमात एकमेकांशी संबंध वाढतो आहे. अनौपचारिक अर्थव्यवस्थेची गतिमानता उत्पादित माल, रोजगार, उत्पन्न या तिन्ही बाबतीत नवीन आहे.

गरजांकडे लक्ष देणे या दोन्हींसोबत धारणात्मक मोठया प्रमाणातील वाढ ही गुंफली आहे. शिवाय कोणत्याही औपचारिक सामाजिक सुरक्षा संरक्षणाशिवाय मोठया प्रमाणात या क्षेत्रातील कामगार वर्ग आहे. औपचारिक सामाजिक सुरक्षा संरक्षणाची मोठीच उणीव आहे. उदा. अंशदानावर आधारित कोणतीही सामाजिक विमा योजना वा कर/शुल्क आधारित कोणतेही सामाजिक सुरक्षा साहाय्य यात नाही. शेवटच्या शतकात विकास पावलेल्या आणि आज अस्तित्वात असलेल्या सामाजिक सुरक्षा पद्धतीला हे मोठेच आव्हान आहे.

एकंदर कामकरी वर्गापैकी संघटित क्षेत्रात ७ टक्के लोक काम करतात आणि वेगवेगळया कायद्यामुळे त्यांना पुरेशी सुरक्षा मिळाली आहे. कामगार राज्य विमा कायदा १९४८, कामगार प्रॉव्हिडंट फंड आणि संकीर्ण तरतुदी १९५२ इ. कायदे या कामगारांना सामाजिक सुरक्षा देतात. हे दोन कायदे वैद्यकीय आणि विमा संरक्षण आणि प्रॉव्हिडंट फंड व निवृत्तीवेतन हे दोन फायदे कामगारांना मिळवून देतात. असंघटित क्षेत्रात ४७२.९ दशलक्ष कामगार काम करतात आणि रोजगाराची शाश्वती, मजुरी, काम करण्याची परिस्थिती सामाजिक सुरक्षितता आणि कल्याण या बाबतीत त्यांना पुरेसे संरक्षण मिळत नाही. याला अनेक कारणे आहेत. उदा. किरकोळ आणि हंगामी कामे, विखुरलेल्या कामाच्या जागा, अत्यंत वाईट अशी काम करण्याची परिस्थिती. नोकर आणि नोकरी अशा सुरक्षित नात्याचा अभाव, अनियमित आणि दीर्घ कामाचे तास, कर्ज न मिळणे, कायद्याचे संरक्षण, सामाजिक सुरक्षा आणि शासकीय मदतीचा अभाव.

असंघटित क्षेत्रातील कामकाजाबाबत राष्ट्रीय आयोग (NCEUS) काही भूमिका मांडतो. असंघटित क्षेत्रातील कर्मचारी वर्गाला तीन प्रकारच्या सामाजिक सुरक्षितता मिळत नाहीत. १) रोजगाराची सुरक्षितता (कधीही विनाकारण

कामावरुन काढले जाण्यापासून काहीही सुरक्षितता नाही), २) काम करतानाची सुरक्षितता (कामाच्या ठिकाणी अपघात आणि आरोग्याचे प्रश्न या बाबतीतील सुरक्षितता नाही) आणि सामाजिक सुरक्षितता (आरोग्य मदत निवृत्ती वेतन प्रसूतिपूर्व आणि पश्चात साहाय्य नसणे) असंघटित क्षेत्राला सामाजिक सुरक्षा देणे, लोकसंख्येचा कल लक्षात घेता झपाटयाने वाढणारी वृद्धांची संख्या व कधीही कमी न होणारी असंघटित क्षेत्रातील कामगार संख्या या गोष्टी लक्षात घेऊन भारत सरकारने अत्यंत महत्त्वाचा असा असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा कायदा (UWSSA) हा २००८ मध्ये लागू केला. भारतातील मोठया प्रमाणावर असलेल्या असंघटित क्षेत्रातील कामगारांना किमान स्वरुपाची सामाजिक सुरक्षितता देणे हा त्या मागील उद्देश होता. यामुळे मजुरी आणि आरोग्यातील चढउतार, धक्के यात त्यांनी तग धरावा, गरीबीच्या विळख्यापासून दूर राहावे आणि मानाने जगता येण्यासारखी परिस्थिती असावी हा उद्देश होता. हक्कांवर आधारित महत्त्वाचे दस्तऐवज अशी जरी त्याची ओळख असली तरीही कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी योग्य ती यंत्रणा आणि आवश्यक निधी याची मात्र पुरेशी तरतूद केलेली नाही. या कायद्यामुळे राश्ट्रीय आणि राज्य स्तरावर सामाजिक सुरक्षा मंडळ यांची रचना झाली याचे स्वरुप सल्लागार स्वरुपाचे आहे.

असंघटित क्षेत्रासाठी सामाजिक सुरक्षितता

आज आपल्या देशात सामाजिक सुरक्षितता संरचना दोन स्तरांवर काम करते. पहिल्या स्तरावर मूलभूत सामाजिक वा मनुश्य विकासासाठी सार्वत्रिक कार्यक्रम आणि योजना आहेत, उदाहरणार्थ साक्षरता अभियान, शालेय शिक्षण तरतूद कार्यक्रम, आरोग्यसेवा, पाणी आणि मलनिःसारण यंत्रणा इ. दुसऱ्या स्तरावर सामाजिक आर्थिक सुरक्षितता कमकुवत नागरिकांना

देणाऱ्या सामाजिक/मनुश्य विकास योजना आहेत. ते काम करत असोत वा बेकार त्यांना उत्तेजन व सुरक्षा देणाऱ्या या योजना आहेत

लोकसंख्येचा कल लक्षात घेता झपाटयाने वाढणारी वृद्धांची संख्या व कधीही कमी न होणारी असंघटित क्षेत्रातील कामगार संख्या या गोष्टी लक्षात घेऊन भारत सरकारने अत्यंत महत्त्वाचा असा असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा कायदा (UWSSA) हा २००८ मध्ये लागू केला. भारतातील मोठया प्रमाणावर असलेल्या असंघटित क्षेत्रातील कामगारांना किमान स्वरुपाची सामाजिक सुरक्षितता देणे हा त्या मागील उद्देश होता.

उदा. ICDS, PDS, NSAP, MGNREGA

अभावाशी संबंधित सामाजिक सुरक्षितता देणाऱ्या अनेक योजना वा कार्यक्रम आहेत तरीही असंघटित क्षेत्रातील कामगारांपर्यंत सामाजिक सुरक्षेचे पर्याय पोचत नाहीत. आजारपण, अनारोग्य, अपघात, मृत्यू आणि म्हातारपण यातून उद्भवणाऱ्या संकटांचा सामना करणे त्यांना कठीण जाते. अनारोग्य, अपघात, मृत्यू, वृद्धापकाळ इत्यादी मुळे उद्भवणाऱ्या प्रसंगांचा संकटांचा सामना करण्यासाठी कायद्याचा पाठिंबा असलेले जे सामाजिक सुरक्षा वा कल्याणकारी पर्याय भारतात आहेत ते फक्त औपचारिक क्षेत्रासाठी आहेत. यामुळे संकटांचा सामना करण्यासाठी असंघटित क्षेत्रातील कामगारांना सामाजिक विम्याचे संरक्षण मिळणे हे महवाचे ठरते. जरी गरीबांचे प्रमाण कमी होत असले तरी जास्तीत जास्त गरीब लोक हे असंघटित क्षेत्रात काम करतात हे येथे लक्षात ठेवले पाहिजे. सामाजिक सुरक्षा नसल्याने उत्पादकतेत घट होते. वारंवार आजारपणे अनारोग्य यामुळे कामगारांची केवळ उत्पादकताच कमी होते असे नाही तर वारंवार आजारपणावर खर्च झाल्याने घरावर खर्चाचा बोजा वाढत जातो. त्यामुळे असंघटित क्षेत्रातील कामगारांना किमान सुरक्षा साहाय्य दिल्याशिवाय त्यांच्या उत्पन्न वाढीला फार अर्थ नाही.

आज देशात सामाजिक सुरक्षा राबवताना अनेक आव्हाने आहेत. १) भरमसाठ योजना, निर्णय आणि मंडळे, २) व्याप्ती आणि आवाका यात कमतरता, ३) अपुरी मदत, ४) विस्कळितपणा, ५) योजना निवड आणि राबवण्याचा निकृश्ट दर्जा, ६) जास्त खर्च, ७) बरेचसे विभाग विषेशतः असंघटित क्षेत्रातील कामकरी लाभापासून वंचित आहेत.

कामगार आणि रोजगार मंत्रालयाने हे सर्व लक्षात घेतले आणि कामगारांच्या दुसऱ्या राष्ट्रीय आयोगाच्या सूचनांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने केंद्रीय कामगार कायदे सोपे करणे, एकत्र करणे आणि व्यवहार्य करणे अशी पावले उचलली. जे कामगार कायदे सामाजिक सुरक्षेशी संबंधित होते (EPF कायदा, ESI कायदा, प्रसूती साहाय्य कायदा, उपदान देय रक्कम कायदा, कर्मचारी नुकसानभरपाई कायदा असंघटित सामाजिक सुरक्षा कायदा आणि अनेक कल्याणकारी निधी/शुल्क कायदे असे साधारण १५ कायदे) असे कायदे एकत्र करुन एक सामाजिक सुरक्षा आणि कल्याण नियमावली तयार केली.

या नियमावलीने त्रिस्तरीय सामाजिक सुरक्षेच्या प्रशासनाची रचना सुचवली आहे. यात तीन भाग पाडलेले आहेत. १) पंतप्रधानांच्या नेतृत्वाखालील राश्ट्रीय सामाजिक सुरक्षा परिशद, २) केंद्रीय स्तरावर केंद्रीय सामाजिक सुरक्षा मंडळ, ३) राज्य/केंद्रशासित प्रदेश स्तरावर सामाजिक सुरक्षा संरचनेची अंमलबजावणी करणारे राज्यस्तरीय मंडळ. स्थानिक प्रशासन ग्रामपंचायत/नगर परिशद हे नोंदणी करणे सुविधा पुरवठयासाठी साहाय्य इ. गोष्टींची जबाबदारी घेईल. त्यामुळे याला चौथा भाग ही म्हणता येईल.

सर्व कामगारांची नोंदणी अनिवार्य असेल आणि त्यासाठी 'आधार' क्रमांकावर आधारित नोंदणी पद्धत असेल आणि एक सामाजिक सुरक्षा खाते असेल (विश्वकर्मा कार्मिक सुरक्षा खाता) (विकास) हे खाते नोंदणी घेतल्यावर उघडले जाईल आणि ते कामगाराच्या आधार क्रमांकाशी जोडले जाईल. जर कामगार एका राज्यातून दुसऱ्या राज्यात गेला तर त्याला मिळणारे साहाय्य पुढच्या राज्यात स्थानांतरित करता येईल. ही नवीन सामाजिक सुरक्षा चौकट ही केवळ नागरिकांचा अनुनय वा कल्याणकारी कृती नसेल तर देशातील कामगारांचा तो हक्क असेल.

■■■

लेखिका केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्रालयाच्या अखत्यारितील व्ही. व्ही. गिरी नॅशनल लेबर इन्स्टिट्यूटमध्ये प्राध्यापक आहेत.

email: rumaghosh.vvgnli@gov.in

साथ आहे, विश्वास आहे
...होत हा विकास आहे
द्रष्टे सरकार भारताचे
भविष्य सुरक्षित करत आहे
भावी पिढीचे पंख
नवीन भारतासाठी
2013-14 मध्ये
12 किलोमीटर
प्रतिदिन
शहरी आणि राष्ट्रीय महामार्ग
तेव्हा
आता
2016-17 मध्ये
19 किलोमीटर
प्रतिदिन
समृद्धीसाठी रस्ता
रस्ते बांधणीमध्ये गतिमानता
ग्रामीण रस्ते
2011-14 मध्ये
73.5 किलोमीटर
प्रतिदिन
तेव्हा
आता
2014-17 मध्ये
113 किलोमीटर
प्रतिदिन
शहरी आणि राष्ट्रीय महामार्ग
जम्मू आणि काश्मीरमध्ये चेनानी आणि नाशरी दरम्यान ९.8 किलोमीटर
लांब भारताचा सर्वात लांब बोगदा लोकांसाठी खुला करण्यात आला.
जम्मू आणि श्रीनगरच्या दरम्यान प्रवासाच्या कालावधीत 2 तासांपर्यंत घट.
ग्रामीण रस्ते
2022 ऐवजी 2019 पर्यंत 65,000 वस्त्यांना जोडण्याचे उद्दिष्ट.
भारतमाला
तटीय/सीमा प्रदेश, तीर्थस्थळे आणि जिल्हा मुख्यालये जोडण्यासाठी
राष्ट्रीय महामार्ग
davp

सामाजिक सुरक्षेची वास्तव स्थिती व उपाय

उर्मी गोस्वामी

सामाजिक सुरक्षेच्या उपाययोजना या जनतेशी निगडित असतात व सरकार लोकांना आर्थिक सुरक्षा तसेच सामाजिक कल्याणाच्या योजना देत असते त्या व्यक्ती व कुटुंबे यांना लाभदायी असतात.पारंपरिक पद्धतीने पाहिले तर काही समाजातील उणिवा भरून काढण्यासाठी लाभार्थींची निवड केली जाते त्यानुसार कार्यक्रम आखले जातात पण त्यातून नेहमीच अपेक्षित फलश्रुती हाती येईल, असे नसते. आपण आपल्या आर्थिक सुरक्षेची व सामाजिक कल्याणाची मापदंड पातळी वाढवत नाही तोपर्यंत शाश्वत सलक्ष्य प्रयत्न शक्य नसतात. त्यामुळे आर्थिक सुस्थिती निर्माण करणे व त्याच्या जोडीला समाजाची बोट तरवणे हे आवश्यक असते.

योजना देत असते त्या व्यक्ती व कुटुंबे यांना लाभदायी असतात. पारंपरिक पद्धतीने पाहिले तर काही समाजातील उणिवा भरून काढण्यासाठी लाभार्थींची निवड केली जाते त्यानुसार कार्यक्रम सागराला भरती असेल तर सगळ्याच बोटी तरून जातात असे अमेरिकेचे दिवंगत अध्यक्ष जॉन एफ केनेडी यांनी म्हटले होते. एखाद्या देशाची सर्वसाधारण अर्थव्यवस्था कशी आहे याचे वर्णन करण्यासाठी साधारणपणे त्यांच्या या ओळी नेहमीच वापरल्या जातात. भारताच्या बाबतीतही तेच खरे आहे. सामाजिक सुरक्षेच्या उपाययोजना या जनतेशी निगडित असतात व सरकार लोकांना आर्थिक सुरक्षा तसेच सामाजिक कल्याणाच्या आखले जातात पण त्यातून नेहमीच अपेक्षित फलश्रुती हाती येईल असे नसते. आपण आपल्या आर्थिक सुरक्षेची व सामाजिक कल्याणाची मापदंड पातळी वाढवत नाही तोपर्यंत शाश्वत सलक्ष्य प्रयत्न शक्य नसतात. त्यामुळे आर्थिक सुस्थिती निर्माण करणे व त्याच्या जोडीला समाजाची बोट तरवणे हे आवश्यक असते. शिक्षण, आरोग्य व कौशल्य या क्षेत्रात आता रोजीरोटीच्या संधी आहेत त्यामुळे भरतीच येणार आहे म्हणजे अर्थव्यवस्था काही प्रमाणात सुधारणार आहे. लोकांची सामाजिक अवस्था उंचावणे महत्वाचे आहे. वंचित घटकांची जीवनमान उंचावणे गरजेचे आहे. केवळ

केवळ जाती, समुदाय, धर्म यांच्या छायेत नागरिकांचे कल्याण साधण्याचे मापदंड कितपत योग्य आहेत हा प्रश्न आहे. भारतातील लोकांच्या गरजा प्रचंड आहेत. दारिद्र्यात जीवन जगणाऱ्यांना वर काढणे व त्यांना शाश्वत प्रयत्नातून आर्थिक उन्नतावस्था देणे ही सरकारची मोठी जबाबदारी आहे. लोकसंख्येतील काही समुदाय हे आर्थिक मागास आहेत. त्यांची सामाजिक ओळख वेगळी आहे. त्यांना पुढे आणणे त्यांची आर्थिक अवस्था सुधारणे आवश्यक आहे. तसे झाले तरच त्यांना त्यांचे जीवन सुधारण्याची संधी मिळेल.

जाती, समुदाय, धर्म यांच्या छायेत नागरिकांचे कल्याण साधण्याचे मापदंड कितपत योग्य आहेत हा

प्रश्न आहे. भारतातील लोकांच्या गरजा प्रचंड आहेत. दारिद्र्यात जीवन जगणाऱ्यांना वर काढणे व त्यांना शाश्वत प्रयत्नातून आर्थिक उन्नतावस्था देणे ही सरकारची मोठी जबाबदारी आहे. लोकसंख्येतील काही समुदाय हे आर्थिक मागास आहेत. त्यांची सामाजिक ओळख वेगळी आहे. त्यांना पुढे आणणे त्यांची आर्थिक अवस्था सुधारणे आवश्यक आहे. तसे झाले तरच त्यांना त्यांचे जीवन सुधारण्याची संधी मिळेल. साधारण व लक्ष्य निर्धारित प्रयत्नात सामाजिक व आर्थिक मागासलेपण यांचा विचार एकाचवेळी करणे आवश्यक आहे. सरकारने दलित, आदिवासी व अल्पसंख्याकांच्या आर्थिक सुरक्षा व कल्याणासाठी केलेल्या उपाययोजनांचे मूल्यमापन केले तर सर्वसाधारण उपायांचा विचार केला नाही तर वेगळे व निराशादायी चित्र सामोरे येईल. ईश्वरचंद्र विद्या सागर व विवेकानंद यांच्यासारख्या समाजसुधारकांनी समाजात स्त्रियांची स्थिती उंचावण्याला महत्व दिले आहे. त्यांच्या मते स्त्रियांची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारण ही यातील पहिली पायरी आहे. अलिकडच्या काही योजनात महिलांना स्थान दिलेले दिसते. त्यात सामाजिक आर्थिक बदलाची बीजे आहेत. सरकारची उज्ज्वला योजना हे त्याचेच उदाहरण आहे. ही योजना कुणा धार्मिक समुदायासाठी नाही किंवा जातीसाठीही नाही पण गरिबांसाठी आहे. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना त्याचा फायदा आहे. ३ एप्रिल २०१७ पर्यंत या योजनेचे किमान २० दशलक्ष लाभार्थी आहेत अनुसूचित जाती, जमाती , मुस्लीम समाजातील महिलांना त्याचा लाभ झाला आहे. पंतप्रधानांनी २०१६ मध्ये ही योजना जाहीर करताना दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना ५००००००० गॅस जोडण्या देण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. महिलांना लाकूडफाटा वापरावा लागतो, धुरामुळे फुफ्फुसे खराब होतात. काही महिला गोवऱ्या

अलिकडच्या काही योजनात महिलांना स्थान दिलेले दिसते. त्यात सामाजिक आर्थिक बदलाची बीजे आहेत. सरकारची उज्ज्वला योजना हे त्याचेच उदाहरण आहे. ही योजना कुणा धार्मिक समुदायासाठी नाही किंवा जातीसाठीही नाही पण गरिबांसाठी आहे. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना त्याचा फायदा आहे. ३ एप्रिल २०१७ पर्यंत या योजनेचे किमान २० दशलक्ष लाभार्थी आहेत. अनुसूचित जाती, जमाती , मुस्लीम समाजातील महिलांना त्याचा लाभ झाला आहे. पंतप्रधानांनी २०१६ मध्ये ही योजना जाहीर करताना दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना ५०००००००० गॅस जोडण्या देण्याचे उद्दिष्ट ठेवले होते.

वापरतात त्यांनाही धुराचा त्रास होतो. त्यामुळे या महिलांना ताशी ४०० सिगरेट ओढण्याइतका आरोग्यास अपाय होतो. त्यामुळे उज्ज्वला योजना त्यांच्या फायद्याची होती. त्यांना स्वच्छ इंधन मिळाल्याने त्या कुटुंबातील लाकूडफाटा गोळा करणारी मुले आता शिकू लागली आहेत. या कुटुंबांचा डॉक्टरांचा खर्च कमी झाला आहे. श्वसनाचे रोग कमी होत आहेत. मुलांना आरोग्यदायी घरे मिळत आहेत कारण तिथे आता धूर नाही. ही सुरूवात आहे. जनधन योजना हे दुसरे एक उदाहरण. यात कुठल्या समाजाला डोळ्यापुढे ठेवले नव्हते. पण जे लोक बँकिंग प्रणालीच्या बाहेर आहेत त्यांना त्यात आणणे हा उद्देश होता. त्यांना आर्थिक सेवा देण्याचे सरकारने ठरवले होते. ठेवी, कर्ज, विमा, निवृत्ती वेतन या सेवा त्यात होत्या. या योजनेमुळे गरीब लोकांना शून्य पैशात खाते उघडता आले. त्यांना डेबिट व क्रेडिट कार्डे मिळाली. पूर्वी ही पैसेवाल्यांची मक्तेदारी होती. आता जनधन योजनेने सगळे चित्र बदलले आहे. सरकारी फायदे, अनुदाने, शिष्यवृत्त्या आता खात्यात जमा होत आहेत. मध्यस्थांपासून मुक्ती मिळाली आहे. त्याचा सामाजिक व आर्थिक परिणाम मोठा झाला आहे. लोकांना आर्थिक अधिकार मिळाले आहेत. विशिष्ट गटांसाठी सामाजिक सुरक्षा व कल्याण योजना राबवताना त्या विशिष्ट पद्धतीने तयार केल्या पाहिजेत. संबंधितांचे आर्थिक व सामाजिक उन्नयन होण्यासाठी त्यांचे सामाजिक अडथळे दूर केले पाहिजेत. अल्पसंख्याकांसाठीच्या योजनात शिक्षण, रोजगार व सक्षमीकरणावर भर आहे. सरकारने २०१४-१५ व २०१५-१६ मध्ये नई मंझील व उस्ताद (अपग्रेडिंग स्कील्स अँड ट्रेनिंग इन ट्रॅडिशनल आर्टस अँड क्राफ्टस फॉर डेव्हलपमेंट) या योजना

सुरू केल्या. त्यात अल्पसंख्याकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे हा हेतू होता. नई मंजीलचा हेतू शिक्षण व कौशल्यविकास हा होता. शाळेत नापास होऊन बाहेर पडलेल्यांना याचा फायदा होता. उस्ताद योजनेत अल्पसंख्याकात पारंपरिक कला व कौशल्य यांचा विकास, कारागीरांचे उन्नयन घडवणे हा हेतू होता. केंद्रीय अर्थसंकल्पात २०१६-१७ मध्ये नई मंजीलसाठी १७५ कोटींची तरतूद करण्यात आली होती. उस्ताद योजनेत २२ कोटींची तरतूद केली होती. पण या दोन्ही योजनात शिक्षण, कौशल्य विकास व रोजीरोटी यावर भर होता. अल्पसंख्याक मंत्रालयाने १८२०००० विद्यार्थ्यांना ४७४० कोटींच्या शिष्यवृत्त्यांचे वाटप केले. बेगम हजरत महल शिष्यवृत्ती योजनेत १ लाख ३८ हजार ४२६ विद्यार्थिनींना १६६ कोटींची शिष्यवृत्ती देण्यात आली. कौशल्य विकास कार्यक्रमात ४० टक्के महिलांसह ५ लाख २० हजार युवकांना फायदे देण्यात आले सद्भाव मंडप योजनेत ३३ पदवी महाविद्यालये व २२३ कौशल्य केंद्रे सुरू करण्यात आली. गेल्या सहा वर्षात गुरूकुलसारख्या १८ निवासी शाळा सुरू झाल्या. तेहरीक ए तालिम योजनेत शिक्षण, हुनारहाट योजनेत कारागीरांना बाजारपेठ संधी देण्यात आल्या. त्यासाठी उस्ताद सम्मान संगम कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. पाच आंतरराष्ट्रीय शिक्षण संस्थांनी या कार्यकमांचे आयोजन केले. अल्पसंख्याकांसाठी १०० गुरूकुल पद्धतीच्या नवोदय शाळा सुरू केल्या. अल्पसंख्याकांचे शिक्षण व रोजगारक्षमता सुधारणे हा त्यातील हेतू होता. ही चांगली सुरूवात होती. सरकारने महिलांसाठी नई रोशनी योजना राबवली. त्यात महिलांना प्रशिक्षण देण्यात आले. युवकांसाठी मानस सारख्या योजना राबवण्यात आल्या. त्यात त्यांची उद्योजकता कौशल्ये वाढवण्याचा प्रयत्न झाला. पण सरकारने यापेक्षा अधिक काम करण्याची गरज आहे. सरकारने शिक्षणात अजून योजना राबवाव्यात. शिक्षण संधी सुधारल्या पाहिजेत. शिक्षण हीच कुठल्याही व्यक्तीचे आयुष्य बदलण्याची गुरूकिल्ली आहे. त्यातूनच लोकांना सामाजिक व आर्थिक विकासाच्या संधी मिळू शकतात. वंचित व गरीब कुटुंबातील मुलांपर्यंत पोहोचण्याचे प्रयत्न आणखी वाढवायला हवेत. जेथे सार्वजनिक शिक्षण व्यवस्था पोहोचली नाही त्या समाजात व भागात ती पोहोचली पाहिजे. शाळांना सुविधा दिल्या पाहिजेत. तेथे पेयजल व्यवस्था व प्रसाधनगृहे, वाचनालये या सुविधा असल्या पाहिजेत. शिक्षकांमध्ये गुंतवणूक केली पाहिजे. मुला मुलींना शिष्यवृत्त्या दिल्या तर अनेक मागास समाजातील उच्च शिक्षणाची स्थिती बदलेल.त्यासाठी शिक्षणात गुंतवणूक हवी. रोजगाराच्या संधी निर्माण केल्या पाहिजेत. त्यासाठी मुलांना पात्र बनवले पाहिजे तीच सामाजिक सुरक्षेतील खरी गुंतवणूक असणार आहे. त्याशिवाय आपण या सागरात तरू शकणार नाही.

विशिष्ट गटांसाठी सामाजिक सुरक्षा व कल्याण योजना राबवताना त्या विशिष्ट पद्धतीने तयार केल्या पाहिजेत. संबंधितांचे आर्थिक व सामाजिक उन्नयन होण्यासाठी त्यांचे सामाजिक अडथळे दूर केले पाहिजेत. अल्पसंख्याकांसाठीच्या योजनात शिक्षण, रोजगार व सक्षमीकरणावर भर आहे. सरकारने २०१४-१५ व २०१५-१६ मध्ये नई मंझील व उस्ताद (अपग्रेडिंग स्कील्स अँड ट्रेनिंग इन ट्रॅडिशनल आर्टस अँड क्राफ्टस फॉर डेव्हलपमेंट) या योजना सुरू केल्या. त्यात अल्पसंख्याकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे हा हेतू होता. नई मंजीलचा हेतू शिक्षण व कौशल्यविकास हा होता.

■■■

लेखिका इकॉनॉमिक टाइम्स मध्ये सहाय्यक संपादक असून विकास आणि सामाजिक क्षेत्र या विषयाच्या अभ्यासक आहेत.

email: urmi.goswami@gmail.com

आगामी अंक

वस्तू आणि सेवा कर (GST)

ऑगस्ट २०१७



परिवर्तनासाठी
सुधारणा
कामगारांना प्रोत्साहित करण्यासाठी
कामगार सुधारणा
कृषी आणि
बिगर-कृषी दोन्ही
क्षेत्रांमध्ये किमान
वेतनात 42% वाढ
बोनस पात्रता
मर्यादा मासिक
रुपये 10 हजारांवरून
रुपये 21 हजारांपर्यंत
वाढवली
1 हजार रुपयांपेक्षा
कमी निवृत्ती वेतन
असलेल्या 28 लाख
कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी
(ईपीपी) निवृत्ति वेतन
धारकांना किमान 1 हजार
रुपये निवृत्तीवेतन
ईपीएफओ च्या सर्व
सदस्यांना विशिष्ट खाते
क्रमांक वितरित;
पीपी खात्यातून
रक्कम काढण्याबाबत
अटी शिथिल

भारतातील सामाजिक सुरक्षा कायदे

प्रा. डॉ. आर. के. नाळे

उत्पादन प्रक्रियेत आधुनिक यंत्राच्या वाढत्या वापरामुळे आजारपण, अपघात आणि अपघाती अपंगत्व, मृत्यू यासारखी संकटे नियमित उद्‌भवत आहेत. महाराष्ट्रातील वेगवेगळया व्यवसायात काम करताना अपंगत्व येणे, आजारी पडणे, बेकारी, वृद्‌धत्व, मृत्यू होणे इत्यादी संकट प्रसंगी कामगार कमी उत्पन्नामुळे स्वतःचे रक्षण करू शकत नाही. अशा विविध संकटकालीन आपत्तीना तोंड देता यावे, यासाठी समाजाने व सरकारने मदतीचा हात पुढे केला पाहिजे. कामगारांना सर्व प्रकारची मदत करण्याची जबाबदारी स्वतः कामगार, मालक व सरकार यांची असते.

भारतातील मोठे उद्योग, लघु उद्योग, कुटीरोद्योग व छोटे उद्योग असे चार प्रकारचे उद्योग चालत आहेत. देशातील व महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्ती आपली आर्थिक व सामाजिक उन्नती करण्यासाठी वेगवेगळया व्यवसायात कार्यरत असल्याचे दिसून येते. अलीकडील काळात प्रत्येक व्यवसायाची रचना बदलत असून कमी खर्चात जास्तीचे उत्पादन करण्यासाठी उत्पादक वर्गाने जुन्या व पारंपारिक यंत्रे व तंत्राचा वापर बंद केला असून आधुनिक नवतंत्राचा वापर वाढविला आहे. उत्पादन प्रक्रियेत आधुनिक यंत्राच्या वाढत्या वापरामुळे आजारपण, अपघात आणि अपघाती अपंगत्व, मृत्यू यासारखी संकटे नियमित उद्‌भवत आहेत. महाराष्ट्रातील वेगवेगळया व्यवसायात काम करताना अपंगत्व येणे, आजारी पडणे, बेकारी, वृद्‌धत्व, मृत्यू होणे इत्यादी संकट प्रसंगी कामगार कमी उत्पन्नामुळे स्वतःचे रक्षण करू शकत नाही. अशा विविध संकटकालीन आपत्तीना तोंड देता यावे, यासाठी समाजाने व सरकारने मदतीचा हात पुढे केला पाहिजे. कामगारांना सर्व प्रकारची मदत करण्याची जबाबदारी स्वतः कामगार, मालक व सरकार यांची असते. म्हणूनच याला 'सामाजिक सुरक्षितता' असे संबोधले जाते.

भारतासारख्या समाजवादी समाजरचनेचे उद्‌दिष्ट असणाऱ्या आणि कल्याणकारी सरकार असणाऱ्या देशात सामाजिक सुरक्षितता फार महत्त्वाची आहे. महाराष्ट्रात औद्योगिक समाज अस्तित्वात आणण्यासाठी देखील सामाजिक सुरक्षितता महत्त्वाची ठरते. ग्रामीण भागात बेकारी, अर्धबेकारी, दारिद्र्याची अवस्था, अज्ञान, दैववाद इत्यादी दोष असणाऱ्या देशात व महाराष्ट्रातील कामगारांना अनेक संकटांना सामोरे जावे लागते. तेव्हा कामगारांना संरक्षण मिळणे ही काळाची गरज बनली आहे. प्रस्तुत लेखात सामाजिक सुरक्षितता अर्थ व कायदे याचा आढावा देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

सामाजिक सुरक्षितता म्हणजे काय?

भारतात सामाजिक सुरक्षितता महत्त्वाची समजली जाते. 'सामाजिक सुरक्षितता' या संकल्पनेच्या प्रमुख व्याख्या पुढीलप्रमाणे स्पष्ट केल्या आहेत. कामगारांना संकटकाळात साहाय्य करण्यासाठी सरकारने कायद्याद्‌वारे ज्या तरतुदी केलेल्या आहेत, त्यांना एकत्रितरित्या सामाजिक सुरक्षितता असे म्हटले जाते. सर विल्यम बेव्हरीज यांच्या

मते, 'सामाजिक सुरक्षा' म्हणजे बेकारी, अज्ञान व आजारपण याविरुद्धचे आक्रमण होय.' आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेनुसार 'सामाजिक सुरक्षा' म्हणजे अशा प्रकारची सुरक्षितता की, ज्यामध्ये कामगारांवर आणलेल्या धोक्याबाबत, त्यांना योग्य यंत्रणेमार्फत संरक्षण देण्यासाठी समाजाने केलेली सुसज्ज व्यवस्था होय.'

कल्याणकारी राज्यामध्ये औद्योगिक समाजाच्या निर्मितीसाठी सुरक्षा सोयी आवश्यक ठरतात. प्रामुख्याने विकसनशील देशात बेकारी, अर्धबेकारी, अशिक्षितपणा, दैववाद, अंधश्रद्धा इत्यादीचा पगडा जास्त असतो. कामगारांना वेतन कमी असल्याने व वास्तव वेतनाच्या सुविधा अत्यंत अल्प असल्याने त्यांना कुटुंबाचे पालनपोषण करणे अवघड जाते.

राज्यघटनेच्या ४१ व्या कलमानुसार सरकारने सामाजिक सुरक्षा उपाय देशातील लोकांना उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्वीकारली आहे. सामाजिक सुरक्षिततेच्या उपायांची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगितली जातात. कामगारांना सामाजिक सुरक्षा सोयी कायद्यानुसार देता येतात. कामगारांना आजारपणात पगारी रजा मिळते. अपघात, बेकारी, शारीरिक अक्षमता, वृद्धत्व इत्यादीमध्ये कामगारांना मदत मिळते. कामगारांना सामाजिक विम्याद्वारे मदत मिळते. सामाजिक सुरक्षितता राखणे हे महाराष्ट्र सरकारने महत्वाचे कर्तव्य मानले आहे.

सामाजिक सुरक्षितता कायदे :

सरकारने सामाजिक सुरक्षिततेसाठी पुढील वेगवेगळे कायदे केलेले आहेत.

कामगारांना नुकसान भरपाई देण्याबाबतचा कायदा - १९२३ :

भारतात २० व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात आधुनिक यंत्राचा वापर वेगाने वाढत गेला आणि यातून कामगारांचे धोके वाढत गेले. कामगारांना अपघाताच्यावेळी संरक्षण देण्याची आवश्यकता वाटू लागली. अपघात, आजार, अपंगत्व, मृत्यू इत्यादीसाठी नुकसान भरपाई मागण्यात येऊ लागली. म्हणून भारतात १९२३ मध्ये 'कामगारांना नुकसान भरपाई देण्याबाबतचा कायदा' करण्यात आला. या कायद्यानुसार कामगार कामावर असताना अपघातामुळे अपंगत्व आल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास त्याला किंवा त्याच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई दिली जाते. कामगाराचा मृत्यू झाल्यास रु. ५०,००० ते रु. २.२८ लाख व अपंगत्व आल्यास रुपये ६०,००० ते रु. २.७४ लाख या दरम्यान नुकसान भरपाई दिली जाते.

राज्यघटनेच्या ४१ व्या कलमानुसार सरकारने सामाजिक सुरक्षा उपाय देशातील लोकांना उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्वीकारली आहे. सामाजिक सुरक्षिततेच्या उपायांची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगितली जातात. कामगारांना सामाजिक सुरक्षा सोयी कायद्यानुसार देता येतात. कामगारांना आजारपणात पगारी रजा मिळते. अपघात, बेकारी, शारीरिक अक्षमता, वृद्धत्व इत्यादीमध्ये कामगारांना मदत मिळते. कामगारांना सामाजिक विम्याद्वारे मदत मिळते. सामाजिक सुरक्षितता राखणे हे महाराष्ट्र सरकारने महत्वाचे कर्तव्य मानले आहे.

कामगार राज्य विमा कायदा - १९४८

कारखान्यात काम करणाऱ्या केंद्र व महाराष्ट्र राज्य कामगारांना मानसिक व शारीरिक ताणतणाव सातत्याने सहन करावे लागतात. अलीकडील काळात त्यामध्ये वाढ होत असून त्याचा त्याच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होत आहे. आजारपणाच्या काळात त्यास आर्थिक मदत मिळावी या उद्देशाने १९४८ मध्ये हा कायदा करण्यात आला. या कायद्यामुळे आजारपणातील लाभ, अपंगत्व आलेल्यांना लाभ इत्यादी लाभ कामगारांना मिळत आहेत. १९९८ मध्ये या कायद्यानुसार देशात १,४५० दवाखान्यांतून ६६.१३ लाख कर्मचारी कार्यरत होते. तर आजारपणातील लाभ रुपये ९२९ कोटी इतका होता. तथापि कामगार आणि मालक यांनी विमा योजनेस म्हणावा तसा प्रतिसाद दिलेला नाही.

भविष्यनिर्वाह निधी कायदा - १९५२

सेवानिवृत्त व म्हातारपण हे कामगारांच्या आयुष्यातील अत्यंत अवघड दिवस आहेत. नियमित उत्पन्न मिळणे बंद झाल्याने कामगारांना सातत्याने आर्थिक मदत व्हावी या हेतूने १९५२ मध्ये हा कायदा करण्यात आला. या कायद्यानुसार २० पेक्षा जास्त कामगार असलेल्या १७३ उद्योगांना हा लाभ मिळत असून कामगारांची संख्या १४५ लाख इतकी आहे. सध्या सर्वक्षेत्रात कामगारांची पेन्शन

१ नोव्हेंबर २००५ पासून बंद करणेत आली असून आंशिक तत्वावर ती नव्याने सुरू केली आहे. परंतु त्याचा परतावा अनिश्चित स्वरुपाचा असल्याने त्यास कामगारांचा चांगला प्रतिसाद मिळत नसल्याचे दिसून येत आहे.

मातृत्व काळातील लाभ कायदा - १९६१ :

केंद्र व महाराष्ट्र राज्य स्त्री कामगारांना त्यांच्या बाळंतपणापूर्व बाळंतपणानंतर सवेतन रजा मिळते. हा कायदा खाणी, मळे, कारखाने, सर्कस, सरकारी उद्योग इत्यादींना लागू करण्यात आला असून त्याचा कालावधी सहा महिन्यांपर्यंत वाढविण्यात आला आहे. याशिवाय प्रसूती काळात स्त्री कामगारांना वैद्यकीय खर्चासाठी काही रोख रक्कम दिली जाते. मोफत औषधे, मूल सांभाळणे व इतर सोयी पुरविल्या जातात. तसेच बाळंतपणाच्या रजेवर असताना स्त्री कामगारांना कामावरून काढून टाकता येणार नाही.

ग्रॅच्युइटी देयक कायदा - १९७२ :

भारतात स्वातंत्र्योत्तर काळात कामगारांना जास्तीची सामाजिक सुरक्षितता पुरविण्यासाठी सरकार सातत्याने प्रयत्नशील आहे. कामगारास त्याच्या निवृत्तीनंतर आर्थिक मदत व्हावी या उद्देशाने १९७२ मध्ये हा कायदा पास करण्यात आला. या कायद्यानुसार जेवढी वर्षे नोकरी केली असेल त्या प्रत्येक वर्षातील १५ दिवसांच्या पगाराइतकी एकूण रक्कम ग्रॅच्युइटी म्हणून मिळते. ही रक्कम सहाव्या वेतन आयोगात वाढली असून ती सातव्या वेतन आयोगात वाढण्याची शक्यता आहे. कामगारांच्या सामाजिक सुरक्षिततेसाठी ती वाढणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील कामगारांनाही याचा फायदा होईल.

निष्कर्ष :

कामगारांना सामाजिक सुरक्षितता कायद्या अंतर्गत आर्थिक मदत होत आहे. कामगारास त्याच्या अपघातानंतर मृत्यू आल्यास

राज्यविमा योजनेतील सहभागी कामगारांना विविध प्रकारचे लाभ मिळतात. उदा. आजारपणातील लाभ, वैद्यकीय लाभ, बाळंतपणातील लाभ इत्यादी. कामगारांना वृद्धापकाळात त्यांच्या मूळवेतनानुसार पेन्शन मिळते. सध्या या योजनेत खूप मोठा बदल करण्यात आला आहे. भविष्यनिर्वाह निधीच्या रकमेबरोबर कामगारांना त्याच्या निवृत्तीनंतर ग्रॅच्युइटी मिळते. सध्या ही रक्कम वाढविण्यात आली आहे. स्त्री कामगारांना मातृत्व काळातील सर्व प्रकारचे लाभ मिळत आहेत

किंवा अपंगत्व आल्यास आर्थिक मदत मिळते. यामध्ये अपंगत्वाची रक्कम जास्त आहे. राज्यविमा योजनेतील सहभागी कामगारांना विविध प्रकारचे लाभ मिळतात. उदा. आजारपणातील लाभ, वैद्यकीय लाभ, बाळंतपणातील लाभ इत्यादी. कामगारांना वृद्धापकाळात त्यांच्या मूळवेतनानुसार पेन्शन मिळते. सध्या या योजनेत खूप मोठा बदल करण्यात आला आहे. भविष्यनिर्वाह निधीच्या रकमेबरोबर कामगारांना त्याच्या निवृत्तीनंतर ग्रॅच्युइटी मिळते. सध्या ही रक्कम वाढविण्यात आली आहे. स्त्री कामगारांना मातृत्व काळातील सर्व प्रकारचे लाभ मिळत आहेत. उदा. सवेतन रजा, मोफत वैद्यकीय सुविधा इत्यादी. महाराष्ट्रातील कामगारांना त्याच्या आजारपणाच्या काळात आर्थिक मदत मिळते. ही रक्कम आवश्यक इतकी व वेळेत मिळत नाही असा अनुभव येतो.

उपाय :

कामगारांना त्यांच्या अपघाताच्या व अपंगत्वाच्या स्वरुपात आर्थिक मदत मिळाली पाहिजे. त्याच्यावर त्याचे पुढील जीवन अवलंबून आहे. कामगारांना कामाच्या ठिकाणी अल्पदरात चहा, नाष्टा मिळणे आवश्यक आहे. कामगारांना कामाच्या ठिकाणी, कामाच्या वेळेत एक तास विश्रांती मिळाली पाहिजे. कामगारांचे कामाचे तास निश्चित करुन त्यांना सर्व प्रकारच्या रजा मिळाल्या पाहिजेत. राज्य सरकारने याचा गांभिर्याने विचार करावा. कामगारांना कामाच्या ठिकाणी आवश्यक जागा, सुर्यप्रकाश, खेळती हवा मिळाली पाहिजे. त्याच्यावर त्याचे आरोग्य अवलंबून आहे. कामगारांना वृद्धापकाळात मिळणारी पेन्शन योजना पूर्वीच्या पेन्शन योजनेप्रमाणे मिळणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील राज्य कामगारांना अद्याप सातवा वेतन आयोग लागू केलेला नाही, तो लागू करण्यात यावा. महाराष्ट्रातील स्त्री कामगारांना त्यांच्या नैसर्गिक आपत्तीकाळात त्यांच्या आवश्यकतेनुसार सवलती मिळाल्या पाहिजेत. महाराष्ट्रातील स्त्री कामगारांना प्राप्तीकरात पूर्वीप्रमाणे

सवलती द्याव्यात. कामगारांना कामाच्या ठिकाणी करमणूक सुविधा मिळावी. कामगारांच्या पाल्याचा शैक्षकि खर्च उत्पादक वर्गाकडून करण्यात यावा. कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा कायद्याची व्याप्ती वाढविली पाहिजे. विशेषतः महाराष्ट्र राज्य सरकारने यासाठी प्रयत्नशील असले पाहिजे. कारण महाराष्ट्रातील कामगारांची संख्या जास्त आहे.

महाराष्ट्र राज्य हे देशात औद्योगिकीकरणाच्या दृष्टिने अग्रेसर राज्य आहे. औद्योगिकीकरणाच्या वाढत्या प्रक्रियेत कामगारांची संख्या घटत आहे. मालक वर्गाकडून उत्पादन वाढीच्या योजनांसाठी आधुनिक यंत्र व तंत्राचा अवलंब केला जात आहे. त्यामुळे कामगारांवर बेकारीची पाळी येत आहे. कामगारांना प्रशिक्षण देऊन उत्पादन वाढीच्या योजनांचा अवलंब करणे कामगारांच्या हिताचे ठरणार आहे, याचा उत्पादकाने विचार करावा. महाराष्ट्रात कामगारांच्यासाठी विविध कल्याणकारी योजना अस्तित्वात आणल्या आहेत. महाराष्ट्रातील कामगारांना सर्व प्रकारच्या रजा, आरोग्य सुविधा, संकटसमयी संरक्षण, आर्थिक मदत इत्यादी सुविधा मिळत असून मालक वर्ग व राज्य सरकारकडून त्याची पुनर्रचना केली आहे. गरीब कामगारांना सामाजिक सुरक्षा अंतर्गत मदत केली जात असून त्यामध्ये महाराष्ट्र राज्य सरकारकडून वाढ केलेली आहे. विशेषतः महिला वर्गास त्याचा मोठा फायदा होत आहे. पोलिस खाते, आरोग्य खाते, शिक्षण खाते इत्यादी खात्याकडून कामगारांना सामाजिक हिताच्या सुविधा पुरविल्या जात आहेत. सद्यःस्थितीत केंद्र व राज्य सरकारने सामाजिक सुरक्षितता कायद्यांची व्याप्ती वाढवून व त्यांची काटेकोरपणे अंमलबजावनी करण्यासाठी सर्व पातळीवरून प्रयत्न करावा व कामगारांना दिलेल्या सामाजिक सुरक्षितता योजनांचे मुल्यमापन करावे म्हणजे खऱ्या अर्थाने कामगारांचे हित साधले जाईल.

■■■

लेखक श्री शिव-शाहू महाविद्यालय, सरुड जि. कोल्हापूर येथे व्यावसायिक अर्थशास्त्र विभागप्रमुख आहेत.
Email - ramlingnale@gmail.com



द्रष्टे सरकार भारताचे
भविष्य सुरक्षित करत आहे
साथ आहे, विश्वास आहे
...होत हा विकास आहे
भावी पिढीचे पंख
नवीन भारतासाठी
मेगा फूडपार्क
योजना
17 राज्यांमध्ये 26 मेगा फूडपार्कना मंजुर,
6 मेगा फूडपार्क कार्यान्वित.
नमामि गंगे
• बाह्य प्रवाह सेन्सॉरच्या माध्यमातून 24 तास देखरेखीमुळे
औद्योगिक प्रदुषणावर मोठ्या प्रमाणावर अंकुश
• 11000 कोटी रुपये किमतीच्या सांडपाणी प्रक्रिया संयात्राच्या
145 प्रकल्पांना मंजुरी
• 10 लाख वैयक्तिक शुचालायांची निर्मिती
• गंगा किनाऱ्यालगतची 3253 गावं हगणदारीमुक्त जाहीर
स्वच्छ गंगा राष्ट्रीय अभियानासाठी निधी वितरीत
मे 2014 पर्यंत 3633 कोटी रुपये
अमृत
Atal Mission for Rejuvenation and Urban Transformation
अटल मिशन ऑफ रिज्युविनेशन अँड अर्बन ट्रान्सफॉर्मेशनचे उद्दिष्ट 500 शहरांमध्ये आर्थिक वृद्धि आणि शहरी विकासाला चालना देण्याचा आहे.
Covers 76% Urban Population of the State
हवाई सुविधा
जनमानसापर्यंत
उडान : अस्तित्वात असलेली विमानतळे आणि धावपट्ट्यांना पुनरुज्जीवित करून देशाच्या अनुचित अनपेक्षित क्षेत्राला जोडण्यासाठी 1 तासापेक्षा कमी (500 किलोमीटर) कालावधीच्या विमान प्रवासासाठी 50% जागांसाठी 2,500 रुपये तिकीट दर.
Smart City
स्मार्ट शहरे
• चांगल्या पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी 1.33 लाख कोटी रुपये किमतीच्या गुंतवणूक योजना असलेल्या 60 प्रस्तावांना मंजुरी
• 1600 कोटी रुपये किमतीचे 20 शहरातील 150 प्रकल्प पूर्ण होण्याच्या मार्गावर
davp

भारतातील सर्वाधिक लांबीचा सेतू

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २६ मे रोजी आसाम राज्यामधील तिनसुखिया जिल्ह्यामध्ये बांधण्यात आलेल्या भव्य पुलाचे उद्घाटन केले. हा पूल भारतामधील सर्वात लांब पूल आहे. प्रसिद्ध गायक-संगीतकार व "ब्रह्मपुत्रेचे पुत्र' असलेल्या भूपेन हझारिका यांचे नाव या पुलास देण्यात येईल, अशी घोषणा पंतप्रधानांनी उद्घाटनप्रसंगी केली.

शाश्वत विकासासाठी पायाभूत सुविधा विकसित करण्याची आवश्यकता पंतप्रधानांनी अधोरेखित केली. केवळ आसामच नव्हे; तर संपूर्ण भारतासाठी हा पूल एक अभिमानास्पद बाब असल्याचे पंतप्रधान म्हणाले होते. या पुलामुळे आसाम व अरुणाचल प्रदेश ही राज्ये अधिक जवळ येतील. आर्थिक समृद्धीच्या नव्या वाटा उपलब्ध होतील. आम्ही हा भाग आर्थिक विकासाचे केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी प्रयत्नशील आहोत. या पुलाच्या माध्यमामधून भारतास दक्षिण पूर्व आशियासही जोडण्यात येईल, असेही पंतप्रधानांनी नमूद केले होते.

तीन मार्गिका असलेला हा सेतू ९.५ कि.मी., लांबीचा असून ब्रम्हपुत्रा नदीची उपनदी असलेल्या लोहित नदीवर

तो बांधण्यात आला आहे. या पुलामुळे आसाममधील धोला आणि सादिया ही दोन ठिकाणं जोडली गेली आहेत. यामुळे आसाम आणि शेजारील अरूणाचल प्रदेश ही दोन राज्ये बारमाही रस्त्याने जोडली गेली आहेत. या पुलामुळे आसाम आणि अरुणाचलप्रदेश या राज्यांमधील अंतर तब्बल १६५ कि.मी. ने कमी होणार असून सहा तासांऐवजी आता केवळ एका तासामध्ये प्रवास संपवता



येणार आहे. यातून पेट्रोल आणि डिझेलच्या रूपात दररोज सुमारे १० लाख रुपयांची इंधन बचत होणार आहे.

अरुणाचलची सीमा शेजारी देशांना लागून असल्यामुळे व्यूहात्मदृष्ट्याही या पुलाचे वेगळे महत्व आहे. याशिवाय त्या भागात आगामी काळात उभारण्यात येणार असलेल्या अनेक जलविद्युत प्रकल्पाच्या दृष्टीनेही हा पूल महत्वाचा ठरणार आहे. हा पूल ईशान्य भारतातील रस्ते बांधणी जलदगतीने करण्यासाठी केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्रालयाने आखलेल्या 'स्पेशल ॲक्सलरेटेड रोड डेव्हलपमेंट प्रोग्रॅम फॉर नॉर्थ-ईस्ट (SARDP-NE) अंतर्गत बांधण्यात आला असून त्यासाठी सुमारे २,०५६ कोटी रुपये खर्च आला आहे.

पूल बांधण्यात आलेल्या ठिकाणी पूर्वी लोहित नदीचे पात्र ओलांडण्यासाठी केवळ नाव आणि बोटीचाच पर्याय उपलब्ध होता, तोही केवळ दिवसाच. प्रस्थिती असताना तर इतर कोणताच पर्याय उपलब्ध नसे.

■■■

टोपोग्राफी

टोपोग्राफी हा शब्द सर्वसाधारणपणे पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या सखोल अभ्यासासंदर्भात वापरला जातो. एखाद्या भूभागाची वास्तविक वैशिष्ट्ये जसे की, डोंगर, खोरे, नद्या, तलाव, समुद्र आणि महासागर तसेच मानवनिर्मित बदल उदा. रस्ते, पूल, धरण, रेल्वे मार्ग आणि शहरे त्यात समाविष्ट असतात.

एखाद्या ठिकाणाचा अक्षांश, रेखांश किंवा समुद्रसपाटीपासूनची उंची ठरविण्यासाठी टोपोग्राफी हे साधन आहे. जमिनीचे सर्वेक्षण करण्याच्या पद्धतीशी याचे साधर्म्य आढळते. सर्वसाधारणपणे स्थापत्य अभियंते, पर्यावरण तज्ज्ञ आणि शहरनियोजनकार यांच्याकडून टोपोग्राफिक मॅप अर्थात नकाशे वापरले जातात. याशिवाय भटकंती करणारे हौशी लोक, आपत्कालीन सेवा देणाऱ्या संस्था आणि इतिहास अभ्यासक यांच्याकडूनही टोपोग्राफिक मॅप वापरले जातात. विविध रंगाच्या खुणा, चिन्हे, आणि रेखाटने याद्वारे टोपोग्राफिक मॅप बनवले जातात. हे नकाशे त्रिमितीय भूपृष्ठाचे द्विमितीय सादरीकरण असते. त्यात संबंधित जागेचे पृथ्वीवरील ठिकाण, आकार आणि नैसर्गिक तसेच मानवनिर्मित वैशिष्ट्ये दर्शविलेली असतात.

आपणास माहित आहे का?

टोपोग्राफीसाठी जगभरात प्रामुख्याने थेट सर्वेक्षण आधारित पद्धत वापरली जाते. अंतर आणि कोन मोजण्यासाठी टोपोग्राफीमध्ये 'थेडोलिट्स' सारखी उपकरणे वापरली जातात. यातून टोपोग्राफिक मॅपिंगसाठी आवश्यक असलेली डिजिटल इमेजिंगसह सर्व प्रकारची आधारभूत माहिती संकलित केली जाते. या माहितीची सांगड आकाशातून तसेच उपग्रहाद्वारे काढण्यात आलेल्या छायाचित्रांशी घालून संबंधित पृष्ठभागाचा संपूर्ण आराखडा किंवा चित्र तयार केले जाते. समुद्र आणि महासागराचे मापन करण्यासाठी 'सोनार' पद्धतीचा अवलंब टोपोग्राफिमध्ये केला जातो. ज्यात पाण्याखाली ध्वनिलहरी सोडून त्या भागाची खोली, रुंदी आदी बाबींचा शोध घेतला जातो. ग्लोबल पोझशनिंग सिस्टीम अर्थात, जीपीएस तंत्रज्ञानामुळे टोपोग्राफिक मॅपिंगचे काम पुष्कळ प्रमाणात सोपे झाले आहे. अतिशय दुर्गम भागाचे टोपोग्राफिक मॅप तयार करण्यासाठी या तंत्रज्ञानाचा विशेषकरून लाभ मिळत आहे.

केंद्र सरकारची आश्वासक कामगिरी

- शिवाजी सरकार

जगातल्या सगळ्यात मोठ्या शासन प्रणालींपैकी एक असलेल्या शासन प्रणालीचे व्यवस्थापन करणे सोपे नाही. पण व्यवस्थेत प्रामाणिकता आणण्याच्या निश्चयाने केलेल्या नरेंद्र मोदींच्या नेतृत्वातील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकाच्या प्रयत्नांना यश आलेले दिसून येत आहे.

अनेक देशांशी केलेल्या करारांमुळे काळा पैसा मॉरिशस, सायप्रस आणि सिंगापूर मार्गे भारतात वळवण्याचे मार्ग बंद झाले आहेत. या पूर्वी अवैध मार्गाने काळा पैसा पांढरा करून तो सायप्रस, मॉरिशस, आणि सिंगापूर देशातून भारतात आणला जात असे.

सरकारने स्वित्झर्लंड आणि इतर युरोपियन देशांशी माहितीच्या देवाणघेवाणीचा करार केला आहे. ह्या करारानुसार सप्टेंबर २०१९ पासून स्विस बँका भारतीय व्यक्तींच्या सर्व व्यवहारांची माहिती भारत सरकारला देतील. ह्यामुळे काळा पैसा पांढरा करण्याचे मार्ग बंद होतील.

अवैध मार्गाने कमावलेला पैसा आणि कर चुकुवून केलेली बचत आता काळा पैसा अघोषित परदेशी उत्पन्न तसेच संपत्ती आणि कर व कर निर्धारण कायदा ह्या सर्वकष आणि कडक कायद्याच्या कक्षेत आला आहे. ह्या कायद्यात कडक दंड आणि कारवाईची तरतूद आहे.

२०१४ ते २०१६ या कालावधीत प्राप्तीकर विभागाने ४३,००० करोड रुपयाची अघोषित संपत्ती शोधून काढली. केंद्रीय महसूल सचिव हसमुख अधिया यांनी २ जुलै २०१६ रोजी ही माहिती दिली.

काळा पैसा उघड करण्याबाबत २०१६ मधे देशातली आजवरची सर्वात मोठी मोहीम हाती घेण्यात आली होती. त्यात किमान ६५,२५० कोटी रुपयांची अघोषित संपत्ती जाहीर झाली. अघोषित संपत्ती जाहीर करणाऱ्यांना सवलत देणारी योजना सरकारने आणली त्याअंतर्गत ही संपत्ती जाहीर झाली आणि त्यातून सरकारला कर स्वरुपात २९,३६१ कोटी रुपये मिळाले.

बेनामी संपत्ती प्रतिबंधक कायदा केवळ बेनामी संपत्तीलाच लक्ष्य करत नाही तर अशी संपत्ती निर्माण होऊ नये याचीही दक्षता घेतली जाते. खरंतर, हा कायदा १८ वर्षांपूर्वीच तयार झाला होता, मात्र त्याची अंमलबजावणी मोदी सरकार आल्यावर १ नोव्हेंबर २०१६ साली झाली. हा कायदा म्हणजे अवैध संपत्ती कमावण्याचे मार्ग बंद करण्याचा सर्वात प्रभावी मार्ग असल्याचे मानले जाते. या कायद्याच्या आधारे अंमलबजावणी संचालनालय आणि प्राप्तीकर विभागाने व्यवस्था स्वच्छ करण्यासाठी अनेक पावले उचलली आहेत.

अनेक खाणींचे वाटप लिलावाच्या माध्यमातून करण्यास सुरुवात झाल्यामुळे या प्रक्रियेत मोठे बदल झाले आहेत. कोळसा खाणक्षेत्र, स्पेक्ट्रम आणि खाणींचे ऑनलाईन लिलाव पद्धतीने वितरण सुरु झाले असून त्याची मार्गदर्शक तत्वे तयार करण्यात आली आहेत. त्यामुळे भविष्यात कुठल्याही सरकारला हे नियम आणि पद्धती बदलता येणार नाही.

देशाबाहेरही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काळ्या पैशाविरुद्धचा लढा थांबवला नाही. ५ सप्टेंबर २०१६ रोजी पंतप्रधान मोदी यांनी स्वतः महत्वाच्या जी २० शिखर परिषदेत युरोप आणि इतर देशांमध्ये कर चुकवेगिरीसाठी असणारी सुविधा बंद करण्याचा प्रस्ताव मांडला. यामुळेच जी -२० राष्ट्रांना आर्थिक गैरव्यवहार, काळा पैसा आणि दहशतवादाला मिळणाऱ्या निधीविरोधात युध्द पुकारणे भाग पडले.

ही कदाचित सुरुवात होती. सर्वात मोठी कारवाई ८ नोव्हेंबर २०१६ रोजी रात्री 8 वाजता झाली. पंतप्रधानांनी ५०० आणि १००० रुपयाच्या चलनी नोटा बंद करण्याची घोषणा केली. आणि त्यामुळे सुमारे १५ लाख कोटी रुपयांचा काळा पैसा बाहेर निघाला. या विमुद्रीकरणामुळे संपूर्ण देश ढवळून निघाला. देशभरातल्या बँकांसमोर जुन्या नोटा बदलून घेण्यासाठी नागरिकांनी लांबच लांब रांगा लावल्या. या प्रक्रियेत झालेला अतोनात त्रास आणि कष्ट नागरिकांनी सहन केले, कारण त्यातून देशाची स्वच्छता होत होती.

प्राप्तीकर विभागाच्या तपासानुसार सुमारे १८ लाख लोकांनी बेहिशोबी पैसे विविध बँक खात्यात जमा केले होते. त्या सर्वांना जमा केलेल्या रकमेचे स्पष्टीकरण मागणाऱ्या नोटीसा धाडण्यात आल्या आहेत.

सरकारने केलेल्या या विमुद्रीकरणाची जागतिक वित्तीय संस्थांनी तारीफ केली. भारत हा आता उद्योगांसाठी उत्तम देश झाला आहे असे मत अंतरराष्ट्रीय नाणेनिधीने नोंदवले. पंतप्रधान मोदी यांनी देशात वस्तू आणि सेवा कर लागू करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे आशियाई बँकेने ४ मे २०१७ रोजी कौतुक केले. देशातील सगळे अप्रत्यक्ष कर या करातच समाविष्ट होणार असून त्यासोबतच दिवाळखोरी कायद्याचीही अंमलबजावणी होईल. आशियाई बँकेचे अध्यक्ष ताकेहीको नाकावो यांनी, चालू आर्थिक वर्षांत भारतीय अर्थव्यवस्थेचा विकासदर ७.४ टक्क्यांपर्यंत वाढेल आणि पुढील आर्थिक वर्षासाठी हा दर ७.६% राहील असा अंदाज वर्तवला आहे. ह्यामुळे देशात उद्योग-पूरक वातावरण निर्माण होईल, असेही ते म्हणाले.

सत्तेवर आल्यानंतर सुरुवातीच्या काळातच सरकारने कल्याणकारी योजनांमध्ये होणारा भ्रष्टाचार आणि गळती रोखण्यासाठी विशेष प्रयत्न केले. त्यासाठी थेट लाभ हस्तांतरण योजना 'जाम' म्हणजेच जनधन, आधार आणि मोबाईलशी जोडण्यात आली. यातून ६५ मंत्रालये आणि विभागांच्या ५३६ योजनांसाठी मिळणारे अनुदान थेट लाभार्थ्यांच्या खात्यात पोहोचविण्यात यश आले.

उज्वला म्हणजेच दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांमध्ये स्वयंपाकाच्या गॅस (GAS) ची सुविधा देणे या योजनेपासून ते उजाला म्हणजेच देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत सौर ऊर्जा पोहोचवणे या योजनांमधून विशेषतः महिलांच्या आयुष्यात आनंद निर्माण करण्यात आला. यामुळे विजेचे दरही कमी झाले आणि उद्योगांसाठीच्या खर्चातही बचत झाली. मोदी सरकारची तीन वर्षे म्हणजे वंचितांसाठी संधी, आणि नव्या आशा निर्माण होण्याचा उदय झाला आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही.

■■■

(लेखक दिल्ली येथील वरिष्ठ पत्रकार आहेत. ते विविध सामाजिक राजकीय विषयांवर सातत्याने लेखन करत असतात. लेख सौजन्य -पत्रसूचना कार्यालय)

प्रकाशन विभागाची नवी पुस्तके

एका पुस्तकाची किरकोळ विक्री
किंमत 30 रुपये प्रत्येकी

चार पुस्तकांचा संच
१०० रु.

द्रष्टे सरकार भारताचे
भविष्य सुरक्षित करत आहे

साथ आहे, विश्वास आहे
...होत हा विकास आहे



भावी पिढीचे पंख
नवीन भारतासाठी

Railways

2018-20पर्यंत पूर्ण होणाऱ्या 26,831 कोटी रुपये खर्चाच्या 12 नवीन रेल्वे प्रकल्पांना मंजुरी

रूळ बांधणी मागील 6 वर्षांच्या 4.3 किलोमीटर प्रतीदिनाच्या तुलनेत 2015-16 मध्ये प्रतिदिन 7 किलोमीटर रूळ बांधणी

मेघालय रेल्वे नेटवर्कमध्ये मिझोराम ब्रॉडगेज नेटवर्कवर

74 स्थानकांवर वायफाय सुविधेचा शुभारंभ, 2018 पर्यंत ही सुविधा 400 स्थानकांपर्यंत विस्तारित करण्याची योजना

ऑनलाईन तिकीट आरक्षित करण्याची 2000 प्रतिमिनीट क्षमता वृद्धिंगत होऊन 15000 प्रतीमिनीट

मेट्रो रेल्वे प्रकल्प

2014-17 या कालवधी दरम्यान अहमदाबाद, नागपूर, लखनऊ, पुणे, चेन्नई आणि एनसीआर (फरीदाबाद) मध्ये 6 नवीन मेट्रो रेल्वे प्रकल्पांची निवड

बुलेट ट्रेन

भारतातील पहिली बुलेट ट्रेन मुंबई ते अहमदाबाद, 508 किलोमीटरचा प्रवास केवळ 2 तासात

davp

Yojana Marathi (Monthly) **July 2017**

RNI No. MAHMAR/2009/32156
Reg No.G/NMB/137/2016-18

Published Date: 12th **July,** 2017
Date of Posting : 16th **July,** 2017

Editor - **Umesh Ujgare**
Printed and Published by **Dr. (Ms) Sadhana Rout,** Director General, on behalf of Publication Division
and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.
Posted at - Mumbai - Patrika Channel Sorting Office,GPO, Mumbai - 400 001.

UPSC Foundation Batch 2017

MPSC Foundation Batch 2017

Bhagirath IAS Academy

UPSC • MPSC

ऑफीस १ : मंत्री हाईटस्, २ रा. मजला, शनिवार पेठ, पुणे–३०
ऑफीस २ : २ रा मजला केसरीवाडा, नारायणपेठ, पुणे –३०

Ph.: 020-64013450 | 9970298197 | 7378406920

Web : www.bhagirathacademy.com

E-mail : bhagirathacademypune@gmail.com

Facebook : Bhagirath IAS Academy